


# माणूस

सप्टेंबर १९६३

मूल्य १ रुपया



"'तानसेन' आणि 'बैजू बावरा' या चित्रपटातली गायनांची बेंगरूळ द्वंद्वयुद्धे ऐकून आणि पाहून "विनायक हवे होते! विनायक हवे होते!" अशा खेदपूर्ण आठवणीचा फणकारा रसिकांच्या अंतःकरणाला जाणवतो."....

हे ना. सी. फडके यांनी मा. विनायकांवर लिहिलेल्या लेखातील वाक्य वाचून कोणीही असेच म्हणेल की विनायकांसंबंधी अधिक काही वाचायला मिळाले तर फार बरे होईल. कोणीच कसे याकडे अद्याप लक्ष पुरवले नाही? रसिकांची ही मूक ओळखूनच 'माणूस'ने यंदाच्या दिवाळी अंकात मा. विनायकांवर एक खास सचित्र पुरवणी देण्याचे ठरवले आहे. दोन वर्षापूर्वी 'प्रभात फिल्म कंपनी'वर एक सचित्र पुरवणी काढून 'माणूस'ने दिवाळी अंकाचा एक नवीन पायंडा पाडला होता. तेव्हापासून शेकडो वाचकांनी, हितचिंतकांनी कळवून ठेवले होते, की वेळ येताच मा. विनायकांवर असेच काहीतरी करा. यंदा तो योग जमून आलेला आहे.

# मा० विनायक

यांच्या सहवासात ज्या व्यक्ती वावरल्या त्या सर्वांच्या सल्ल्याने आणि सक्रिय साहाय्याने 'माणूस' दिवाळी अंकातील

## 'मा० विनायक–व्यक्ती–कला–कर्तृत्व'

हा विभाग तयार होत आहे.
यात कोण नाहीत?

खांडेकर-फडके आहेत, दिनकर पाटील–वसंत जोगळेकर आहेत, अप्पा पेंडसे–माधव शिंदे आहेत, बेबी नंदा–मीनाक्षी आहेत, दामूअण्णा मालवणकर–विष्णुपंत जोग आहेत ––आणखीही अनेक आहेत.

पण मा. विनायक अशा थोरामोठ्यांनाच मोठा वाटत होता असे नाही. सर्वसामान्य सिनेमाशौकी मराठी माणसालाही विनायकाविषयी एक वेगळाच जिव्हाळा वाटत होता.

टिळक रोडवरील एका पानाच्या दुकानात त्यांचा फोटो आज कित्येक वर्षे भक्तिभावाने लावलेला अनेकांनी पाहिला असेल.

याच दुकानाचे, त्याच्या मालक-मालकिणींचें छायाचित्र मुखपृष्ठावर देऊन 'माणूस'

## दिवाळी अंकाची सहर्ष घोषणा

करीत आहे.

वर्ष तिसरे : अंक चवथा

*

सप्टेंबर : १९६३

*

: संपादक :
श्री. ग. माजगावकर

## सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसे टपाल हशील पाठवावे.

२. कविता पाठविताना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपाल हशील पाठवावे.

३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपाल हशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असे साहित्य निकालात काढले जाईल.

४. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

५. या मासिकात व्यक्त झालेली मते ' माणूस ' मासिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

*

पत्रव्यवहाराचा पत्ता
**' माणूस '**
४१९ नारायण पेठ, पुणे २.
वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया




## स्वरूपदर्शन

### सामाजिक – राजकीय

ने मजसि ने परत मातृभूमीला : रा. म. शास्त्री

### साहित्य – विभाग

कथा : किशोर गोमकाळे, मनोहर देखणे, मामा कोकजे

कविता : राजा महाजन, जयंत देवधर, प्रभाकर, मधुकर कोसारे, विश्वानाथ जोशी, शरद गजानन वाघ, रमेश गोविंद वैद्य, सौ. राधा हरदास

समीक्षा : वसु शंकर भगत, श्रीकांत रानडे,

### चित्रपट

माझा होशिल का ? : वसु शंकर भगत
तेरे घरके सामने : श्रीकांत रानडे

मुलाखत : रामचंद्र हिंगणे

मुखपृष्ठ : मोहन वाघ

आतील सजावट : वसंत सहस्त्रबुद्धे

# ने मजसी ने परत मातृभूमीला

* *My Land & My People*
  *–Dalai Lama*
* *Out of this world*
  *–Lowell Thomas*
* *Tibet fights for Freedom*
  *–Raja Hutheesing*

या तीन ग्रंथांच्या आधारे

**रा. म. शास्त्री**

यानी 'माणूस' साठी

तयार केलेल्या

खास लेखमालेचा उत्तरार्ध

वाटाघाटीच्या घोळात राजकारण अडकले की सबलाची सरशी आणि निर्बलाचा घात या गोष्टी ठरलेल्या असतात. दलाई लामांनी नगवो याच्या नेतृत्वाखाली जे शिष्टमंडळ पेकिंगला रवाना केले त्यांनी चिनी अधिकाऱ्यांच्या दडपणाखाली तिबेटच्या मृत्युपत्रावरच सही दिली.


**सतरा पदरी फास**

शिष्टमंडळ पेकिंगला पोचले. चौ एन् लाय यांनी त्याना खान्यासाठी पाचारण केले. ओळखीपाळखी झाल्या. खाना सुरू झाला न झाला तोच चिनी अधिकाऱ्यानी एक दहा कलमी मसुदा नगवो यांच्यापुढे ठेवला. पूर्वसूचना नाही, चर्चा नाही, काही नाही. तिबेट हा चीनचाच भाग असताना चर्चा कसली करायची? हा मसुद्याच्या सुरवातीचा खुलासा होता – "गेल्या शंभर वर्षात साम्राज्यवादी शक्तीनी तिबेटमध्ये घुसून विश्वासघात व आमिषे याच्या बळावर तिबेटी राष्ट्रीयत्व आणि तिबेटी जनता याना दास्यात आणि हालात पुरते बुडवून टाकलेले आहे. या कारणास्तव चिनी सरकारने जनतामुक्ती (People's Liberation Army) सैन्याला असा आदेश दिला आहे की या सैन्याने तिबेटमध्ये जाऊन साम्राज्यवादी शक्तीचा पुरता बीमोड करावा व तिबेटची मुक्तता करून तिबेटला प्रजासत्ताक चीनच्या कुटुंबात दाखल करून घ्यावे."

वस्तुत: १९१२ पासून तिबेटात कुणाही परकीय राष्ट्राच्या सैन्याने पाऊल घातलेले नव्हते.. अर्थातच नगवो शिष्टमडळाने यावर सही करण्याचे स्वच्छ नाकारले. नगवो यानी खुलासा केला की तिबेट हे स्वतंत्र राष्ट्र आहे आणि त्याच्या मुक्ततेचा प्रश्नच उद्भवत नाही. याचा परिणाम काय झाला? मूळ दहा कलमी योजना होती ती सतरा कलमी करण्यात आली. तिबेटला काही प्रलोभनें त्यात अंतर्भूत करण्यात आली – 'तिबेटांत अस्तित्वात असलेल्या राजकीय घडीत चीन बदल करणार नाही; दलाई लामाचे अधिकार आणि दर्जा आहे तसाच राहील; तिबेटी जनतेच्या धार्मिक समजुती व परपरा याची कदर करण्यात येईल' या आश्वासनात अर्थातच फारसा अर्थ नव्हता. स्वतंत्र राष्ट्र म्हणून तिबेटचे अस्तित्व संपविण्याचा हेतू रक्तपाताशिवाय साध्य व्हावा यासाठी लाडग्याने पाघरलेले हे केवळ कातडे होते.

नगवो यानी करारावर सही करण्याची टाळाटाळ चालवली. परतु अखेर चिनी लश्करी अधिकाऱ्यांनी धमकी दिली, की करारावर सही झाली वा न झाली तरी चिनी मुक्तिसैन्य तिबेटात घुसून आपले इतिहासदत्त कार्य करणारच आहे. सर्वनाश समोर दिसत असल्यामुळे व कोंडीत पकडले गेल्यामुळे दलाई लामांच्या समतिखेरीज नगवो यानी या सतरा कलमी करारावर सही दिली. दलाई लामाचा सरकारी शिक्का त्यावर झाल्याखेरीज या कराराला कायदेशीरपणा नाही या सबबीवर नगवो यांनी ल्हासामध्ये गेल्यावर करार बधनकारक न होईल अशी पळवाट काढली. परंतु, शिक्क्यासाठी 'लाय' अडणार थोडाच! त्याने चीन मध्येच दलाई लामाचा शिक्का तयार केला. करारावर दलाई लामाच्या शिक्क्यासहित मोर्तब झाले.

या कराराची हकीकत दलाई लामाना कुणी कळवली का? नाही! त्यांना प्रथम याची माहिती मिळाली ती चिनी रेडिओवरून.



-- तिबेट गिळला – आतां इंडियाऽऽऽअ‍ॅण्ड दि ड्रॅगन्...... !--

पेकिंग रेडिओने नगबो यांचे करारावरील भाषण प्रक्षेपित केले. दलाई लामा सांगतात –

" Neither I nor my govt. were told that an agreement had been signed. We first came to know of it from a broadcast which Nagbo made on Peking Radio. It was a terrible shock when we heard the terms of it."

[मला किंवा माझ्या सरकारला करारावर सही झाल्यासंबंधी काहीच कळवलेलं नव्हत. आम्हाला हे प्रथम कळल ते पेकिंग रेडिओवरून, नगबो यांनी जे भाषण प्रक्षेपित केल त्यावरून कराराची कलम ऐकून आम्हाला भयंकर धक्काच बसला.]

परंतु अपमान आणि राग गिळून बसण्याखेरीज दुसरे काय करणे शक्य होते ? तिबेटी शिष्टमंडळ पेकिंगला गेले आणि दलाई लामा मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार ल्हासा सोडून भारताच्या सरहद्दीजवळील याटुंग या शहरी येऊन राहिले होते. येताना त्यांनी बरेचसे सोने व चांदी एका संदुकीत भरून आणले होते. चिनी सैन्याने तिबेटवर हल्ला केला व देश सोडण्याची पाळी आली तर काही पैसा हाती असावा या हेतूनेच हा खजिना सिकीमच्या हद्दीत पाठवण्यात आला व तो सुरक्षित जागी ठेवण्यात आला.

## चिनी टोळधाडीचे आगमन

करारावर सही करून तिबेटी शिष्टमंडळ ल्हासाला परतण्यापूर्वीच पेकिंग सरकारने जनरल चांग चिनवू (Chang Chin wu) यांना तीन हजार सैन्यानिशी ल्हासाला पाठवले. जनरल चांग चिनवू ल्हासात दाखल झाल्यामुळे दलाई लामा यांना याटुंग येथील वास्तव्य संपवून ल्हासात परतणे भाग पडले. जनरल चांगच्या पाठोपाठ आणखी तीन हजार चिनी सैनिक ल्हासात दाखल झाले.

सहा हजार चिनी सैन्याचा ल्हासात तळ पडताच, त्याची तिबेटी जनतेत प्रतिक्रिया सुरू झाली. कारण एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्या चिनी सैन्याधिकाऱ्यांना राहण्यासाठी घरे तर हवीत ! ल्हासात जिथे मिळेल तिथे चिनी अधिकाऱ्यानी घरे ताब्यात घेतली व सैन्याची मख्य छावणी नदीकाठी नॉर्ब्युलिंग्का या राजवाड्याच्या पलीकडे ठेवण्यात आली. राहण्याची सोय कशीतरी लागली. परंतु खाण्याचे काय ? पोटाला राजवाड्यातील कोठारातून गोणीच्या गोणी धान्य छावणीकडे रवाना होऊ लागले. धर्ममठातून, खाजगी सुखवस्तू घरांतून धान्यधुन्य सक्तीने वसूल करून चिनी सैन्याची सरबराई सुरू झाली. ल्हासाच्या अन्नधान्यावर भलताच ताण पडला. किमती वाढू लागल्या. नागरिक अस्वस्थ झाले आणि ही अव्यवस्था जोर करीत असतानाच सुमारे आठ हजार आणखी सैन्य ल्हासात दाखल झाले. त्यांनी

बरोबर काहीच आणले नव्हते. चौदापधरा हजार चिनी सैनिकांचा खाण्यापिण्याचा सर्व खर्च तिबेटी सरकारने करावा अशी चिनी सरकारची अपेक्षा होती. कारण तिबेटची मुक्तता करण्यासाठी ते आले होते ! त्याच्याशिवाय तिबेटमध्ये घुसलेल्या साम्राज्यवादी शक्तीचा बीमोड कसा होणार !! परतु सामान्य तिबेटी लोकांना शभर वर्षांत या साम्राज्यवादी शक्ती कधीच कोठे दिसलेल्या नव्हत्या; आणि त्या शक्तीच्या विध्वसनाकरिता आलेले हे बकासुरी सैन्य मात्र आता त्यांच्या पोराबाळांच्या तोंडचा घास हिसकावून घेत होते.

ल्हासात सैनिकाविरुद्ध चिडीची एक लाट हळूहळू आकार घेऊ लागली. काही सळसळणाऱ्या रक्ताची पोरे सैनिकावर दगड फेकू लागली. जुने आणि जाणते लोक मूग गिळून हा अत्याचार पाहत होते, परंतु तरुणाचे रक्त उसळचा मारीत होते. तेच ल्हासाच्या हिरवळीवर उतरलेल्या या चिनी टोळधाडीवर रागाने दगड फेकीत होते. चिनी सेनाधिकाऱ्यांनी तिबेटी मत्रिमडळाकडे तक्रार केली की ल्हासातील माणसे सैनिकाना त्रास देतात, तो तावडतोब बंद व्हावा.

शहरात चिनी सैनिक व तिबेटी जनता याचे खटके उडत असतानाच तिबेटी सरकार आणि चिनी लश्करी अधिकारी यांच्यांत ठिणग्या पडू लागल्या होत्या.

**कटकटी सुरू झाल्या**

दलाई लामाचे पतप्रधान होते लुखाग्वा (Lukhangwa) नावाचे वृद्ध गृहस्थ. म्हातारा मोठा परखड होता. त्याने चिनी अधिकाऱ्यांना बजावले की तिबेटचे अन्नधान्य फक्त तिबेटी जनतेला पुरेल इतकेच आहे. फारतर आणखी एकदोन महिने मोठ्या कष्टाने चिनी सैन्याची खाण्यापिण्याची सोय शक्य आहे. त्याने स्पष्टच सवाल केला—

" एवढा मोठा फौजफाटा इथे ल्हासात कशाकरिता आलेला आहे? तिबेटचे संरक्षण करण्याकरिता जर चिनी आलेले असतील तर तिबेटच्या सरहद्दीवर सर्व सैन्याला पाठवा आणि फक्त काही चिनी अधिकारी राजधानीत राहू द्या. "

यावर जनरल चाग चिनवूने सागितले—

" चिनी सैन्याने तिबेटात यावे या करारावर सही केल्यानंतरच सैन्य आलेले आहे. उद्या तिबेट सुरक्षित झाला की सैन्य परत जाणारच आहे. एकदा तिबेट आपल्या पायांवर उभा राहिला की तिबेटी जनतेने सागितले तरी सैन्य तिबेटात राहणार नाही."

यावर मात्र लुखाग्वा खवळले. त्यानी जनरलसाहेबाना चमकावले—

" आजपर्यंत आम्ही आमच्या पायावर उभे होतो. शतकानुशतके आमचा कारभार आम्ही शाततेने करीत होतो. जर कुणी परकीय सैन्य तिबेटात प्रथम आले असेल तर ते चिनी सैन्यच आहे. या सैन्याने इथे येऊन तिबेटला कसली मदत केली ? उलट त्यामुळे येथील जनतेला जीवन असह्य होत आहे. माणसे भिकेला लागत आहेत. त्यांच्या धर्मभावनेची तुम्हाला कदर नाही. तुम्ही ल्हासासारख्या आमच्या पवित्र नगरात मेलेल्या जनावराची हाडे जाळता. लोकात हळूहळू असंतोष पसरत आहे. त्याचा वणवा होण्यास वेळ लागणार नाही."

परतु झोपेचे सोग घेतलेल्यांना जागे कसे करणार ! जनरल चांग चिनवूचे पित खवळले. त्याने लुखाग्वा याना सागितले,

" ल्हासातील लोक चिनी सरकारविरुद्ध द्वेष पसरवतात याला पायबंद घालणे हे तिबेटी सरकारचे काम आहे. फतवा काढून सरकारने लोकाना समज द्यावी."

लुखाग्वा यानी याबाबत चिन्यानी काढलेला फतवा केराच्या टोपलीत फेकून दिला. चिन्यांची समजूत घालण्यासाठी शातता राखण्याचा उपदेश करणारे एक पत्रक मात्र त्यानी काढले. चिन्यांनी लुखाग्वा याना याबद्दल कधीही क्षमा केली नाही.

शहरातले वातावरण दिवसेदिवस तापतच राहिले. जाहीर सभातून चिनी सैन्याविरुद्ध भाषणे झडू लागली. भित्तिपत्रके आणि पत्रके शहरात सर्वत्र दिसू लागली. सभांना बदी करावी असा चिन्यानी लकडा लावला. तिबेट सरकारने सभांना बंदी जारी केली. परंतु बदी मोडून प्रचंड सभा घेतल्या गेल्या. मागणी एकच होती, " चिनी सैनिकांनो, चालते व्हा ! "

या वेळचे वर्णन दलाई लामा करतात—

" The pattern of these events will be distressingly familiar in any country which has been victim of invasion. The invaders had arrived believing that they had come as benefactors. They seemed to be surprised to find that the invaded people did not want their benefactions in the least. As popular resentment grew against them, they tried to repulse it by ever increasing force and rather than blame themselves, they searched for scapegoats. In Tibet the first scapegoats were purely imaginary ' imperialists ' and my Prime Minister Lukhangwa. "

[या ज्या घटना शहरात घडत होत्या त्याचे स्वरूप काही नवीन नव्हते. जेव्हा एखाद्या देशावर स्वारी होते व त्याचा बळी घेतला जातो तेव्हा अशाच घटना सर्वत्र घडतात. आक्रमकाना वाटत होते की उपकारकर्ते म्हणूनच आपण आलेले आहोत. त्याना याचे मोठे आश्चर्य वाटल्यासारखे दिसत होते, की लोकांना त्याच्या उपकाराची यत्किंचितही जरुरी वाटत नव्हती. या बाबतीत लोकक्षोभ जसा वाढत गेला तसा त्यांनी याचे खापर इतराच्या माथ्यावर फोडण्यास सुरवात केली. तिबेटात हे खापर फुटले ते तथाकथित साम्राज्यवाद्यांवर व पंतप्रधान लुखांग्वा याच्यावर !]

**लुखांग्वाचा बळी**

यापैकी तथाकथित साम्राज्यवादी असे कुणी तिबेटात नव्हतेच. होता तो बिचारा दलाई लामांचा म्हातारा पतप्रधान ! ' चोर सुवर्णा तुळी, द्या संन्याशाला सुळी ' असा सगळा मामला ! लुखाग्वाचा काटा काढण्याची संधी जनरल चांग चिनवू पाहत होता आणि अखेर ती संधी त्याने साधली.

तिबेटी सरकारची व चिनी लश्करी अधिकाऱ्यांची एक संयुक्त बैठक जनरलसाहेबानी बोलावली. या बैठकीत जनरल चागने प्रस्ताव मांडला—

' सतरा कलमी करारानुसार तिबेटी सैन्य हे चिनी सैन्यात विलीन करावयाचे आहे व त्या दृष्टीने तिबेटी सैन्यातील काही अधिकारी निवडून त्यांना चिनी लश्करी तळावर शिक्षणासाठी पाठवण्यात यावे.'

तिबेटी सैन्यात फाटाफूट पाडण्याचा हा डाव लुखाग्वा यानी

ओळखला. त्यांनी स्पष्टच सांगितले–

'ही सूचना आवश्यक नाही व स्वीकारणेही शक्य नाही. सतरा कलमी करार म्हणून जो सांगण्यात येतो तो तिबेटी जनतेने कधी स्वीकारलेला नाही. बरे ! करार म्हणावा तर त्याची इतर कलमे चिनी सरकारनेच पायदळी तुडवली आहेत. कराराप्रमाणे पूर्व तिबेट अजून तिबेटी सरकारच्या हवाली केलेला नाही. आमच्या संमतीशिवाय ल्हासात चिनी सैन्याने छावणी ठोकली आहे. तिबेटच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही वा सुधारणा लादणार नाही असे आश्वासन असताना तिबेटी सैन्याबाबतचा हा प्रस्ताव आम्हाला सक्त नामंजूर आहे.'

लुखांग्वाचा हा अवतार पाहताच जनरल चांग चिनवूने थोडे पडते घेतले.

" तिबेटी सैन्य चिनी सैन्यात विलीन करण्याचा प्रश्न तितकासा महत्त्वाचा नसताना तिबेटी सरकारने त्याला का विरोध करावा हे कळत नाही. ते असो. निदान तिबेटी बराकींवर यापुढे चीनचे निशाण फडकवले की आमचे समाधान होईल. तिबेटी लोकांना आमच्याविषयी वस्तुतः प्रेम वाटायला हवे. "

यावर लुखांग्वा यांचा तोलच सुटला. त्वेषाने त्यांनी उत्तर दिले–

" जर तिबेटी निशाण उतरवून बराकींवर चिनी निशाण चढवले तर तिबेटी सैनिक ते पुन: खेचल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे चिनी अधिकाऱ्यांची आणखीच पंचाईत होईल. चिनी सैन्याविषयी तिबेटी सैन्याला वा जनतेला प्रेम वाटावे अशी अपेक्षा ठेवणे हा मूर्खपणाच आहे. प्रेम कशाबद्दल ? तुम्ही आमचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहात आणि त्याच वेळी तुमच्याविषयी प्रेम बाळगावे अशी अपेक्षा कशी ठेवता ? एखाद्या माणसाच्या मस्तकावर प्रहार करून त्याला रक्तस्नान घातल्यावर त्या माणसाने तुमच्याशी मैत्री ठेवण्याची अपेक्षा करता ! ! "

जनरल चांग चिनवू यांनी एकंदर रागरंग पाहून बैठक संपवून टाकली. पाठोपाठ जनरल चांग चिनवूने दलाई लामांना लेखी सूचना केली की लुखांग्वा यांना ताबडतोब बडतर्फ करण्यात यावे. दलाई लामांपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. त्यांना हे स्पष्ट दिसत होते की लुखांग्वाने उच्चारलेला शब्दन् शब्द खरा होता. तिबेटचे प्रेम हीच त्याची प्रेरणा होती. आक्रमणाचा प्रतिकार हाच त्यांचा वेध होता. त्याला बडतर्फ करणे हा निव्वळ अन्याय होता. सत्याची गळचेपी होती. दलाई लामांनी आपली मन:स्थिती वर्णन केली आहे–

" I greatly admired Lukhangwa's courage in standing up to the Chinese. Now I had to decide whether to let him continue or whether to bow yet again to a Chinese demand.

I reasoned that if we continued to oppose and anger the chinese authorities, it could only lead us further along the vicious circle of repression and popular resentment. In the end it was certain to lead to outbreaks of physical violence. Yet violence was useless; we could not get rid of the Chinese by any violent means. Nonviolence was the only course which might win us back a degree of freedom in the end. And violent opposition was not only impracticable, it was also unethical. Nonviolence was the only moral course. This was not only my profound belief; it was also clearly in accordance with the teaching of Lord Buddha and as religious leader of Tibet I was bound to uphold it. So I sadly accepted the recomendation and asked the Prime Minister to resign. "



परखड पंतप्रधान

[ लुखांग्वा यांनी चिनी अधिकाऱ्यांविरुद्ध जे धैर्य दाखवले त्याबद्दल मी त्यांची वाहवा केली. परंतु आता मला काहीतरी निर्णय घेणे भाग होते. चिनी दडपणाखाली पुन: मान तुकवायची की लुखांग्वा यांनाच पंतप्रधान म्हणून काम चालू ठेवण्यास सांगावयाचे ? मला हे समजतच होते की जर चिनी अधिकाऱ्यांना आम्ही असाच पदोपदी विरोध केला व रोष ओढवून घेतला तर दडपशाही आणि जनतेच्या असंतोषाचा उद्रेक यांच्या दुष्ट वर्तुळात गुंतून पडणे अटळ होते. अखेर हिंसात्मक कृत्यातच पर्यवसान होणार याबद्दल शंका नव्हती. परंतु हिंसेने काय साधणार होते ? हिंसेच्या आततायी मार्गाने चिनी वर्चस्व झुगारून देणे शक्यच नव्हते. थोडेफार स्वातंत्र्य पदरात पाडून घेण्याचा एकमेव मार्ग होता अहिंसेचाच ! हिंसात्मक प्रतिकार हा केवळ अशक्य होता म्हणून त्याज्य होता असे नव्हे; तर असा हिंसात्मक प्रतिकार हा नीतीला धरूनही नव्हता. ह्यासंबंधी माझे वैयक्तिक मत ठाम होते. बुद्धदेवाची तीच शिकवण होती. तिबेटचा सर्वोच्च धार्मिक नेता या नात्याने अशा तऱ्हेच्या हिंसात्मक प्रतिकाराच्या मार्गाने जाणे मला शक्यही नव्हते. सरतेशेवटी अत्यंत दु:खद अंत:करणाने मी चिन्यांचे दडपण मानून पंतप्रधानांचा राजिनामा मागितला. ]

दलाई लामांचे पंतप्रधान दोन होते. लुखांग्वा व लोसंग ताशी (Losang Tashi). लुखांग्वा हे भौतिक शासनासाठी व ताशी हे धार्मिक व्यवस्थेसाठी. अशी विभागणी होती. यांपैकी लुखांग्वा हे पुढे दलाई लामांबरोबर तिबेटातून निसटले. परंतु ताशी यांना १९५९

साली तुरुंगात टाकले व त्याची आजतागायत सुटका झालेली नाही.

**पेकिंगवारीचे निमंत्रण**

दलाई लामांनी चिनी दडपणाखाली पतप्रधानांना अधिकारपदावरून दूर करताच चिनी लश्करशाहीने निःश्वास टाकला. त्यांनी पवित्रा बदलला. चिनी सरकारकडून दलाई लामा यांना पेकिंग भेटीचे निमंत्रण आले.

दलाई लामा यांनी आमंत्रणाचा स्वीकार केला.

दलाई लामा सांगतात—

" I thaught I ought to meet the highest authorities in China and try to persuade them to carry out the promises they had made in the agreement they had forced on us. So I decided to go."

[मी विचार केला, की चीनमधील सर्वोच्च अधिकाऱ्याना भेटण इष्ट आहे. जो करार आता आमच्यावर लादलेलाच आहे, त्यामध्ये कबूल केलेल्या आमिपाची अंमलबजावणी करण्याकरिता त्याच मन वळवता आल्यास तरी पाहू, म्हणून मी जाण्याच ठरवल. ]

दलाई लामानी पेकिंगचे निमत्रण स्वीकारले तेव्हा १९५४ साल सुरू झालेले होते.

दलाई लामानी अशा तऱ्हेने पेकिंगवारीचे प्रस्थान ठेवले. खरे म्हणजे त्यानी जाऊ नये अशीच तिबेटी लोकांची इच्छा होती. कदाचित् चीनमध्ये त्याना पकडून ठेवतील, अशी त्याना भीती वाटत होती. पण दलाई लामाना अशी मुळीच भीती वाटत नव्हती. उलट चीनला जाणे आपले कर्तव्य आहे अशीच त्यांची प्रामाणिक भावना होती.

पेकिंगमध्ये त्या वेळेला Peoples National Assembly ची बैठक भरणार होती व त्यात दहा जागा तिबेटसाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या व तिबेटी सभासदांची नेमणूक दलाई लामांना करावयास सांगण्यात आली होती. तिबेटी शिष्टमंडळाचे प्रतिनिधित्व दलाई लामांनी करावे अशीही सूचना करण्यात आली होती.

दलाई लामानी ल्हासा सोडले. चिन्यांनी या वेळी मोटरची व्यवस्था केली होती. ल्हासा–पेकिंग रस्ता करण्याच्या दृष्टीने बरेच मैल सडक सैन्याने तयार करीत आणली होती. त्याकरिता तिबेटी जनतेवर श्रमदानाची सक्ती करण्यात आली होती व जमिनी बळजबरीने ताब्यात घेण्यात आल्या होत्या. जवळजवळ ९० मैल मोटरने प्रवास झाला. मग पुनः तट्टाच्या आणि खेचराच्या पाठीवरून प्रवास सुरू झाला. जवळजवळ दहा दिवसांच्या प्रवासानंतर चिन्यांच्या ताब्यातील पूर्व तिबेटात चेगटूपर्यंत दलाई लामा पोचले. तिथून विमानाने सियान गाठले. विमानात बसण्याची लामाची ही पहिलीच खेप होती. सियान येथे पंचेन लामा दलाई लामाच्या परिवारात दाखल झाला. पंचेन लामा अवघ्या १३ वर्षांचा होता.

**चिनी बुजगावणे**

हा पचेन लामा कोण? याला दलाई लामाच्या परिवारात सामील करण्यात चीनचा काही हेतू असलाच पाहिजे आणि तो लक्षात घेणे फारसे कठीण नाही. जेव्हा सधी मिळेल तेव्हा तिबेटचा ग्रास घेण्यास सोपे जावे म्हणून या पचेन लामाचे प्रस्थ चिनी सरकारने प्रयत्नपासूनच वाढवून ठेवलेले होते.

पंचेन लामा हा तिबेटात दलाई लामाच्या खालोखाल अधिकारी बुद्धावतार समजला जात असे. परंतु प्रत्यक्ष तिबेटच्या दैनदिन राजकारणात पंचेन लामाला कधीच काडीची सत्ता नसे. अर्थात हे शल्य पंचेन लामाच्या मनात डाचत असणे स्वाभाविक होते. १९१० मध्ये चिन्यानी जेव्हा प्रथम तिबेटवर स्वारी केली तेव्हा त्या वेळेचा तिबेटचा तेरावा दलाई लामा भारतात पळून गेला. ही संधी साधून चिन्यांनी त्या वेळेच्या पंचेन लामाला हाताशी धरून दलाई लामाच्या पश्चात् त्याला काही अधिकार दिले. चिन्याच्या दुर्दैवाने त्यानतर ल्हासात बंड होऊन तिबेटी जनतेने चिनी सैन्याला तिबेटबाहेर हुसकले व तेरावा दलाई लामा पुनः ल्हासात दाखल झाला. पूर्व तिबेटचा कबजा मात्र चीनने सोडला नाही व त्याच्या आश्रयाला पंचेन लामा पळून गेला. १९३७ सालापर्यंत चिनी सरकारच्या कच्छपी राहून पचेन लामा अखेर दुःखात मरण पावला.

१९५० सालापर्यंत दिवंगत पंचेन लामाने कुठे जन्म घेतला याचा तपास कुणी केला नाही. कारण पंचेन लामाचा वारस शोधण्यास सुरवात केली तर चिनी सरकार आपले एखादे प्यादे तिबेटात घुसवील अशी शंका तिबेटी जनतेला होती. अखेर हे प्यादे पेकिंग सरकारने १९५० साली निर्माण केलेच! एका दहाबारा वर्षांच्या तिबेटी मुलाचा पंचेन लामा म्हणून पूर्व तिबेटात त्यानी पुकारा केला व त्या मुलाचे शिक्षण कम्युनिस्ट राजवटीत खास दरबारी पद्धतीने सुरू झाले. या पंचेन लामाला नगबो यानी पेकिंग यात्रेत दडपणाखाली केवळ मान्यता दिली व चिन्यांचा डाव बरोबर दान पडून रंगू लागला. चिनी वर्चस्वाखाली आणि कम्युनिस्ट विचारसरणीत वाढलेल्या आणि शिकलेल्या या पचेन लामाची निष्ठा पेकिंगपाशी गहाण होती. जेव्हा पेकिंगमध्ये कम्युनिस्ट राजवट एखादा सोहळा घडवी त्या त्या वेळी हाच पंचेन लामा—जो केवळ दहा अकरा वर्षांचा होता—हा तिबेटी जनतेच्या वतीने अभिनदनाच्या तारा पेकिंगला धाडी.

१९५३ मध्ये प्रथम या पंचेन लामाला लाल चिनी सरकारने दलाई लामाच्या भेटीला आणले. दोघाचे तिबेटी रक्त अखेर एकमेकांकडे ओढले जाऊ लागले. या दोघात खरोखरीच काही लागाबाधा निर्माण होऊ लागला की काय अशी लाल भाईंना शंका आली. त्यानी दोन्ही लामात शक्यतो दुरावा राहावा या हेतूने दोघाना मोकळेपणाने बोलूही दिले नाही. दलाई लामा सांगतात—

" The Chinese were trying to do in our generation exactly, what they had failed to do in the last; and this time it has certainly been an advantage to them to have a Tibetian religious leader in whose name they can make their proclaimations. But the Panchen Lama cannot be personally blamed. No boy, who grew up under such concentrated constant alien influence could pessibly retain his own free will. And in spite of this influence I do not believe he will ever quite abandon our religion in favour of communism."

[आमच्या मागील पिढीच्या बाबतीत चिन्याना जे साधले नव्हते ते आमच्यात फूट पाडण्याचे कारस्थान या वेळी साधावयाचा त्याचा बेत होता आणि या वेळी तिबेटी जनतेचा एक धार्मिक नेता त्याच्या

कच्छपी असल्यामुळे त्याच्या नावावर स्वत.चे म्हणणे खपवणे या वेळी त्यांना सोपे जाणार होते. अर्थात् याला पंचेन लामा हे वैयक्तिक रीत्या दोषी नाहीत. कारण ज्या मुलाच्या बाळपणचा सर्व काळ वेधपूर्वक आणि योजनापूर्वक लादलेल्या परकीय संस्कारात गेला आहे, अशा मुलाच्या ठिकाणी स्वतंत्र विचारशक्ती शिल्लक असणेच संभवत नाही. हे सर्व जरी गृहीत धरले तरी पंचेन लामा हे आमचा धर्म सोडून त्याच्या बदल्यात कम्युनिस्ट विचारसरणी कवटाळतील असे मला मुळीच वाटत नाही. ]

पंचेन लामावर एवढा उदंड विश्वास असल्यामुळे दलाई लामांनी त्यांना सुखेनैव आपल्या परिवारात सियान या मुक्कामी दाखल करून घेतले व ही सर्व मंडळी आगगाडीने पेकिंगकडे निघाली.

**पेकिंगमध्ये . . .**

पेकिंगवारीचे वर्णन दलाई लामाच्या शब्दातच वाचणे योग्य होईल. माओच्या दरबारी काय घडले ते वर्णन करताना दलाई लामा लिहितात—

"आम्ही पेकिंगला पोचलो तेव्हा सायंकाळ झालेली होती. चिनी कम्युनिस्ट पार्टीचे उपाध्यक्ष च्यू तेह यांनी आमच स्वागत केल. व आमच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. जवळजवळ दोनशे माणसासाठी खाण्यापिण्याची सोय केलेली होती. सगळा थाट मोठा ऐषआरामी वाटत होता. सर्व उची चिनी खाद्यपदार्थ मांडलेले होते. चिनी मद्य चषकातून डचमळत होते. च्यू तेह यानी सत्काराच भाषण केल. तिबेटी जनता पुन: आपल्या मातृभूमीला येऊन बिलगली याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. चीनच सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करील अस आश्वासनही दिल. मला हा सर्वच अनुभव नवीन होता. या सर्व चिनी बड्या सरकारी अधिकाऱ्याशी मी नेमक कस वागाव हेच मला समजत नव्हत. एकच गोष्ट समाधानाची होती. प्रत्येकजण अत्यंत नम्रतेन आणि आदरान वागत होता. अनेक इतर लोक त्या वेळी हजर होते. त्यामध्ये 'लिशाओ' ची हे हल्लीचे प्रजासत्ताकाचे अध्यक्षही होते. माझ्याबरोबर चारपाच तिबेटी अधिकारी होते.

"तिबेट मातृभूमीला येऊन परत मिळाला याबद्दल माओनी सुरुवातीलाच आनंद व्यक्त केला. तिबेटमधील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग तिबेटच्या विकासासाठी करणे हाच चीनचा हेतू आहे अस ते म्हणाले. कोणत्याही प्रकारे आपल वर्चस्व तिबेटी जनतेवर लादण्याची आपली इच्छा नाही अस म्हणून त्यानी मला विचारल, 'तिबेटमधील माझे अधिकारी तुमच्या इच्छेविरुद्ध वागतात काय ?'

"आपण कठीण परिस्थितीत सापडलो आहोत याची मला जाणीव झाली पण सलोख्याच वातावरण ठेवण हेच तिबेटच्या हिताच आहे हे लक्षात घेऊन मी त्याना सागितल,

'तिबेटी जनतेला आपल्या नेतृत्वाखाली उज्ज्वल भवितव्य पाहावयास मिळेल अशी मला आशा वाटते.'

"माझी माओंबरोबरची दुसरी मुलाखत जवळजवळ तीन तास चालली होती. दुभाष्याखेरीज दुसर कोणीच आमच्याबरोबर नव्हत. तिबेट व त्याच भवितव्य याविषयीच आम्ही पुष्कळस बोललो. तिबेटमध्ये नुकत्याच झालेल्या घटनाचा आढावा आम्ही घेतला व मी पाहिलेल्या घटना त्याना सांगितल्या. आमच्या भूमिकेविषयी माओच्या मनात काही गैरसमज राहू नये याची मी काळजी घेतली. त्याच्या मनात आमच्याविषयी विश्वास निर्माण करण्याचा मी प्रयत्न केला. दुराग्रही भूमिका घेऊन आपल चालणार नाही याची पूर्ण खूणगाठ मी मनाशी बाधून ठेवली होती.

"मी त्याना जे सागितल ते ऐकून माओ खुश झालेसे दिसले. ते म्हणाले, 'एक वेळ अशी होती की तिबेटचा कारभार चालविण्यासाठी चिनी सरकारच्या अमलाखालील एक राजकीय व सैनिकी समासदांची कमिटी नेमण्याच आम्ही ठरवल होत. पण आता ते आवश्यक वाटत नाही. त्याऐवजी आता आम्ही तिबेटी प्रतिनिधीचच एक मडळ नेमण्याच ठरवल आहे.

"त्यांनी माझ याबद्दल मत विचारल. हा विषय फार मोठा असल्यामुळ आपणाला तिबेटी जनतेची तसेच पचेन लामा यांची काय प्रतिक्रिया आहे तें पाहाव लागेल अस मी उत्तर दिल.

"थोडयाच दिवसानतर माओ मला एक तासाची सूचना देऊन भेटायला आले. आपण सहजच आलो अस ते प्रथम म्हणाले. नंतर बौद्ध धर्म हा चांगला धर्म आहे व बुद्धान जनतेच्या सुखासाठी फार प्रयत्न केले असे ते म्हणाले. थोडयाच वेळात माओ गेले. त्याचे शेरे ऐकून मी बुचकळ्यात पडलो. त्यांचा अर्थ काय होता कोणास ठाऊक!"

**माओचे व्यक्तिमत्त्व**

"माझ्या चीनमधील दौऱ्याच्या शेवटी शेवटी माझी या विलक्षण नेत्याबरोबर शेवटची मुलाखत झाली. त्या वेळी चीनमधील बऱ्याचशा प्रांतांना मी भेटी दिल्या होत्या. चीनमधील विकासयोजना पाहून आपण प्रभावित झाल्याच मी माओंना सागितल. मग त्यांनी मला लोकशाहीच खर स्वरूप काय यावर एक व्याख्यानच ऐकवल. नंतर माझ्या खुर्चीजवळ हळूच सरकून ते म्हणाले, "मी तुमची भूमिका ओळखू शकतो पण खर म्हणजे एखाद्या वंशाला तो नेस्तनाबूत करून टाकतो व दुसरा दोष म्हणजे राष्ट्राचा विकास त्यामुळ खुटतो. तिबेट व मंगोलिया या दोन्ही देशावर धर्माचा विषप्रयोग झालेला आहे."

माओचे हे वक्तव्य ऐकून दलाई लामा अगदी सर्दच झाले. माओ धर्माचे कट्टर शत्रू आहेत हे त्यानी ओळखले. पण बोलताना ते अगदी मित्रत्वाने व प्रेमाने वागत होते. निरोपाच्या वेळी दलाई लामाना त्यांनी प्रकृतीची काळजी घेण्याचा उपदेश केला.

माओच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाबद्दल व बौद्धिक सामर्थ्याबद्दल दलाई लामा काय म्हणतात ते पाहण्यासारखे आहे.

"Before I left China I was firmly convinced of Mao Tse Tung's outstanding personality. His appearance gave no sign of his intellectual power. Yet his manner of speech certainly captured the minds and imagination of his listeners and gave the impression of kindness and sincerity. I was sure that he believed what he said, and that he was confident of achieving whatever object he had in view; and I was conscious that he himself would never use force to convert Tibet into a communist state. Certainly, I was disillusioned afterwards by the policy of persecution which was

adopted by the Chinese authorities in Tibet."

[चीन सोडण्यापूर्वी माओच्या व्यक्तित्वाचा निश्चित ठसा मला गवसला होता. अनेक सामाजिक प्रसंगाच्या वेळी तर मी त्यांना भेटलोच, परंतु त्याशिवाय बऱ्याच खासगी भेटीचाही योग आला होता. त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून त्याच्या बुद्धिमत्तेची काही कल्पना येत नाही. त्याची प्रकृती सुदृढ वाटली नाही. सारख्या धापा टाकाव्या लागून श्वासोच्छ्वास करताना त्याला अडचण पडत असावी. कपड्यालत्त्यांकडे त्याच खास लक्ष नसाव. एकदा त्याच्या डगल्याच्या अस्तन्या उसवलेल्या आहेत हे माझ्या ध्यानात आल. पायातल्या बुटांना तर कधीच पॉलिश केलेल नसाव. त्याच्या हालचाली मद होत्या आणि बोलण अत्यंत धीम होत. शब्दावर त्याची फारशी हुकमत नसावी. कारण छोटी छोटी वाक्यच बोलण्यात होती. तरी पण बोलण मात्र स्वच्छ व मोजक होत. बोलताना तो सतत धूम्रपान करीत असे. परंतु त्याच्या बोलण्याची पद्धतच अशी होती की श्रोत्याच्या मनावर तत्काळ परिणाम होऊन श्रोत्याच्या कल्पनाशक्तीवर त्याला लगेच कबजा करण्यात यश येत असे. शिवाय बोलण मोठ आर्जवी व मनापासूनच वाटत असे. बोलण्यात आत्मविश्वास भरपूर आणि ठरवलेली गोष्ट घडवीनच अशी जिद्द असे. त्याच्या बोलण्यावरून माझी अशी खात्री झाली की तिबेटवर कम्युनिस्ट सत्ता लादण्यासाठी माओ बळाचा वापर करणार नाही. अर्थात पुढ चिनी अधिकाऱ्यानी तिबेटात जी खुनशी वृत्ती दाखवली तेव्हा माझा यथावकाश भ्रमनिरास झाला. परंतु या सर्व वाईट कृत्यांना माओची संमति असावी यावर अजून माझा विश्वास नाही.]

चिनी कम्युनिस्टाच्या प्रभावळीतील (hirarchy) दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे पंतप्रधान चौ एन् लाय. त्याच्याविषयी दलाई लामांचे अगदी वेगळेच मत झाले. चीनमधील वास्तव्यात बऱ्याच वेळा त्याचे दलाई लामाशी थोडेफार बोलणे झाले. त्यांच्यासंबंधी दलाई लामा सांगतात—

"चौ एन् लाय मला नेहमीच माझ्याशी मैत्रीच्या भावनेने बोलताना आढळले. पण माओइतके ते खुल्या दिलाचे वाटले नाहीत. ते अतिशय नम्र व सौजन्यशील वागत होते. पण स्वतःवर त्याचा कमालीचा ताबा होता. हातात घेतलेल्या योजना तडीस नेण्यासाठी भल्याबुऱ्या मार्गांचा अवलब करण्यास ते मागपुढ पाहणार नाहीत, हे मात्र मला कळून चुकल. म्हणूनच तिबेटमधील दडपशाहीच्या धोरणाला चौ एन् लाय याची समती होती हे कळल्यावर मला बिलकुल आश्चर्य वाटल नाही."

## नेहरूंशी विषादपूर्ण दृष्टभेट

नेहरूना प्रथम भेटण्याची संधीदेखील दलाई लामाना प्रथम पेकिंगमध्येच मिळाली. नेहरूंच्या या प्रथम भेटीचा योग, त्याचा एक हात चौ एन् लायच्या गळयात असताना यावा हा योगायोग पुढील घटनांचा सूचक तर नसावा? वाडुग परिषदेचे पडघम वाजू लागले होते. 'हिंदी–चीनी भाई भाई'च्या गर्जना अधूनमधून दिल्लीत उठू लागल्या होत्या. म्हणूनच दलाई लामा सांगतात —

"खर म्हणजे पेकिग ही जागा आमच्या भेटीसाठी कुयोग्य होती. चौ एन् लायनी माझी नेहरूशी ओळख करून दिली. ते विचारात गढलेले व जरा वेळ काही बोललेच नाहीत. आपल नाव व कीर्ती तिबेटसारख्या एका जगाशी संबंध सुटलेल्या एकाकी देशापर्यंतसुद्धा पोचली आहे व म्हणून आपल्याला भेटण्याच फार दिवस मनात होत अस मी त्याना सांगितल. किंचित् हसून त्यांनी मला प्रतिसाद दिला. चीनमध्ये झालेल आमच हे एवढच संभाषण!"

या भेटीच्या वेळी दलाई लामा हे कोवळे पोरच होते. परंतु नेहरू जाणकार होते ना! नेहरूनीदेखील आपली फारशी विचारपूस केली नाही. याचा विषाद दलाई लामांनी लपवून ठेवलेला नाही. ते स्पष्ट लिहितात —

"There were reports that I had private talks with him but I did not; nor did he ask me whether there was anything India could do to help Tibet. I very much wanted his advice and help."

[त्या वेळी अस प्रसृत झाल होत की नेहरूंच व माझ खाजगी बोलण झाल. परंतु मी त्यांशी बोललो नाही की नेहरूनी मला विचारल नाही की तिबेट संकटात असताना भारत काही मदत करू शकतो काय? मला मात्र त्याच्या सल्ल्याची व मदतीची अत्यंत गरज होती.]

परतु नेहरूना त्या वेळी चाऊमाऊच्या मैत्रीची अधिक तहान होती. 'बळी अबळाते खाये' या न्यायाने तिबेटवर प्राणसंकट गुदरले आहे व आपल्या मदतीला धावून येणारा त्राता देश म्हणून भारताकडे तिबेट दीनवाणेपणाने पाहात आहे, याकडे नेहरूंनी म्हणूनच त्या वेळी काणाडोळा केला. न जाणो, दलाई लामांना सहानुभूती दाखवली आणि चाऊ बिघडला तर? मग हिंदी चिनी भाईंत उगाच संघर्ष व्हावयाचा!

## नैवेद्य कसला दाखवता?

दलाई लामांनी पेकिंग सोडण्यापूर्वी पंचांगाप्रमाणे आलेल्या नव्या वर्षदिनी मेजवानी दिली. माओ या जेवणाला हजर होता. सर्व तिबेटी आन्हिके करण्यात आली व जेवायला सुरुवात होण्यापूर्वी एक प्रसग घडला. तिबेटी लोकांचे पापभीरू मन आणि माओच्या विचारांच पाखडी प्रदर्शन या प्रसंगी झाल. दलाई लामांनी हा प्रसंग वर्णन केला आहे—

"It is our custom to take a small piece of the cake and throw it up to the ceiling as an offering to Buddha. When Mao Tse Tung was told of this custom, he threw up a piece to the ceiling and then with a mischivous expression he threw another piece down on the floor."

[आमची अशी पद्धत आहे की खायला सुरुवात करण्यापूर्वी केकचा लहानसा घास छताच्या दिशेने उधळावयाचा. हा बुद्धदेवांना आम्ही नैवेद्य समजतो. जेव्हा माओ यांना आमची ही रूढी आम्ही सांगितली, तेव्हा त्यांनी केकचा लहानसा तुकडा छताच्या दिशेने भिरकावला आणि पाठोपाठ मिस्किल नजरेने पाहात आणखी एक लहानसा तुकडा त्यान जमिनीवर हाणला.]

दलाई लामानी कम्युनिस्ट पक्षाच्या काही बैठकी पाहिल्या. तिथे सगळा कारभार अरेरावीचाच असे. पार्टीच्या धोरणाविरुद्ध शब्द नाही. सतत स्तुती! चीनच्या कमावलेल्या शक्तीची; प्रगतीची आणि त्या अनुषगाने लाल तत्त्वज्ञानाची!! भाषणाची नेत्यांना

भारी हौस. काहीही विशेष सांगण्यासारखे नसले तरी भारतीय पुढारीदेखील तेच तेच दळण लावतात असा ब्रिटिश मुत्सद्यांना जसा अनुभव आला तसाच अनुभव दलाई लामांना चिन्यांचा आला. या एका बाबतीत 'हिंदी चीनी भाई भाई' खरे ! पेकिंग मधून परतीच्या मार्गावर असताना चेंगटू या गावी मार्शल चेन यी व चौ एन् लाय याची दलाई लामांशी गाठभेट झाली. दलाई लामांना चीनमध्ये फिरते ठेवल्यावर पुढचा मासा गळाला लावण्याकरिता बांडुग परिषदेला गेलेली ही दुक्कल परतली होती व चेंगटू येथे त्यांच्या भाषणाचा योग दलाई लामांना साधता आला. तीनचारशे लोकच सभेला होते. चौने भाषण केले ते किती तास ! पाच तास चौ बोलत होते ! पोळघातून मध ठिबकावा तसे शब्द सतत पाच तास गळत होते. चेन यी तर म्हणे सात ते आठ तास बोलतात ! धन्य ते श्रोते आणि धन्य ते नेते !

### आदर्श सरकारी कचेऱ्या

परतु एकंदर नव्या चीनचा मुखवटा पाहिल्यानतर दलाई लामावर जो परिणाम झाला तो मात्र कौतुकाचा होता. ते म्हणतात— " I must say that the whole country had an air of efficiency. " सर्व देशावर सफाईदार कार्याची कळा चढलेली होती. प्रगतीचे वातावरण सर्वत्र दिसत होते. " The Govt. Depts were well organised and prompt. I must also say that the ignorant workers seemed at that time to be satis. fied..."

सरकारी कचेऱ्यात आजिबात गोंधळ नव्हता. सर्व खाती सुसंघटितपणे आणि तत्परतेने काम करीत होती. सरकारी खाते आणि सुसूत्रता, सरकारी खाते आणि तत्परता या दोन गोष्टी भारतात एकत्र येणे कठीण. काय बिशाद समोर आलेला कागद सरकारी कारकून तत्परतेने वाचील आणि योग्य ती कृती करील ! पण चीनमध्ये सरकारी कचेऱ्या सुव्यवस्थित होत्या आणि शिवाय सर्वसाधारण कमी शिक्षित कामगार निदान त्या वेळी तरी समाधानी दिसत होता. यातील कमी शिक्षित हा शब्द महत्त्वाचा आहे. कम्युनिस्ट जगात सर्वत्र आढळते त्याप्रमाणे " It was among the literate people that one ever had a sense of hidden dissatisfaction. " जो शिक्षित वर्ग होता त्याच्यात वावरताना मात्र कुठे तरी असमाधानाचा सूर आहे ही गोष्ट ध्यानात येत होती. हे अर्थात अपेक्षितच आहे. समाजात सर्वांना समान संधी असावी, वर्गभेद नसावा, जातिभेदावर धोरणे आखली जाऊ नयेत, विषम अर्थव्यवस्था नष्ट व्हावी असेच कुणाही समंजस सुशिक्षिताला वाटत असते. प्रश्न येतो तो कम्युनिस्ट तत्त्वज्ञान स्वातंत्र्यसहारक ठरू लागते तेव्हा ! स्वातंत्र्य— सर्व प्रकारचे स्वातत्र्य—भाषणस्वातंत्र्य, जीवनस्वातंत्र्य, मतभेद ठेवण्याचे स्वातंत्र्य, आपल्या कर्तृत्वाचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य हीच सर्वांची भूक असते. या स्वातंत्र्याला नख लावल्याखेरीज विषमता नष्ट करण्याचा अन्य दुसरा मार्गच नाही का ? लोकशाहीचा मार्ग भारताने अगीकारला आहे. या मार्गाने थोडा वेळ लागला तरी समानता आणण्याचा भारताचा निर्धार आहे. परंतु कम्युनिझमखेरीज अन्य मार्गाने जाणारे हे सर्व साम्राज्यवादी आणि प्रतिगामी ठरवून त्याचे शिरकाण करण्याची स्वप्ने जर लालभाई उराशी बाळगून असतील तर ? प्रचड सघर्ष अटळ आहे.

दलाई लामानी या बाजूवर नेमके बोट ठेवले आहे. " Progress had cost the people all their individuality. They were becoming a mere homogeneous mass of humanity. They all spoke the same and behaved the same and I believe, all thought the same. " या प्रगतीची किंमत चिनी जनतेने काय दिली ? त्यातील घटकाचे स्वतंत्र व्यक्तित्वच सपुष्टात आले. जसा एक चिनी तसाच दुसरा. कपडे सारखे, बोलणे सारखे, वागणे सारखे आणि विचाराची कुवतही सारखीच ! सगळे जणू एकाच माळेचे मणी. परंतु हे होणे अटळच असत. वृत्तपत्रे, रेडिओ फक्त लाल सरकारने दिलेल्या बातम्यांसाठी आणि विचारासाठीच राबणार ? बाहेरील देशातील वृत्तपत्राना चीनमध्ये बदी ! लोकानी हसायचे कसे, केव्हा आणि किती हेदेखील जणू लाल सरकार ठरवते. चिनी जनतेने ही किंमत मोजून प्रगती पैदा केली. त्याना ती परवडली की नाही हे भविष्यकाल ठरवील. परंतु भारतीय लोकाची ही भयानक किंमत देण्याची तयारी नाही. दलाई लामा सांगतात—

" I could not believe that the Chinese would ever succede in reducing Tibetian to such a slavish state of mind. "

तिबेटी लोकांवर अशा तऱ्हेची गुलामी लादण्यात चिन्याना कधी यश येईल असे दलाई लामांना वाटत नाही.

### बुडत्याला काडी लाभली

ल्हासाला परतताना अनेक विचारांनी दलाई लामांना ग्रासलेले होते. एकदा त्यांना वाटे, की आपली चीनची वारी यशस्वी झाली. आपला नेमका झगडा ज्याच्याशी आहे त्याचे नेमके स्वरूप आता त्यांना समजले होते. माओच्या आश्वासनाप्रमाणे तिबेटी लोकाना थोडीफार स्वायत्तता आता मिळणार होती. एक्कावन्न सभासदांच्या राज्यकारभार पाहणाऱ्या या नव्या समितीचे अध्यक्षपद दलाई लामांकडे होते. मात्र पंचेन लामा हा उपाध्यक्ष होता. नगबो हे चिटणीस होते. पाच सभासद पेकिंगहून येणार होते. बाकीचे सभासद तिबेटच्या निरनिराळ्या भागातून निवडावयाचे होते. या कमिटीचे बावनखणी स्वरूप त्यात घुसवलेला पंचेन लामा आणि पूर्व तिबेटातून येणारी सभासदसख्या पाहता या कमिटीला फक्त पेकिंगच्याच तालावर नाचावे लागणार आहे हे दलाई लामांच्या लक्षात आले होते. परंतु ते म्हणतात, " People in desperate situations are always ready to cling to the slightest hope. " बुडत्याला काडीचादेखील आधार वाटतो या न्यायाने दलाई लामा या कमिटीच्या कार्यक्षेत्राकडे आशेने पाहत होते. त्यांचे मन मात्र निराशेने काळवंडलेले होते. अशुभाची चिन्हे त्याना स्पष्ट दिसत होती.

दलाई लामा ल्हासाला पोचले. त्यांच्या गैरहजेरीत चिनी लश्करी अधिकाऱ्यांशी तिबेटी सरकारने आपले संबध बिघडू दिले नव्हते. परतत असताना खंपांच्या प्रदेशांत दलाई लामाना पुढे होणाऱ्या घटनाची थोडी चाहूल लागली होती. चिनी लवकरच खंपाची बंदूक व इतर हत्यारे काढून घेणार आहेत अशी बातमी पसरली होती व निःशस्त्र न होण्याचा खपा जमातीचा निर्धार होता.— " A Khampa would never surrender his rifle— he would use it first. " कुणी बंदूक हिसकूच लागले तर खंपा प्रथम गोळी झाडतील याबद्दल

शंका नव्हती. दलाई लामा अधिकच चिंताक्रांत होते.

ल्हासात लगेच कमिटीची गडबड उडाली. समासदाच्या निवडणुका व नेमणुका झाल्या. चिनी प्रतिनिधी आले. साल १९५६ होते. महिना होता एप्रिलचा.

मार्शल चेन यी कमिटीचे उद्‌घाटन करण्यासाठी आले. सर्व योजना अगदी आकर्षक होती. तिच्यातील बहुतेक समासद तिबेटी होते. ही कमिटी एक कार्यक्षम असे सरकारच होईल अशी दलाई लामांना आशा होती. तिबेटी अधिकाऱ्यांना चिनी अधिकाऱ्यांपासून राज्यकारभार कसा चालवावा याचे चागले शिक्षण मिळेल असे वाटत होते.

पण प्रत्यक्षात या अपेक्षा फोल ठरल्या. कमिटीमधील २० सभासद पंचेन लामाचे होते. ते चिन्यांचे हस्तक होते. शिवाय ५ चिनी सभासद. परिणाम कमिटी म्हणजे तिबेटी प्रतिनिधित्वाचा एक देखावा झाला व पेकिंग सरकारला आपली शक्ती वापरण्याचे हे एक प्रभावी साधन झाले.

उन्हाळा सुरू झालेला असल्यामुळे दलाई लामा पोटाला राजवाडा सोडून नॉरबुलिंगका – रत्नबाग ( Norbulingka-Jewel Park.) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उन्हाळी राजवाड्यात राहू लागले होते. राजवाड्याच्या अंतरंगात कुणी डोकावून पाहिले असते तर मात्र तिबेटवर प्राणसकट कोसळले आहे, याची कल्पना कुणालाच आली नसती. रत्नबागेतील सर्व धार्मिक कृत्ये यथासांग पार पडत होती. " Close outside its walls the Chinese military camp still menaced us, but inside all was still and calm and beautiful and our religious practices continued almost undisturbed. "

ज्वालामुखीवर कुणीतरी ध्यानाला बसावे तसा हा सगळा प्रकार होता. राजवाड्यात वातावरण कसे शांत व सुंदर होते. धार्मिक व्यवहार नेहमीप्रमाणे सुरू होते. राजवाड्याबाहेर मात्र चिनी सैन्य फास टाकून दबा धरून होते.

राजवाडा आतून शांत होता व बाहेरून ग्रहण लागलेला होता. ल्हासातील जनता मात्र चिन्यांच्या द्वेषाने पुरती भारली गेलेली होती. आपली चीड व्यक्त करण्याची त्यांना संधी मिळताच – लोकांचा एखादा जमाव चिनी सैनिकांवर किरकोळ हल्लेही करीत होता– नेत्याकरिता थांबण्याची आता जनतेला आवश्यकता वाटत नव्हती. जनतेनेच आपले नेते आता मुक्रर केले. या नेत्यांचा तिबेटी कमिटीशी व दलाई लामांशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. परंतु दलाई लामांवरील प्रेमाखातर आणि चिन्यांचे ल्हासातील अन्यायकारक अस्तित्व सहन न झाल्याने जनता बिथरलेली होती. याची तिबेटी मंत्रिमंडळाला जाणीव होती.

ल्हासात अशी तंग परिस्थिती असतानाच तिबेटच्या चामडो ( Chamdo ) विभागातून भीतिदायक वृत्त आले. त्या विभागातील सुमारे ३५० तिबेटी प्रतिष्ठितांची बैठक पचेन लामा यांनी बोलावली व बहुसंख्य सभासदांचा विरोध असतानाच पेकिंगच्या कम्युनिस्ट सरकारने सुचविलेल्या सुधारणा अंमलात आणण्याचा विचार स्पष्ट केला. प्रतिनिधींनी सांगितले की या सुधारणांमुळे तिबेटच्या सरहद्दीपलीकडे लोकांचे जे हाल झाले ते आम्ही पाहिलेले आहेत. तेव्हा या लोकशाही सुधारणा आम्हाला नकोत. जवळजवळ पंधरा दिवस या सर्व प्रतिनिधींना– बैठकीच्या जागी म्हणजे जोमदा किल्ल्यातच कोंडून धरण्यात आले व चिनी अधिकारी त्यांची आळवणी करू लागले. अखेर निराशेने ही बैठक चिन्यांनी संपविली.

### संघर्षाच्या ठिणग्या

बैठकीहून पुन: जनतेत आल्यावर या पुढाऱ्यांनी लोकांना सांगितले, चिन्यांशी वाटाघाटी शक्य नाही. समोरासमोर चिन्यांशी सामनाही शक्य नाही. परंतु आसपासच्या डोंगरदऱ्या आप या आहेत. या भागात चिनी सैन्याचा खातमा उडवायला वेळ किती ? उठा आणि शस्त्रास्त्रे घेऊन कडेकपारीकडे चला. गनीम फार माजोर आहे. शस्त्रास्त्रे घेऊन धडधाकट तिबेटी डोंगरात पळून गेले. खपांनी चिनी सैन्यावर एकएकटे गाठून छापे घालायला सुरवात केली होती. या लढाईत जसा चिनी सैन्याचा पराभव शक्य नव्हता तसाच खपांचा बीमोडही शक्य नव्हता.

लुखाग्वांना बडतर्फ करून जो संघर्ष दलाई लामा टाळू पाहत होते तो टळला नाही. दोन वर्षांच्या आत या संघर्षाला असे उग्र रूप आले. खुषामतखोरीचे धोरण नेहमी माणसाला आणखी पागळे करते. दलाई लामांची आता तीच अवस्था झाली, पश्चात्तापदग्ध अवस्थेत ते लिहितात–

"मी अगदी कष्टी झालो. परिस्थिती आता फारच खालावली होती. लोक हिंसेच्या मार्गाचा अवलंब करीत होते. धार्मिक गुरू व धार्मिक नेता म्हणून माझ्या दुहेरी स्थान यांना त्यामुळे धक्का मिळाला. लोकांच्या हिंसक प्रवृत्तीला आळा घालण आपल कर्तव्य आहे अस मला वाटल. माझ राजकीय नेतृत्व चिनी नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे मी जाणून होतो. उलट लोकांच्या हिंसात्मक चळवळींना विरोध करून मी एक प्रकारे चिन्यांना मदतच करीत होतो. राजकीय नेता म्हणून माझ स्थान गेल तरी हरकत नाही पण धार्मिक नेता हे माझ स्थानही नाहीस होणार ही कल्पनाच मला सहन होईना. राजकीय चळवळीतून मी अंग काढून घेण, हे तिबेटच्या अंतिम हिताच आहे अस माझ मन मला सांगू लागल. पण जोपर्यंत मी तिबेटमध्ये आहे तोपर्यंत तेदेखील शक्य नव्हत. त्यासाठी मला माझ्या प्रिय मातृभूमीला रामराम ठोकावा लागला असता. केवळ कल्पनेत अस करण मला, तिरस्करणीय वाटत होत."

### भारतभेटीचे आवतन

मनाच्या या हतवीर्य अवस्थेत असतानाच भारतभेटीच्या निमंत्रणाचा खलिता राजवाड्यात दाखल झाला.

भारतात त्या वेळी बुद्धजयंतीचा उत्सव तोंडावर आला होता. येथील महोबोधी परिषदेतर्फे बुद्धजयंतीचे प्रमुख पाहुणे म्हणून सिकीमच्या महाराजामार्फत दलाई लामांना निमंत्रण आले होते. स्वत: सिकीमचे महाराज हे निमंत्रण देण्याकरिता नॉरबुलिंगका राजवाड्यात दाखल झाले.

भारतीय पुढाऱ्यांना भेटण्याची ही चालून आलेली संधी दलाई लामा कसे नाकारतील ? भारताच्या नेतृत्वाकडे केवढ्या आशेने ते पाहत होते ! आजतागायत दिल्लीपतींच्या आत्मघातकी आणि भ्रान्त परराष्ट्रीय धोरणामुळे तिबेटच्या पदरी घनघोर निराशा आलेली होती. याचा स्पष्ट निर्देश दलाई लामांनी केला आहे. ते सांगतात–

" For a long time we had friendly contacts with the British govt. of India; in fact that had been our only contact with the Western world. But since the transfer of power in India to the Indian Government, the political contact with India had faded away. "

[ गेली कित्येक वर्ष आमचा भारतातील ब्रिटिश सत्तेशी मित्रत्वाचा सबंध होता. खर सागायच तर पाश्चात्य जगाशी एवढाच काय तो आमचा धागा शिल्लक होता. परतु भारतात सत्तातर होऊन भारतीय सरकार अस्तित्वात आल्यापासून हे राजकीय संबंध क्षीण होत गेले. ]

महोबोधी परिषदेचे निमत्रण पोचताच भारताला निघता येईल एवढे स्वातंत्र्य आता दलाई लामाना कुठे होते ? चीन सरकारची परवानगी मिळवण्यासाठी त्यानी ल्हासामधील चिनी लष्करी जनरल फॅन मिग याच्याजवळ बोलणे सुरू केले. जनरल मिग यानी सागितले—

सुरक्षिततेचा विचार करता भारताला तुम्ही भेट देण योग्य नाही. कमिटीचा अध्यक्ष या नात्यान तुम्ही ल्हासात असणच योग्य. शिवाय निमत्रण महोबोधी परिषदेच आहे. भारत सरकारन काही निमंत्रण दिलेल नाही.

### दलाई आला तर पंचेनही हवा हो !

या सर्व बारा वयादी चिन्यांनी सुरू केल्या. ऑक्टोबर १९५६ पर्यंत दलाई लामानी निमत्रण स्वीकारले नव्हते वा नाकारलेही नव्हते. परंतु भारताच्या परराष्ट्रीय खात्यांत कुणीतरी चलाख माणसाने, थोडा शहाणपणा दाखवून दलाई लामाना भारतभेटीचे निमंत्रण तेवढयात दिले. वस्तुतः याच वेळी पंचेन लामाना बोलावण्याची काही आवश्यकता होती का ? परंतु फक्त दलाई लामांना बोलावले आणि चाऊ रागावला तर ? चिन्याना दुखवायचे नाही हीच तर सगळी परराष्ट्रनीती. तेव्हा निमंत्रण दलाई लामाना आणि पचेन लामानाही गेले.

दलाई लामाना भारतभेटीची अनुज्ञा मिळाली. जनरल चाग चिन वू यानी दलाई लामांची जातीने भेट घेतली आणि सागितले—

" भारताला जाता आहात. जा. परंतु नुकतीच हगेरी व पोलंड मध्ये झालेली बंड चिरडून टाकण्यात आली हे लक्षात ठेवा. बाहेरच्या साम्राज्यवाद्यानी चिथावणी दिली म्हणून ही लालसत्तेविरुद्ध बंड झाली. परंतु सोविएट रशियान ती हगेरिअन आणि पोलिश जनतेच्या हिताकरिता पार चिरडून टाकली. हे प्रतिगामी लोक नेहमी साम्यवादी देशात बंडाळी माजवण्याची संधी पाहत असतात...."

दलाई लामांना प्रथम हे कळेना की, हा हगेरी कोण ? पोलड कोण ? तिथे बड का झाले ? रशियाचा तिथे काय सबंध ? मग त्याचा ध्वन्यर्थ त्याच्या ध्यानात आला की भारताला तिबेटमध्ये तुमच्या आधाराने हस्तक्षेप करण्याची दुर्बुद्धी होऊ नये हे चागले ! पण जर ती झालीच तर चिनी सरकार हा हस्तक्षेप मुळापासून उखडून टाकल्याखेरीज राहणार नाही· कारण तिबेट आता साम्यवादी देश आहे आणि भारत साम्राज्यवाद्याच्या वर्चस्वाखाली असलेला प्रतिगामी देश आहे·

जनरल चांग चिन वू यानी मुख्य कानमत्र दिला तो असा—

" जर कुणी भारतीय पुढाऱ्यानी भारत-तिबेट-सरहद्दीबाबत प्रश्न विचारले तर तो प्रश्न पेकिंगच्या परराष्ट्र खात्याच्या अखत्यारात आहे अस तुम्ही सांगा. तिबेटात सध्या असलेल्या अस्वस्थतेविषयी कुणी विचारल तर— थोडीशी कुरबूर झाली परतु आता सर्व ठीक आहे— अस मोघम सांगा. समजा प्रत्यक्ष नेहरूनीच किंवा तत्सम नेत्यानी काही खोदून विचारल तर थोडफार अधिक सागा की काही भागात उठाव वगैरे झाले परतु आता ठीक आहे. "

एवढया पढवणुकीनतर दलाई लामा भारत भेटीसाठी निघाले. चिन्यांनी आता तिबेटात पक्क्या सडका बाधण्याचा धडाका उडवला होता. दोन दिवसात दलाई लामा ल्हासाहून यादुगला पोचले. ब्रह्मपुत्रा ओलाडण्यापूर्वी पचेन लामा दलाई लामाना येऊन मिळाले आणि मग हिमालयाच्या खिंडीतून तट्टाच्या पाठीवरून पन्नास मैलाचा उतार सुरू झाला. चुबी खोऱ्यातून ही वाट येते. याच वाटेवरून ब्रिटिश सैन्ये जिन्सीपर्यंत १९०३ मध्ये पुढे गेली होती.

दलाई लामांचे गंगटोक येथे सिकीमच्या महाराजानी स्वागत केले. सिकीममधील भारतीय दूताने त्यांना भारताचे अध्यक्ष पंतप्रधान याच्या वतीने पुष्पहार घातले.

दलाई लामांना घेऊन येणारे विमान जेव्हा दिल्ली विमानतळावर दिसू लागले तेव्हा विमानतळावर भारताचे त्या वेळचे उपराष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् त्याच्या स्वागताकरिता विमानतळावर हजर होते. पंतप्रधान नेहरूही दलाई लामाची वाट पाहत होते.

थाटाचे स्वागत झाले. दुतर्फा दिल्लीकराच्या मार्गातून वाट काढीत दलाई लामा व डॉ. राधाकृष्णन् यांची मोटर राष्ट्रपतिभवनात दाखल झाली आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यानी मोठया प्रेमभराने त्याना भवनात नेले.

### राजघाटावरील अश्रुपात

दिल्लीतला पहिला कार्यक्रम नेहमीप्रमाणे राजघाटावर गांधीच्या समाधीला पुष्पहार घालण्याचा होता. अहिंसेचे दोन पाईक प्रथमच समोरासमोर येत होते. दलाई लामा आपली फिर्याद घेऊन गाधीजींच्यापुढे ठाकले असते तर गांधीजीनी फक्त वाटाघाटीचा सल्ला खात्रीने दिला नसता. त्यांनी चिन्यांची पर्वा केली नसती आणि चिनी सरकारला खडसावले असते—" तुम्ही पाप करीत आहात, जे तिबेटी जनतेला मान्य नाही, ते त्याच्यावर लादण्याचा तुम्हाला अधिकार नाही." परिणाम कदाचित् आता झाला तोच झाला असता. परतु गांधीजीची अहिंसा ही निर्भय होती. अधिक तेजस्वी होती. भ्याडाची नीतिशास्त्रे तिला संमत नव्हती. हिटलरला युद्धापासून परावृत्त करणारा, ब्रिटिश साम्राज्यशाहीला 'चालते व्हा' म्हणून निःसदिग्धपणे सागणारा भारताचा हा महात्मा लाल चिन्याचा अत्याचार मूग गिळून पाहत बसला असता असे संभवतच नाही आणि नेमका हाच विचार त्या दिवशी राजघाटावर महात्माजींच्या समाधीसमोर उभे राहताना दलाई लामाच्या मनात उसळून आला. ते सांगतात—

" As I stood there I wondered what wise counsel the Mahatma would have given me, if he had been alive. I felt sure he would have thrown all his strength of will and character into a peaceful campaign for the freedom of the people of Tibet. "

[राजघाटावर उभा असताना माझ्या मनात हेच सारखे येत होते, की महात्माजी आज जिवंत असते तर त्यांनी मला काय सल्ला दिला असता? माझी खात्री आहे की त्यांनी आपली सर्व शक्ती आणि व्यक्तित्व पणाला लावून शांततापूर्ण मार्गाने तिबेटी जनतेच्या स्वातंत्र्याकरिता चळवळ उभारली असती.]

सर्व व्यक्तित्व पणाला लावून मानवेल त्या मार्गाने प्रतिकारार्थ उभे राहण्याव्यतिरिक्त एकटा माणूस अन्य काय करू शकतो? महात्माजींनी हे निश्चित केले असते की जे त्यांच्या शिष्योत्तमानी करण्याचे नाकारले. नुस्ते नाकारले नाही तर जेव्हा तिबेटच्या मुक्ततेचा प्रश्न चर्चिला जाऊ लागला तेव्हा भारताचे भूतपूर्व संरक्षणमंत्री बोलले—

" तिबेट मुक्त करणे ही गोष्ट काय कँटीन्स उघडण्याइतकी सोपी आहे काय ? "

## नेहरूंची मुग्धता आणि उपदेश

दिल्लीचा मुक्काम आटोपून दलाई लामा भारताची यात्रा करून आले. बुद्धजयंति उरकली आणि मग पंडित नेहरूंशी त्यांना निवांतपणे बोलण्याची संधी मिळाली. या मुलाखतीचे वर्णन दलाई लामांच्या शब्दातच वाचणे श्रेयस्कर —

" भारतात आल्यावर माझ्यात परिवर्तनच झाल. मला अस वाटू लागल की मी आता भारतातच राहाव व चिनी धोरणात काही बदल होतो का याची वाट पाहावी हे श्रेयस्कर. कदाचित् महात्मा गांधीच्या देशात मी आता आहे ही भावना व मला इथ भेटलेल्या असंख्य विद्वान मडळीच्या सहवासात आढळलेली सहानुभूती या गोष्टीमुळे हे घडल असेल. परत मायदेशात जाऊन माझ्या लोकांकरिता मला काही करता येईल, अस मला वाटत नव्हत. त्यांच्या हिंसात्मक प्रतिकाराच्या इच्छेवर माझी सत्ता चालत नव्हती. याबाबत सर्व शांततेच्या मार्गांनी केलेले माझे प्रयत्न विफल झालेले होते. परतु इथ भारताच्या भूमीवरून जगातील सर्व लोकांना तिबेटमध्ये काय घडत आहे हे उच्च रवाने मला निदान सांगता येणार होते.

" मला हे सर्व नेहरूंपुढ मांडावयाच होत. आमची भेट झाली तेव्हा तिबेटी दुभाष्याव्यतिरिक्त चौथ तिथ कुणीही नव्हत. मी त्यांना पूर्वतिबेटात् घडत असलेल्या घटनांची माहिती दिली. चिघळणारी परिस्थिती कथन केली. आमचा धर्म व आमच्या चालीरीती नष्ट करण्याचा चिन्याचा मानस आहे या गोष्टीची मी त्यांना कल्पना दिली. यामागे भारताशी असलेले आमचे ऐतिहासिक संबंध तोडून टाकण्याचा चिन्याचा हेतू आहे, याची मी त्यांना जाणीव करून दिली आणि आता आमची सर्व मदार भारतावर आहे अस सांगितल.

" माझ म्हणण त्यानी शांतपणे ऐकून घेतल. परंतु सध्याच्या परिस्थितीत तिबेटकरिता कांहीही करता येणार नाही अस आपल ठाम मत त्यानी मला सांगितल. नेहरू म्हणाले की तिबेटच स्वतंत्र अस्तित्व कधीच कुणी औपचारिक रीत्या मान्य केलेल नाही. चिन्यांच्या विरुद्ध लढण्यात अर्थ नाही असच त्यांचही मत होत. जर तसा प्रयत्न केला तर आणखी फौजा आणून ते आम्हांला चिरडतील अशी भीती त्यानी व्यक्त केली. त्यांनी मला सल्ला दिला की मी तिबेटलाच परत जाव व शांततेच्या मार्गांनी, लादलेला सतरा कलमी करार कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न करावा हेच इष्ट होय.

" मी नेहरूना सांगितल की असा प्रयत्न मी करून पाहिला. परतु चिनी या करारान्वये त्यांच्यावर पडणारी जबाबदारी व बंधने मानीतच नाहीत. यावर नेहरूंनी सांगितले की चाऊ एन् लाय भारतात उद्याच येणार आहेत व त्यांच्याशी मी या बाबतीत बोलेन. एवढे बोलणे होऊन आमची मुलाखत आटोपली. "

## चाऊ सावध झाला

दुसऱ्या दिवशी चौ एन् लाय भारतात दाखल झाले. 'हिंदी चीनी भाई भाई'च्या घोषणानी दिल्ली दुमदुमून गेली. चाऊबरोबर झालेल्या भेटीत दलाई लामांची तक्रार नेहरूंनी त्याच्या कानावर घातली. हे करताना दलाई लामानी आपल्याला भारतातच राहावेसे वाटते हा जो विचार बोलून दाखवला व त्यावर नेहरूनी परत जाण्याचा जो सल्ला दिला, तोही चाऊच्या कानावर गेला. चाऊला काहीतरी वास आला! तेव्हा दलाई लामांशी त्याची मुलाखत झाली तेव्हा चाऊनी दलाई लामांना इशारा दिला—

" तुम्ही भारतातच राहण्याच्या विचारात होता अस माझ्या कानी आल आहे. परंतु जर तुम्ही व तुमच्याबरोबरचे लोक तिबेटला परतला नाही तर त्यामुळ तुम्हांला व तिबेटी जनतेलाच धोका आहे हे ध्यानात ठेवा. "

## यात्रेत विघ्न

एवढे घडल्यानतर दलाई लामा उरलेली दक्षिण भारताची यात्रा करण्याकरिता निघाले. साची, अजंठा, बनारस, बुद्धगया करीत दलाई लामा सारनाथला आले. तोच दिल्लीच्या चिनी वकिलातीतून त्यांना खलिता आला. जनरल चाग चिनवूकडून आलेली तार सोबत जोडलेली होती. तारेत म्हटले होते—

" ल्हासातील परिस्थिती गंभीर झाली आहे. हेरानी आणि प्रतिगाम्यानी मोठ्या बडाचा घाट घातला आहे. तावडतोब ल्हासाला परत या. "

दलाई लामा तातडीने दिल्लीला आले. तेथे चाऊची व त्याची पुनः भेट झाली. दलाई लामानी चाऊंना स्पष्टच सांगितले की पूर्वी झालेली अपकृत्ये आपण सोडून देऊ. परंतु तूर्त तिबेटात सुरू झालेली दडपशाही बद झाली पाहिजे. चाऊंनी उत्तर दिले, की माओनी पेकिंग भेटीच्या वेळी स्पष्ट केल्याप्रमाणे, तिबेटी जनतेच्या संमतीनेच काय त्या सुधारणा तिबेटमध्ये करण्यात येतील. असे असताना तिबेटी जनतेने चिनी लोकाविषयी एवढा अविश्वास का दाखवावा? दलाई लामांनी तावडतोब ल्हासाला जावे असा त्यानी पुनः आग्रह धरला.

दिल्ली सोडण्यापूर्वी पंडित नेहरूंशी शेवटच्या भेटीसाठी दलाईलामा गेले. या भेटीचा वृत्तांत स्वतः नेहरूनीच लोकसभेत १९५९ साली सांगितला. तो असा —

" जेव्हा पतप्रधान चाऊ एन् लाय दोनतीन वर्षांपूर्वी भारतात आले होते तेव्हा त्यानी तिबेटच्या प्रश्नावर माझ्याशी बोलण्याच सौजन्य दाखविल. आमच मनमोकळेपणान प्रदीर्घ बोलण झाल. त्यात चाऊनी हे स्पष्ट केल होत, की जरी पुरातनकाळापासून तिबेट हा चीनचाच भाग असला तरी तिबेट हा चीनचा स्वतत्र प्रात असा कधीच नव्हता. चिनी जनतेपेक्षा तेथील लोक वेगळे होते. म्हणूनच तिबेटला स्वायत्तता असावी अस त्याच मत होत. जर कुणाची अशी समजूत असेल, की तिबेटवर कम्युनिझम लादण्याचा आमचा विचार आहे, तर ती गोष्ट खरी नाही; अस चाऊनी सांगितल. याच

सुमारास दलाई लामा इथच होते आणि त्यांच्याशीदेखील माझ बोलण झाल. चौ एन लाय हे तिबेटची स्वायत्तता मानतात, अस मी त्यांच्या कानांवर घातल. मी दलाई लामांना अशी सूचना त्या वेळी केली की त्यांनी या म्हणण्यावर विश्वास ठेवून स्वायत्त तिबेटात सुधारणा घडवून आणण्यासाठी चिनी सरकारला पूर्ण सहकार्य द्याव."

दलाई लामा परत जाण्यास निघाले. परंतु हिमालयाच्या खिंडीत बर्फ पडू लागल होत व त्यांची वाट रोखण्याचा जणू निसर्गानच प्रयत्न करून पाहिला ! महिनाभरान बर्फवृष्टीचा अडसर दूर झाला व दलाई लामांनी भारताची सरहद्द ओलांडून पुन: ल्हासाच्या दिशेने मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली.

## तिबेटातील चिनी त्रिशूळ

दलाई लामा पुन: नारब्युलिंगुका राजवाड्यांत दाखल झाले व त्यानंतर वर्षभरात ल्हासा शहरात १० मार्च १९५९ रोजी बंडाची ठिणगी पडली. यामधल्या काळांतील घटना नीट समजावून घ्यावयाच्या तर चिनी सैन्य तिबेटात घुसल्यानंतर त्यांनी तिबेटचे जे तीन तुकडे केले त्याची माहिती असली पाहिजे.

पूर्व तिबेटातून चिनी कधीच गेलेले नसल्यामुळे या भागात प्रथम-पासूनच चिनीधार्जिण्यांचे वर्चस्व होते. हा भाग म्हणजेच पूर्वीचा सिकांग प्रांत. पश्चिम तिबेटात शिगात्से (Shigatse) या ठिकाणी पंचेन लामाचे वास्तव्य ठेवून या भागातील व्यवस्थाही पंचेन लामाच्या म्हणजे पर्यायाने, पेकिंग सरकारच्या म्हणण्याप्रमाणे राहावी अशी चिनी सरकारने तरतूद केली होती. हा भाग म्हणजे पश्चिम तिबेट होय. भारताच्या सरहद्दीजवळील तिबेटातच फक्त काय तो दलाई लामांचा, पुरता अंमल असा आता शिल्लक होता. याच कारणां-करिता ल्हासात जवळजवळ तीस हजार चिनी फौजा सतत ठेवलेल्या होत्या. ल्हासात हे जे सैन्य १९५० साली घुसले ते सिकांग व शिगात्से या भागातून ! आत शिरताच त्यांनी प्रथम चामडो या खंपा प्रांताच्या राजधानीचा कब्जा केला. शूर खंपा जमात मुख्यत्वेकरून याच भागात होती. तिबेटातील खंपा जमात सर्वांत लढाऊ समजली जाते व चिनी सैन्यावर गनिमी छापे घालण्याचे व्रत खंपांनी १९५० पासून अंगीकारले व अजून त्यात खंड पडलेला नाही. खंपांचा बीमोड कर-ण्यात आजतागायत चिन्यांना यश आलेले नाही. कारण डोंगरांच्या आश्रयाने या लोकांनी तिबेटची लढाई चालूच ठेवली आहे.

## खंपांचा हिसका

१९५६ मध्ये या खंपांनी मार्शल चेन यी यालाच उडवण्याचा घाट घातला होता. त्यांनी मार्शल चेन यी यांच्यावर प्रवासात गाठून हल्ला केला. मार्शल चेन यी कसेतरी निसटले. त्यांचा बराचसा परिवार मात्र मारला गेला. १९५८ मध्ये खंपांनी बराच जोर करून ल्हासाला जाणारी रसद तोडली व खंपा प्रांतात तळ ठोकलेल्या ६००० चिनी सैन्याला प्रांतातून पिटाळून लावले. खंपांचा जोर वाढला तर ते ल्हासात शिरतील जा अंदाजाने चिन्यांनी ल्हासात सैन्यवाढीला सुरुवात केली.

ज्या वेळेला पंडित नेहरूंनी भूतानला भेट दिली तेव्हा चुंबी खोऱ्यातून जाणाऱ्या त्यांच्या मार्गावर फरी या गावाजवळ जवळ-जवळ ३०० खंपा बंडखोर त्यांना आपली कैफियत सादर करण्या-करिता जमले होते. परंतु भारतीय राज्यकर्त्यांना खंपांचे फारसे प्रेम



**शूर व स्वातंत्र्यप्रेमी खंपा**
**लढाऊ जमाती डोंगराळ भागातच निपजतात काय ?**

नव्हतेच व चिनी सैनिकांना जमवाजमवीचा सुगावा लागल्यामुळे त्यांनी खंपांची पांगापांग करून हा डाव उधळला.

या खंपांच्या हालचालींनी सावध होऊन चिन्यांनी भारत-ल्हासा मार्गच बंद करून टाकला. १२-१०-१९५६ ला पी. टी. आय्. वृत्त-संस्थेने ही बातमी दिली होती. भारताशी हातमिळवणी करण्याच्या या खंपांच्या प्रयत्नांबाबत भारत सरकारने अर्थात काहीच उत्सुकता दाखवली नाही व जे काय करायचे ते आपल्यालाच केले पाहिजे या समजुतीने अखेर खंपांनी ल्हासा शहराच्या दिशेने वाटचाल सुरू केली. ल्हासा शहरात सर्व बाजूंनी खंपा टोळीवाले सशस्त्र अवस्थेत घुसू लागले. तिबेटात आता पुष्कळ ठिकाणी खंपांनी शिरकाव करून घेतला व स्वतःच्या सामर्थ्यावर चिनी सैनिकांना तिबेटाबाहेर हुसका-वून लावण्याचे मनसुबे रचीत ते संधीची वाट पाहत राहिले.

दलाई लामा भारतवारी संपवून पुन: तिबेटकडे आले तेव्हा त्यांच्या मनात दोन गोष्टी त्यांनी निश्चित केल्या होत्या.

(१) नेहरूंच्या साक्षीने चौ एन लाय यांनी तिबेटला स्वायत्तता राहील ही गोष्ट मान्य केली होती तेव्हा चिनी हे तिबेटवर राज्यकर्ते म्हणून राहू शकत नाहीत.

(२) सर्व तिबेटी जनतेला ही गोष्ट आता मुक्तकंठाने सांगण्यास हरकत नाही.

म्हणूनच परतताना वाटेत याटुंग, जित्सी, शिगत्से या सर्व ठिकाणी लोकांशी बोलताना दलाई लामांनी हे सर्व जाहीरपणे सांगण्यास सुरुवात केली. नगबोने सही दिलेल्या सतरा कलमी करारात हे स्वाय-त्ततेचे कलम महत्त्वाचे होते, तेव्हा हा करार अंमलात आणून पर्यायाने स्वायत्तता पदरात पाडून घ्या असा सल्ला पंडितजींनीच दिलेला होता.

परंतु भारतातून परत येताच दलाई लामांनी या गोष्टी उघडपणे लोकांना सांगण्यास सुरुवात केलेली पाहून याचा बोलविता धनी दिल्लीत आहे या जाणिवेने चिनी मनात चरकले. दलाई लामा लिहितात—

"I put this policy into practice also; by seeing

that every action of our Govt. was strictly in accordance with the 17-points agreement; and by pressing in every way I could towards autonomy. At first I could see no reaction from the Chinese but slowly I began to understand that they simply thought I was actihg under foreign influence."

सतरा कलमी करार अमलात आणण्यासाठी चिन्याशी सहकार्य देण्यास दलाई लामांनी सुरुवात केली. चिनी अर्थात् सावध होते. दलाई लामा मिळते घेण्याच्या विचारात आहेत तोच खपांचा काटा दूर करावा या उद्देशाने चिनी लष्करी अधिकाऱ्यानी एका सार्वजनिक सभेत असे जाहीर केले, की पूर्व तिबेटात खपानी बंड उभे केले आहे व त्याचा नि पात करण्याचे काम आता चिनी लश्कर करीत आहे.

वस्तुत: खपांचे हल्ले तुरळकपणे गेली चारपाच वर्षे चालू असताना याच वेळी त्याचा बंड म्हणून उल्लेख करण्यात काय हशील होते ? परंतु चिनी अधिकाऱ्यांनी ही गोष्ट जाणूनबुजून केली होती. त्याना असा देखावा उभा करावयाचा होता की खपा बंडखोरांना दलाई लामाचा पाठिंबा नाही. इतकेच नव्हे तर दलाई लामांच्या संमतीनेच खपांचा बीमोड सुरू आहे.

या सर्व राजकारणी डावपेचात तिबेटी जनतेची अवस्था मोठी विचित्र होती. खपांची घातपाती लढाई त्यांना मनातून दिलासा देत होती व दलाई लामांचा तर या गोष्टीना पाठिंबा दिसत नव्हता. अशा दोलायमान अवस्थेत तिबेटी जनता असतानाच खपाच्या बंडाचा पुकारा करून एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव चिनी खेळत होते.

## ल्हासा तापू लागले

ल्हासा शहरात हळूहळू आसपासच्या प्रदेशातून निर्वासितांचा ओघही सुरू झाला व त्यांच्या सांगण्याप्रमाणे चिनी सैनिक व अमडो, खपा, आदी जमाती यांच्यामध्ये वारंवार चकमकी झडत होत्या. चिन्यांनी खेडी आणि धर्ममठ बाँबफेक करून उध्वस्त करण्याचा सपाटा सुरू केला. कारण या मठांचे डोंगरकपारीतील अस्तित्व गनिमी काव्याला अत्यंत पोषक होते. जमिनी जप्त केल्या जात होत्या. बुद्ध हा प्रतिगामी संस्कृतीचा वारसदार आहे असा पुकारा सुरू होता आणि मुख्य म्हणजे चीनविरोधी म्हणून कुणा तिबेटी माणसाचा संशय आला तरी त्याला अटक केली जात होती. जणू तिबेटी जनतेला विश्वासात घेऊन त्याच्यात कम्युनिस्ट प्रणीत सुधारणा घडवून आणण्याची चिन्यांची आशा आता पुरती मावळली होती. लादून घेतलेला सौजन्याचा बुरखा उसवू लागला होता. चिन्यांच्या या दडपशाहीला आणि अत्याचारांना कटाळून तिबेटी मुलेमाणसे ल्हासात दाखल होत होती.

निर्वासितानी सागितलेल्या कहाण्या ऐकून ल्हासातील आधीच तापलेले वातावरण चागलेच उकळू लागले.

ल्हासात बंडाची ठिणगी पडणार याची चाहूल लागताच चिनी अधिकाऱ्यांनी ल्हासात शिरलेल्या खपा व अमडो जमांतीच्या लोकाची गिरगणती सुरू केली. यांचे म्होरके कोण आहेत याचा तपास सुरू झाला. परिणाम असा झाला की ज्याची माहिती चिन्यानी जमवावयास सुरुवात केली ते सर्व पुढारी लोक शस्त्रास्त्रे घेऊन आसपासच्या डोंगरदऱ्यात पुन: पसार झाले. याच्यासबंधी दलाई लामा लिहितात—

"When one heard of the terrible deeds of the Chinese in the East, it was a natural human reaction to seek revenge. And moreover I knew they regarded themselves as fighting in loyalty to me as Dalai Lama, the Dalai Lama was the core of what they were trying to defend."

[जेव्हा चिन्याच्या पाशवी कृत्याचा पाढा कुणाच्या कानावर पडे तेव्हा सूडाची भावना त्याच्या मनात निर्माण होणे ही अगदी स्वाभाविक प्रतिक्रिया होती. शिवाय मला हे माहीत होते की आपण दलाई लामावरील निष्ठेखातर लढत आहोत अशीच या सर्वांची भावना होती. ज्या गोष्टीचे संरक्षण करावेसे त्याना वाटत होते त्याचा गाभा म्हणजे दलाई लामाच होय असे ते समजत होते.]


## पुन: संभ्रम ....

अर्थातच या क्रांतिकारी देशभक्ताबद्दल नेमकी काय भूमिका घ्यावी याचा दलाई लामाच्या अहिंसक वृत्तीपुढे मोठा पेच पडला. त्याना पुन. गाधीजीचे स्मरण झाले. अशा परिस्थितीतदेखील अहिंसाच पाळावी असा उपदेश गाधीजींनी केला असता काय ? त्याच्या मनाचा कौल आला की – कितीही हिंसा घडली तरी प्रतिकारार्थ हिंसा करणेही पाप आहे असाच सल्ला गाधीजीनी दिला असता. त्याप्रमाणे त्यानी चिन्याकडे आश्वासन मागितले, की जर खपा व व अमडो टोळयानी शस्त्रे म्यान केली तर त्याच्याविरुद्ध कसलीही कारवाई केली जाणार नाही; ही मागणी चिनी अधिकाऱ्यानी मान्य केली असती तर खपाना व अमडोना शस्त्रे म्यान करण्याचा आदेश दलाई लामांनी दिला असता व त्यांनी तो मानलाही असता.

हे सर्व खरे असले तरी या प्रकरणात अखेर दलाई लामा हाच महत्त्वाचा ठरतो आहे, याची भीती चिनी अधिकाऱ्यांना वाटली. दलाई लामाचे वर्चस्व तिबेटमध्ये राहणे चिन्याना मजूर नव्हते. तेव्हा त्यानी शस्त्रसंधीच्या वाटाघाटी मोडून टाकल्या व दलाई लामाकडे लकडा लावला की बंडखोराचा बंदोवस्त करण्यासाठी तिबेटी लश्कर वापरण्यात यावे. चिन्याच्या या मागणीला मात्र दलाई लामांच्या मंत्रिमंडळाने सपशेल नकार दिला. त्यानी कळवले, की तिबेटी सैन्य तिबेटी जमातीविरुद्ध कधीही शस्त्र उचलणार नाही. वस्तुत: ज्या भागावर चिनी अमल सात वर्षे कायम होता त्या पूर्व तिबेटात खपाचा जोर असताना त्याचा बीमोड करण्यासाठी तिबेटी लश्कर कशाला ? परंतु हा नकार मिळताच तिबेटी मंत्रिमंडळावर बडाला चिथावणी व सहानुभूती दिल्याचा आरोप पर्यायाने आला.

'तिबेटी सरकार व चिनी लश्करी अधिकारी याच्यात असा उघड संघर्ष माजताच तिबेटमध्ये सैन्यामागोमाग आलेल्या चिनी रहिवाश्यानादेखील, चिन्यानी शस्त्रे पुरवण्याचा धडाका सुरू केला. तिबेटी मंत्रिमडळच प्रतिगाम्याचे आहे असा प्रचार सुरू झाला. नऊ देशद्रोह्याची यादी चिन्यांनी तयार केली व तिबेटी सरकारातील या देशद्रोह्यांची हकालपट्टी करावी अशी मागणी केली. या नऊ जणात दलाई लामाचे दोन भाऊ व लुखाग्वादेखील होता.

इकडे खपाची अशी समजूत झाली, की दलाई लामाचे सगळे



*'तिबेट कुणाचा ? -तिबेटींचा' 'चिन्यांनो चालते व्हा'*
**१० मार्चला तीस हजार तिबेटींनी दलाई लामांच्या संरक्षणासाठी राजवाड्याला घातलेला प्रचंड वेढा.**

मंत्रिमंडळ चीनला धार्जिणे असून त्यांनी दलाई लामांचे काहीही चालू न देता चिन्यांशी हातमिळवणी केली आहे.

अशा रीतीने चिनी लाल भाईंनी तिबेटी जनतेत असंख्य गैरसमज पसरवून मानसिक गोंधळ उडवण्याचे प्राथमिक कृत्य पार पाडण्यात यश मिळवले. प्रचलित सरकारात अशी फाटाफूट आहे असा सतत प्रचार करून जनतेच्या मनात विकल्प निर्माण करणे हा कम्युनिस्ट आक्रमक तंत्रातील सर्वात प्राथमिक भाग असतो.

आता शेवटचा प्रहार करण्याची चिनी लश्करी अधिकाऱ्यांची तयारी पूर्ण झाली होती. एखादे क्षुल्लक कारण हेरून ल्हासातील तिबेटी सरकार संपुष्टात आणण्याची संधी आता हे चिनी शोधू लागले.

मार्च १९५९ उजाडला तेव्हा ल्हासात वरीलप्रमाणे परिस्थिती होती. दहा मार्च १९५९ ला ल्हासात असंख्य लोक मारले जाऊन दलाई लामांनी अखेर निसटून भारताला जाण्याचा निर्णय घेतला. अशा या परिस्थितीतदेखील...दलाई लामा अभ्यास करीत होते. कसला अभ्यास ? त्यांची परीक्षा होती ! ते आता मेटॅफिजिक्स विषयाचा पदव्युत्तर अभ्यास करीत होते. ते लिहितात—

"On the 1st of March 1959, I was in Jokhang, the main temple of Lhasa for the celebrations of the Monlam festival. It was during this festival that I took my final examination as Master of Metaphysics."

दलाई लामा परीक्षेच्या गडबडीत असतानाच चिनी लश्करी छावणीतून दोन दूत जोखंग देवळात आले. चिनी लश्करी छावणीत एक नाटचप्रयोग होणार होता व या प्रयोगाला दलाई लामांनी हजर राहावे अशी चिनी लश्करी अधिकाऱ्यांची इच्छा असल्यामुळे प्रयोगाची सोईस्कर तारीख विचारण्यासाठी हे दूत आलेले होते. दलाई लामांनी सांगितले की, सध्या मी अभ्यासाच्या गडबडीत आहे. यथावकाश मी तारीख कळवतो. परंतु त्या दोन दूतांनी असे सांगितले, की तारीख ठरवल्याशिवाय ते परतणारच नाहीत. तशी त्यांना सूचनाच मिळालेली आहे. परंतु दलाई लामांनी तारीख लगेच मुक्रर करण्यास साफ नकार दिला व आपला निरोप चिनी जनरलला कळवण्यास सांगितले. निराशेने हे दूत परत गेले.

एवढ्या घाईगर्दीने सामान्य दूताकरवी चिन्यांनी त्यांच्या छावणीतील क्षुल्लक नाटचप्रयोगाला येण्यासाठी तारीख ठरविण्याचा दुराग्रह धरावा ही सर्वच घटना मोठी संशयास्पद होती. चिन्यांच्या मनांत

कांही काळेबेरे नाही ना ? या विचाराने दलाई लामांचे व निकटवर्तियांची मने आता व्यग्र झाली. ५ मार्च १९५९ ! जोखग मंदिर हे पोटालात आहे. पोटाला व नॉरब्युलिंग्का या दोन राजवाड्यांत अंतर फक्त दोन मैलांचे होते. पोटाला राजवाड्याभोवती जरी तिबेटी सैन्याचा अजून गराडा होता तरी नॉरब्युलिंग्कापासून चिनी लश्करी छावणी ही दोन मैलांवरच होती. या छावणीकडे शिरताना वाटेत जो दगडी पूल होता तीच लश्करी छावणीची लक्ष्मणरेषा होती.

## नाटकाची नांदी

७ मार्च १९५९ ला चिनी जनरलकडून राजवाड्यावर फोन आला आणि दलाई लामांना नाट्यप्रयोग पाहण्यासाठी कुठला दिवस सोयीचा आहे हे पुनः विचारण्यात आले. दलाई लामांनी १० मार्च १९५९ हा दिवस मुक्रर केला. यापुढचा नाट्यमय वृत्तांत दलाई लामांच्या तोंडून ऐकण्यातच स्वारस्य आहे—

" मी चिन्याच्या लश्करी छावणीत १० मार्चला जाणार होतो व त्याची तयारी आदल्या दिवशी ९ मार्चलाच सुरू झाली. ९ तारखेला सकाळी आठ वाजता चिनी अधिकाऱ्यांकडून माझ्या शरीरसंरक्षक दलाचा प्रमुख कुसुग डेपॉं (Kusung Depon) याला भेटीसाठी पाचारण आले. ब्रिगेडिअर फूपुढे त्याला हजर करण्यात आले. ब्रिगेडिअर फूने त्याला सांगितले—

" उद्या दलाई लामा इथ येणार आहेत. एका नाट्यप्रयोगासाठी त्यांच येण होत आहे. त्यासंबंधी काही गोष्टी ठरवावयाच्या आहेत."

" तारीख नक्की झाली का ? " डेपॉं यांनी चौकशी केली.

" तुम्हाला ठाऊक नाही ? " ब्रिगेडिअर फूने चिडून विचारले व तो पुढे म्हणाला—

" एक गोष्ट लक्षात ठेवा. नेहमीप्रमाणे होणारे षोडशोपचार या वेळी होणार नाहीत. तुम्हांपैकी कुणाही सशस्त्र माणसाला त्यांच्याबरोबर इतर वेळी येता त्याप्रमाणे उद्या येता येणार नाही. जर तुमचा आग्रहच असेल तर एक दोन शरीरसंरक्षक दलाई लामांच्या बरोबर आम्ही आत घेऊ. परंतु त्यांच्याजवळ शस्त्रे असणार नाहीत.

" डेपॉं यांनी फूशी झालेला वरील संवाद माझ्या कानी घातला. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे माझ्यावरोबर पंचवीस सशस्त्र संरक्षक असत. माझ्या मार्गावर दुतर्फा तिबेटी सैनिक उभे केले जात. यापुढे चिनी जनरलच्या या संशयास्पद सूचनेचा आम्ही खूप विचार करून पाहिला. परंतु न जाऊन चालण्यासारखे नव्हते व अखेर चिन्याच्या म्हणण्याप्रमाणे भेटीची व्यवस्था मान्य करण्यात आली."

" माझ्या छावणीभेटीचे वृत्त गुप्त ठेवण्यात आले होते. कारण मी जेव्हा जेव्हा राजवाड्यावाहेर पडे तेव्हा रस्त्यावर उभे राहिलेल्या तिबेटी सैनिकांमुळे ही गोष्ट नागरिकांना कळे व माझ्या दर्शनासाठी लोकांची दुतर्फा गर्दी उसळे. जर मला दगडी पुलापलीकडे एकटेच चिनी छावणीत शिरताना लोकांनी पाहिले असते तर विलक्षण प्रसंग गुदरला असता. शक्य ती सर्व काळजी घेऊनदेखील कशी कोण जाणे ल्हासा शहरात अशी वदंता पसरली की दलाई लामाना पकडून पळवण्याचा चिन्यांचा बेत आहे. ९ मार्चची सायंकाळ व रात्रभर ल्हासात ही बातमी वणव्यासारखी पसरली आणि विलक्षण खळवळ उडाली. १० मार्चची सकाळ उजाडताच ल्हासातील जनतेने मला राजवाड्याबाहेर जाऊ न देण्याचा निर्धार केला आणि लोकांच्या झुंडीच्या झुंडी राजवाड्याकडे लोटू लागल्या.

" ९ मार्चला सायंकाळीच माझ्यावरोबर येण्यासाठी आणखी सहा निमंत्रणचिठ्ठ्या माझ्याकडे आल्या व माझ्या मंत्रिमंडळाच्या सहा सदस्यांनी माझ्यावरोबर येण्याचे ठरले.

" १० मार्चला मी सकाळी जागा झालो तेव्हा दिवसभरात माझ्या पुढे काय काय वाढून ठेवलेले आहे याची मला कल्पना नव्हती. रात्री मला शांत झोप लागली नव्हती कारण छावणीभेटीविषयी तर्कवितर्क मी करीत होतो. पाच वाजता पहाटे उठून मी नेहमीप्रमाणे माझ्या प्रार्थनेच्या खोलीत गेलो. खोली नेहमीप्रमाणे शांत होती. होमकुंडापुढे तुपाचे दिवे नेहमीप्रमाणे तेवत होते. चांदीसोन्याच्या छोट्या छोट्या उपकरणातून केशराचे पाणी सोन्याच्या पाण्यासारखे तकाकत होते. धुपाचा वास सर्वत्र दरवळत होता. मी प्रार्थना केली व काही काळ ध्यानस्थ बसलो. मग थोड्या वेळाने नेहमीप्रमाणे बागेत शतपावली करावी या इराद्याने मी जिना उतरून खाली आलो."

" आकाशात एकही ढग नव्हता. वसंतातील रम्य पहाटेचे ते धूसर सौंदर्य पाहताना मला माझ्या काळज्या काही काळ सोडून गेल्या होत्या. दूरवर ड्रेपंग धर्ममंदिरामागील डोंगराआडून सूर्याची कोवळी किरणे वर सरकत होती आणि त्याच्या प्रकाशात हळूहळू माझा हा रत्नबाग राजवाडा उजळू लागला. सगळीकडे हिरवेगार होते. तृणाची हिरवी पाती, शेजारच्या तळ्यात पाण्यावर साकारणारी पोपटी कमलपत्रे आणि माझ्या घरावरील हिरवी निशाणे. सकाळच्या मंद झुळुका सुरू झाल्या होत्या व हिरवी निशाणे थोडीफार फडफड करू पाहत होती."

## राजवाड्याला जनतेचा वेढा

" माझ्या आठवणीतला शांत मनःस्थितीतील हाच तो शेवटचा क्षण. आरडाओरडा आणि लांबवरून येणाऱ्या घोषणांनी निमिषार्धात या क्षणाचे आयुष्य संपविले. राजवाड्याच्या भिंतीपलीकडून येणारा आवाज वाढत होता. परंतु शब्द नीटसे समजत नव्हते. मी घाईघाईनं आत गेलो व माझ्या परिवारातील जे समोर आले त्यांना बाहेर काय गडबड आहे ते पाहून येण्यास सांगितले. थोड्याच वेळात ते परत आले आणि त्यांनी सांगितले की ल्हासातील सर्व तिबेटी जनता ही घराबाहेर पडून घोषणा देत राजवाड्याकडे चारी बाजूनी येत आहे. माझ्या संरक्षणासाठी त्यांनी हा निर्णय घेतला आहे व तशा अर्थाच्या घोषणा जमावातून उठत आहेत. चिन्यांना तुम्हाला छावणीत नेता येणार नाही असा त्यांचा निर्धार दिसत आहे.

" हा हा म्हणता सुमारे तीस हजार तिबेटी लोकांचा राजवाड्याभोवती गराडा पडला. चिनी लश्करशाहीविरुद्ध घोषणा उठत होत्या. तासातासाला गोंधळ वाढत होता. मी घरातील छोट्या प्रार्थनामंदिरात प्रार्थनेसाठी बसलो."

## पहिला बळी


थोड्या वेळाने नाट्यप्रयोगाला जाणाऱ्या मंत्र्यांचे राजवाड्यात आगमन सुरू झाले. दोन मंत्री चिनी जिप्समधून सुखरूप आत आले, कारण बाहेरच्या जमावाचा आकार क्षणाक्षणाला वाढत असला, तरी त्याची चीड अजून कृतीत व्यक्त होऊ लागलेली नव्हती. काही

(पान ४३ वर पाहा)

## पैंज

आता उजळ माथ्याने
झालो मुशाफीर पुरा
सागराच्या गर्भातला
श्वास छेडीन गहीरा
बोलायची भाषा नाही
आता सारे जग-मौन
एका एका दिठीसाठी
शब्द टाकीत गहाण
येताना ये चांदण्याचा
फाया नेत्री सावरून
वाऱ्याशीहि पैंज माझी
तुझी मिळवावी खूण !

—राजा महाजन



## रात्र माझ्या बांधून ...

काय बोलावे कुणाला काळजा गेले चरे
रात्र गाठी बांधुनिया दूर गेली पाखरे

एकटा होतो, सभोती साचले होते धुके
काल आले भेटण्याला, वाटले माझे सखे.

चंदनाचे शब्द त्यांचे मी तयांना भाळलो
अमृताचे थेंब घ्याया दूर मागे धावलो.

शेवटी येता उशिरा भान, मी भांबावलो
केवडयांनी टाकली माझ्याच पदरी केसरे

सांत्वनांची ओळ त्यांच्या वेचली डोळयातुनी
आणि माझ्या स्पंदनाचे गीतही ओठातुनी

घेतले पंखात त्यांना झेप माझी सोडूनी
ते निघाले टांगुनी दारात माझी लक्तरे

आज आत्म्यातील माझ्या ओढ कैशी आवरू ?
आपुल्यांचे वेड त्याला, मी कसा त्यांना धरू ?

' ते तुझे नव्हतेच ' त्याची सांत्वना कैसी करू ?
संपले सामर्थ्य माझे, जीव आता हंबरे

रात्र गाठी बांधुनिया दूर गेली पाखरे

—जंयत देवधर

## आपली व्यथा तेवढी एक...

काढलेले उपवास, मेलेले जीव, तुटलेल्या आशा,
ओढग्रस्त संसार, पावलोपावली अपमान
अशाच आणखी हजार गोष्टी...वेगवेगळया
डोळयांत असेल जेवढे तेज, तेवढयाच फक्त टिपून घेतलेल्या
त्यांच्याच वर्तुळात भटकत राहतात सारी मने
तीच असतात त्यांची विसाव्याची स्थाने
प्रत्येकालाच असते आपल्या व्यथित आयुष्याची घमेंड
प्रत्येकाचेच असते प्रेम आपल्या चिरायू दुःखावर
वाटत असते आपली व्यथा तेवढी एक आभाळभर

—प्रभाकर

## आर्त वेदनेच्या पोटी

उर लाख दाबतोहि
सुर निघता निघेना
आर्त वेदनेच्या पोटी
भाव जोजता जोजेना
ओल्या पाऊल खुणात
शब्दवेडी तुझी सांज
आठवता—रंगवता
होते स्मृति एक झांज
सांजवेडी भुलावण
देते गति भावनेला
परि विरल्या क्षणाचा
व्रण तो सुकलेला

—मधकर कोसारे

# पाचोळा



किशोर गोमकाळे

आमच गाव फारस मोठ नाही. तिथ जायला नीट रस्ताही नाही. तांबुसवाडीपर्यंत कच्चा रस्ता आहे. पण मध्ये मध्ये उथळ नाले आहेत. ह्या नाल्यांना पावसाळ्यातच पाणी असत अन् पावसाळ्यात नाले भरले की मग मोटरी जायच्या यायच्या थांबतात. नाल्यांच पाणी कमी झाल की पुन्हा रहदारी सुरू होते.

तांबुसवाडीपुढे मात्र मोटर नाही. तेथून आमच्या गावी जायला बैलगाडीन नाहीतर पायीच आठ-दहा मैल जाव लागत. तांबुसवाडीनंतरचा दोन-तीन मैलांचा झाडीतला रस्ता ओलांडला की बर वाटत. प्रवासाचा त्रास झालेला असला तरी तो क्षणभर जाणवत नाही. सार काही ओळखीच वाटत. हळूहळू दूरवर गाव दिसायला लागत. अजून पुढे गेल की दूरवर गावाबाहेरच्या लहानशा आमराईतल्या महादेवाच्या देवळाचा कळस दिसतो. मन आनंदान, आदरान भरून जात. पावल जरा घाईन पडायला लागतात अन् हळूहळू देवळाचा घुमट दिसायला लागतो.

हे महादेवाच देऊळ अगदी निवांत जागी आहे. केव्हाही जा, इथ अगदी शांत वाटत. मन आनंदान उड्या मारत. देवळात डोकावून बघितल की मन मारावून जात अन् अंधुकशा मूर्तीकड पाहिल की देव आहे की नाही याविषयी शंका असली तरी आपोआप हात जुळतात अन् भारावलेल्या मनान नमस्कार केला जातो.

वर्षाकाठी एकदा तरी मी गावाला येतो. मी गावाला आलो की रोज या देवळात गेल्याशिवाय मला करमत नाही. आल्याआल्या मी देवळात जातो. भक्तिभावान देवाला नमस्कार करतो आणि ओटघावर बसायला मी बाहेर येतो. गाभाऱ्यातून बाहेर यताना गाभाऱ्याच्या अंधाऱ्या कोपऱ्यात कुणी-

महादेवा सहसा लेप लावी. हगवण झाली लेप, ताप आला तरी लेप. पोटात घ्यायचे औषध तो सहसा देत नसे............आयुष्याचा भार त्याने मजेत ओढला. अखेरीस मात्र त्याच ओझं झाल.........:

तरी असल्याच मला जाणवत. दर्शनाला आलेली कुणी व्यक्ती असेल अस वाटून मी तिकड दुर्लक्षच करतो अन् ओटयावर येऊन बसतो. पण लगेच जोरात हसण्याचा आवाज मला ऐकायला येतो. प्रथम मी दचकतो खरा पण मग मी वळून बघतो. आता ती व्यक्ती दारात उभी असते. मी निरखून पाहू लागतो, बुद्धीला ताण देऊन आठदहा क्षणात माझ्या डोक्यात प्रकाश पडतो. ती व्यक्ती म्हणजे दुसर तिसर कोणी नसून महादेवा असते.

गावात गेल्या वर्षात विलक्षण बदल झालेला असतो. नवी विटांची घर बाधली जात असतात, दुकान वाढलेली असतात, जिकडे तिकडे सुधारणेच वार खेळत असत. पण, महादेवात किंचितही बदल झालेला मला दिसत नाही. तीन-चार वर्षांपूर्वी तो होता, तसाच आताही आहे.

अजूनही महादेवा उगाच जगतो आहे. वास्तविक महादेवा आहे की नाही इकडही गाववाल्यांच फारस लक्ष नाही. महादेवाच्या देवळात गेल की त्याच्या हसण्यान भक्त पहिल्यांदा दचकतो इतकच. पण नियमान दर्शनाला जाणाऱ्यांना आता त्याचीही सवय झाली आहे.

एके काळी महादेवाची चगळ होती. शहरापासून दूर अशा आमच्या गावात कुणीच डॉक्टर-वैद्य नव्हता. महादेवाच तेवढा एकटा वैद्य होता. हजाराच्या आसपास लोकवस्ती असलेल्या आमच्या गावात महादेवाचा चागलाच जम बसला होता. त्या गावात त्यानच नवे-नवे रोग शोधून काढले होते. महादेवाला लोक महादेवाचाच अवतार समजायचे अन् म्हणूनच की काय लोक त्याला 'महादेवा' म्हणायचे.

खर म्हणजे आपल्याला काहीच करता येणार नाही याची जाणीव महादेवाला लवकरच झाली होती आणि दुसर काही करता आल नाही तेव्हाच महादेवा वैद्यकी करू लागला होता.

दहा पधरा दिवसा-आड एखाद्या दुपारी महादेवा झाडीत जायचा, मिळेल तो पाला जमवायचा, निरनिराळ्या मुळ्या शोधायचा, वेगवेगळ्या पाल्याची नाव मनातल्या मनात ठरवायचा अन् हे सार तो घरी साठवून ठेवायचा.

महादेवाचा कार्यक्रम ठरल्यासारखा असे. तो मोठ्या सकाळी उठून स्नान करायचा, देवाची मनोभावे पूजा आटोपयचा, गावाबाहेरच्या महादेवाच्या देवळात जाऊन बराच वेळ घंटा वाजवायचा अन शेवटी जोरान ओम– बम् बम् करून परतायचा. देवावर त्याचा मोठा विश्वास. तस पाहिल तर देवानच त्याला वैद्य बनवल–पोटा-पाण्याला लावल.

त्याच अस झाल, की गावच्या काशिनाथ पाटलाच चागल दहा बारा वर्षांच एकुलत एक पोरग आजारी पडल. पोराच अंग तापान फणफणायला लागल. पाटलीणबाईन शेजारच्या पोराला दगडीत मुतायला लावल अन् त्यात लवग वगैरे उगाळून त्याचा लेप पोराच्या डोक्याला थापला. पण त्यानही काही झाल नाही.

महादेवाला हे कळल तरी तो स्वस्थ बसून होता. हे सहज साधणार नाही हे त्यान ताडल होत. पोराच काही बर वाईट झाल तर उगीच नावाला बट्टा लागून धदा बसायचा असा विचार करून महादेवा स्वस्थ बसला होता. पण त्या दिवशी त्याच नशीबच खुलल होत. काशिनाथ पाटील स्वतः बोलवायला आला. कधी नव्हे तो आज पाटलान महादेवाला मानान बोलावल. मग महादेवाला जावच लागल. हाती पाल्याबिल्याची-मुळ्याबिळ्याची पिशवी घेऊन महादेवा निघाला.

वाड्यात सारे गप्प होते. जो-तो चिडीचूप होता. महादेवान मनात देवाचा धावा केला. वरवर गंभीर भाव चेहऱ्यावर उमटविले अन् तो पोराजवळ गेला. अगाला हात लावून पाहिल. पोट ठिकठिकाणी दाबून पाहिल. सार सोंग संपल्यावर त्यान गभीर सुस्कारा सोडला. सार काही देवावर सोपवल. हाती येईल ती मुळी त्यान, त्याच्याजवळ नेहमीच असणाऱ्या चापट दगडावर उगाळली अन् त्याचा लेप पोराच्या डोक्यावर लावला. कसलीतरी राख त्यान पोराला चाटवली. "जरा वेळ लागेल पण पोरग सुधरेल." येवढ बोलून तो तिथून सटकला.

अन् काय आश्चर्य दिवसभरात पोराचा ताप पार उतरला. पोरग हालचाल करू लागल. हे पाहून काशिनाथ पाटलान आनंदान महादेवाला मिठीच मारली. दुसऱ्याच दिवशी कुडव-कुडव धान्य पाटलाकडून महादेवाकड रवाना झाल. अन् तेव्हापासून महादेवा पक्का वैद्य बनला. आसपासच्या एकदोन खेड्यातही त्याची कीर्ति पसरली. लोक त्याच्यावर विश्वास ठेवू लागले. महादेवाचा धंदा चागलाच जमला. महादेवाची भक्ती वाढली. त्याची देवावरली भिस्त वाढली.

देवपूजा आटोपून झाल्यावर महादेवा हातात काठी घ्यायचा. काठीची तशी काही त्याला आवश्यकता नसे– पण काठी घेऊन फिरल्यान आपण मुरलेले वैद्य दिसतो असा त्याचा समज होऊन बसला होता. वैद्यकी सुरू झाल्यापासून त्याचा वेषही बदलला होता. पूर्वीच साध कुडत जाऊन आता बंगाली सदरा अंगावर चढला होता. ठिकठिकाणी उसवलेल्या टोपीची जागा आता फेटयान घेतली होती. रिकाम्या कपाळावर आता गंधाची रेषा उमटू लागली. पायाला चप्पल लागू लागली.

हाती काठी घेऊन महादेवा गावात फिरायला निघायचा, आसपासच्या ओळखीच्या लोकाकड जाऊन महादेवा बोलत बसायचा. महादेवा बोलायचा मोठ छान. जुन्या जमान्याच्या वैद्यकीचा इतिहास त्याला तोंडपाठ होता. चार लोकांना जवळ बोलावून महादेवा जुन्या जमान्याची 'हगवण' कशी होती ते सांगायचा.

"काय म्हन्तो मी—जुन्या जमान्याची हगवनही रायली नायी आता. आन् काय विचारता उपचार तेव्हाचे...उदराची लेंडी बकरीच्या दुधात उगाळून पोटावर लेप लावला का पायता पायता हगवन खलाश होये...आन आता ?...आता मोठचामोठचा झाडाच्या मुळचाबी उगाळून पाजल्या तरी हगवन हटाले खाली नायी."

खर म्हणजे महादेवाला हगवण म्हणजे काय हेच कळायच नाही. एखाद्याला दुसऱ्यांदा हाती लोटा घेऊन शेताकडून परतताना पाहिल की महादेवा लागलीच हगवणीच निदान करायचा. पोटावर लेप लावून घ्यायला सांगायचा. हगवणीचा महिमा ऐकवायचा.

"अहो—एकदा त एक मनुष्य...कोन वा"...बराच वेळ महादेवा अस्तित्वात नसलेल्या त्या व्यक्तीच नाव आठवायचा प्रयत्न करायचा.

"अं...जाऊ द्या नावाच का करा लागते. तऽऽ त्याले हगवन लागली—कव्हा ?"

"कव्हा ?"

"अहो पायटी — आन् सूर्य डोक्यावर येत नायी ते तो खलाश." हे सार ऐकल्यावर रोगी घाबरायचा. हे पाहून महादेवा म्हणायचा, "त घाबरते काहून गा—मी कायले आहो त." येवढ सांगून महादेवा त्याच्या पोटावर लेप लावायचा अन् या लेपामुळच मुळातच नसलेली हगवण बसायची—बंद व्हायची. अन दुसऱ्याच दिवशी पायली दोन पायली धान्य महादेवाकड रवाना व्हायच.

बोलता बोलता महादेवा इकड तिकड पाहायचा. एखाद लहान पोरग त्याला खेळताना दिसल की तो त्याला निरखून पाहायचा. जवळच्या माणसांना हे कोणाच पोरग म्हणून विचारायचा अन् मग स्वारी हाती काठी घेऊन त्या पोराच्या घरी जायची.

पोराच्या बापाशी महादेवा गप्पा मारायचा. पिकापाण्याच्या गप्पा झाल्यावर महादेवा जायला उठायचा अन् जाता जाता हळूच म्हणायचा,

"लहान पोरग बिरग नाही न धरात तुमच्या ?"

"अस कस म्हता ! आहे ना आपला बापू" मग महादेवा खाजगी आवाजात सांगायचा— "जरा सांभाळा, लहान पोराचा रोग पसरला आपल्या गावाकड."

"कोन्ता रोग ?" पोराच्या बापाला काळजी वाटे.

मग महादेवा पुन्हा बैठक मारी. "तस काही मोठ नाही पन् पोटाचा रोग आहे. नायीच सुधरला त पोराच्या जिवाले भीती रायते. तसात रोग बसते म्हना—फुगारा गिगारा उतरते...नाही अस काही नाही."

एवढ ऐकल्यावर पोराचा बाप महादेवासमोर पोराला उभ करायचा. मग महादेवा फेटा उतरून ठेवायचा. पोराच पोट दाबदूब करून पाहायचा. मग चिंतातुर झाल्यासारख दाखवून महादेवा म्हणायचा,

"पाहा—नशीब पोराच अनायसच मी आलो. नाही त दोन चार दिसातच पोटात फुगारा बरला असता. ह्याले इलाज करावच लागते." अस म्हणून महादेवा तडकाफडकी उठून चालू लागे. जाता जाता पोराची काळजी घ्यायला सांगायच मात्र तो विसरायचा नाही. पोराचा बाप औषधपाणी करण्याविषयी विनंती करायचा. मग महादेवा घरी जायचा, मुळ्याबिळ्यांची पिशवी आणायचा, हाती येईल ती मुळी उगाळून पोटावर लेप लावायचा. अजिबात जेवायच नाही अस वारंवार सांगायचा.

एक दोन दिवसातच उपासान पोराच्या पोटाचा गढ्ढा झाला की मग महादेवा म्हणायचा "पाहा उतरवला की नाही फुगारा... असा कसा उतरत नाही." अन मग महादेवाकडे गहू-ज्वारी आपोआप रवाना व्हायची.

महादेवा सहसा लेपच लावी. हगवण झाली तरी लेप. ताप आला तरी लेप ओकाऱ्या झाल्या तरीही लेपच. मात्र कोणत्या रोगावर लेप कुठ लावायचा हे त्यान ठरवून टाकल होत. पोटात घ्यायच औषध तो सहसा देतच नसे. त्याला त्याची दहशत बसली होती. काय झाल की एकदा गावातली म्हातारी जनावृद्धी आजारी पडली. महादेवाच्या लेपान भागल नाही, तेव्हा त्यान मनाचा हिय्या करून कसलीतरी मुळी उगाळून पाजली आणि दोनचार दिवस जीव धरून असलेली वृद्धी दोनचार घटकातच खलाश झाली.

म्हातारीच होती—मरायलाच टेकली होती—असे लोक बोलू लागले तेव्हा महादेवाला बर वाटल. पण तेव्हापासून त्यान कुणालाही औषध पाजल नाही. सार औषधपाणी लेपावरच निभवल. फार तर देवापुढचा अंगारा जिभेवर ठेवायचा इतकच.

अशीच एक दोन चिल्लर घर उरकल्यावर, पोटापाण्याची सोय झाल्यावर महादेवा काशिनाथ पाटलाच्या वाड्यात शिरायचा. पाटील म्हणजे महादेवाच पक्क गिऱ्हाईक होत. कशातलच फारस न कळणाऱ्या पाटलाला महादेवा हातोहात बनवी. पाटलाच्या वाड्यात महादेवा पाचसात दिवसांआड बोलताबोलता एखादा रोग पेरायचा. पाटलाच्या घरी निरनिराळे रोग महादेवाच्या सांगण्यावरून व्हायचे. कधी पाटलाला खोकल्याची उबळ आली की पाटलाच्या वाड्यात दम्याची साथ सुरू व्हायची. पाटलाच्या पोराच्या अंगावर लहानशी घामोळी जरी दिसली की एकदम देवी होणार असल्याच भाकीत महादेवा करायचा. अन् लगेच महादेवाचे लेप सुरू व्हायचे. तिनचार दिवसांतच मुळात नसलेला रोग लेपामुळ बसायचा. मिनिटा-मिनिटाला महादेवा पाटलाची काळजी घ्यायचा. त्यान पाटलाची प्रकृती अगदी नाजूक करून टाकली होती.

महादेवाला पाटलाकडून बहुधा नोटाच मिळायच्या. सारेच धान्य देतात हे लक्षात आल्यावर पाटीलकीच वेगळेपण म्हणून पाटील महादेवाला नोटा द्यायचे. अन् मग नोटांच्या गरजेप्रमाण महादेवा पाटलाच्या जिवाला बर-वाईट करी.

पाटलाकडची फेरी आटोपली की महादेवा सरळ घरी यायचा. सुखासमाधानान जेवून तो पसरायचा. महादेवा असा पसरला की त्याला आपल मागल जीवन आठवायच.

तसा काही महादेवा आमच्या गावचा नाही. आमच्या गावी यायच्या आधी महादेवा दूर कुठतरी बड्या हकिमाकड चाकरीला होता. हकिमाकडची सारीच काम तो करायचा. होता होता सहवासान हकिमाची वैद्यकी त्याच्या ध्यानात येऊ लागली. काही

काही मुळधा, पाले त्याच्या ओळखीचे झाले. महादेवाला काम करू नये अस वाटायच. हकीम त्याच्यावर रागावला की त्याला आणखीच वाईट वाटे. अन मग कसल तरी निमित्त काढून महादेवान नोकरी सोडली आणि थेट आमच्या गावी आला. माहिती असलेल्या मुळधा, पाले हेच त्याच भांडवल होत. याच भांडवलावर त्यान आमच्या गावी वैद्यकी सुरू केली होती.

हे सार त्याला सहज म्हणून आठवायच. पण दुसऱ्या क्षणी महादेवा असले विचार मनातून काढून टाकायचा. आता आपल सार काही व्यवस्थित आहे ह्यातच त्याला समाधान वाटायच. आपण फार हुशार निघालो अस त्याला वाटायच. तशात तो निश्चितपणे घोरायचा.

महादेवा अगदी निश्चितपणे जीवन जगत होता. त्याला कसलीच काळजी नव्हती. रोगाचा भरपूर साठा होता. मुळधापालेही आणता येत. कशाचीच काळजी उरली नव्हती. कालच्यासारखा आजचा अन् आजच्यासारखा उद्याचा दिवस जायचा.

आणि एक दिवस अचानक एक पाढरे पांढरे कपडे घातलेले, पांढरी पाढरी टोपी घातलेले ज्ञानी पुरुष मोठे कष्ट सहन करून आमच्या गावी आले. सारीकड धावपळ झाली. काशिनाथ पाटलाच्या वाड्यात धुमाकूळ माजला. त्या महाराजाच्या तैनातीत सारे लागले.

त्या पुरुषाच मन बाहेरच्या त्याच्या कपड्याइतकच पाढर पाढर शुभ्र होत. विचाऱ्याजवळ देवाच्या दयेन सार काही होत. फक्त एकच गोष्ट नव्हती अन् तीच तो मागायला आला होता. आल्यापासून ते परतीपर्यंत "आम्हालाच मते द्या, आम्हालाच मते द्या." असच तो सारख म्हणत होता. पाटलाशी दूरची ओळखही त्यान शोधून काढली होती. बैलाविषयी त्याच्या मनात आदर होता. गावच्या साऱ्या बैलांकड तो आदरान पाहात होता. त्याचे सोबतीही गाववाल्यांजवळ तीच मागणी करीत होते. मताच्या बदल्यात गावची सुधारणा की काय ते करायच ठरल. अन् गाववाल्यांनी दबून माना डोलवल्या.

झाल – भराभरा दिवस लोटले. दोनतीन गाव मिळून आमच्या गावी काशिनाथ पाटलाच्या ओसरीत पोराना शिकवायला मास्तर आला. पाटलाच्या चुलत्याच्या घरच्या एका खोलीत दवाखाना आला. पाढर, निळ, रंगीत रगीत औषधाच पाणी लोकांना फुकटात मिळू लागल. रोग पटापट बसू लागले आणि त्याचबरोबर महादेवाची वैद्यकीही...

महादेवाला पोटापाण्याची फिकीर लागली. हळूहळू त्याची स्थिती पार पालटली. बगाली सदरा जागोजाग फाटू लागला. फेट्याच्या कापडाची तुरपायीने शिवलेली टोपी महादेवाच्या डोक्यावर अवघडून बसू लागली. आता खरोखरच महादेवाला काठीची आवश्यकता भासू लागली. वाढलेल्या दाढीकड तो दुर्लक्ष करू लागला.

तशात एक दिवस सूर्य वर आला तरी महादेवाची बायको पसरलेलीच असलेली त्याला दिसली. तिला थडी वाजून ताप आला. महादेवान समाधानासाठी म्हणून कसलातरी लेप लावला त्या लेपान काही होणार नाही याची पूर्ण जाणीव त्याला होती. स्वतःच्या वैद्यकीबद्दल खरीखुरी माहिती त्यालाच होती.

दुपार झाली तरी काही फरक दिसेना. उलट तब्येत जास्त बिघडू लागली. महादेवा घाबरला. जरा विचार करून तो सरकारी वैद्याकडे गेला.

"हे पाहा महादेवा, मला तर हे जमणार नाही.. तुम्ही आपले इलाज चालू ठेवा. त्यानच होईल बर." – अस म्हणून वैद्य निघून गेला. महादेवा आता चागलाच पाढरा पडला. पण पाटील काही करील अस वाटून तो पाटलाकडे गेला.

महादेवाचा निरोप घेऊन गडी आत गेला.

"पाटील ! महादेवा वैद्य आले."

"गरज पडली असन पैक्या-अडक्याची. त्याले म्हना पाटील गावी नाही अन् आज कायी येत नाही."

पाटलाचा हा आवाज खोलीबाहेरच उभ्या असलेल्या महादेवान ओळखला. गड्याचा निरोप ऐकल्यासारख करून महादेवा शून्य मनान परतला. आपण आता एकटे पडलो असल्याची जाणीव त्याला झाली.

सार काही देवावर सोपवून बायकोला तोंडावरून पांघरूण देऊन महादेवा गप्प बसला. संध्याकाळ झाली. ताप पाहायला म्हणून महादेवा पांघरूण काढतो अन् जरा वाकून बघतो.. ...तर सार काही सपलेल होत.

महादेवा लहान मुलासारखा ढसाढसा रडला.

...त्या घटनेला आता तीनचार वर्षं झाली असतील. पण महादेवा मात्र तेव्हापासून कसाकीच वागतो आहे. खाण्यापिण्याची त्याला चिंता नाही, कपडचालत्याची त्याला शुद्ध नाही. कुणी दिल ते खाव, कुणी दिल ते नेसाव अस सगळ चालल आहे. अगदी ओळखू न येण्याइतका तो बदलला आहे. त्याचा आवाज भेसूर झाला आहे. त्याचा स्वभाव बदलला आहे. तो चिडचिडा झाला आहे.

नेहमीच तो महादेवाच्या देवळात येऊन बसतो. महादेवाच देऊळ मोकळ्यात आहे पण मूर्तीपाशी अंधार आहे. त्याच अंधाऱ्या गाभाऱ्याच्या एखाद्या कोपऱ्यात महादेवा बसलेला असतो. तिथून तो अधुकशा दिसणाऱ्या महादेवाच्या मूर्तीकडे सारख टक लावून पाहात असतो.

या मधल्या काळात गावाची सुधारणाही झाली आहे. किराणा दुकान वाढली आहेत. लोकसंख्या वाढली आहे. शाळा भरायला आता ओसरी तयार झाली आहे. दवाखाना खुद्द पाटलाच्या वाड्यात एका भागाला आहे. मच्छीबाजार भरायला गाधीचौक तयार झाला आहे. मुलाना खेळायला नेहरू मैदान तयार झाल आहे आणि आता पचशील कापड दुकानही लागल आहे. कच्चा रस्ता व्हायची खटपट सुरू आहे...पण महादेवा कशातच नाही. दोनतीन वर्षांपूर्वी तो होता तसाच आहे. ओळखू न येण्याइतका तो विद्रूप झाला आहे. बाकी महदेवात किंचितही फरक झालेला मला दिसत नाही. मात्र मूर्तीकडे पाहून मनात येईल तेव्हा तो हसतो – अगदी भेसूर.

• • •



या कथेच मॉडेल जुन आहे. तो अश्वत्थामा आहे.
माणस त्याला ओळखत नाहीत. कलावंत ओळखतात—

# मॉडेल

माधव के. आपटे

तो पाहा. तिथ, कोपऱ्यात. उकिरडचा-शेजारी. फुटका फूटपाथ, जवळ देऊळ, पाठीमाग पिंपळपार. लोकांची गर्दी. भावि-कांची भक्ती. पण कोपऱ्यात उकिरडा. कचरा अस्ताव्यस्त. त्यावरच त्याच आसन. रात्री तो कचरा मुद्दाम उपसतो. त्याचा विछाना होतो आणि कचऱ्याची उब मिळते.

इथच राहतो तो. इथच राहिला आहे. इथच राहील. तो इथ इतकी वर्ष आहे पण कोणाच्या ध्यानी येत नाही. तिथ त्याला पाहायची सवय झालीय सर्वांना. तिथ तो नसेल तरी ध्यानी यायचा नाही. काही तरी कमी आहे इतकच जाणवेल. देवळाच्या गज-बजलेल्या दृश्याचाच तो एक भाग आहे.

जरा गंमत ह. पाहा त्याला ! निरखून वघ. ओळखतोस का त्याला ? नाही ? निदान तू तरी ओळखायला हव होतस. तो तुझ्या परि-चयाचा आहे—घनिष्ट परिचयाचा आहे.

पाहा, खाणाखुणांची नोंद घे. एक एक. त्याचा चेहरा वघ. त्याच्यावरच्या सुरकुत्या वघ. वाढलेली दाढी पाहा. कपाळावरची जखम निरख. भुवयांची जाडी पाहा.—नाही ओळख पटत ? मग ही घे खात्रीची कसोटी! ... पाहा. त्याच टोकदार नाक...खोल गेलेले भकास डोळे (-त्यांतल्या जुन्या तेजाची आठवण व्हावी ! ) ही कसोटीही लागू पडत नाही ? मग निरख आपादमस्तक. एक पाय लंगडा आहे ... दुसरा सुजला आहे ... त्यावरच्या मळक्या पट्ट्या ... कमरेच अपुर पटकूर ... रोगांनी ग्रासलेल शरीर ... नासक्या जखमांच्या निशाण्या, डोक्यावरच्या पिकल्या केसातून डोकावणारी टेंगळ...थांब ह. मी त्याला चालायला सांगतो. वघ त्याची चाल...लंगडी, तरी लकवीची. नाही आठवत ही लकब ? ओरडायला सांगतो त्याला...मुका आहे परंतु ओरडेल...डुकर रेकल्यासारखा. ऐक त्याच रेकण. तू ऐकल आहेस पण आता तुला स्मरत नाही...तुझ्या स्मरणशक्तीवर सावट आल आहे रे ... त्याच्या एक एक गोष्टी तुझ्या परिचयाच्या

आहेत मग तुला का आवडत नाही ?

पण तुला आवडत नाही यात तुझा तरी काय दोष ? ज्या प्रकारे तुला त्याची ओळख करून दिली त्यांचा हा दोष आहे...किंबहुना अशी ओळख करून देण हेच मुळी चुकीच आहे, पण ते प्रचलित आहे. फार प्रचलित आहे. परिचय करून देणाऱ्याना या दोषाची कल्पना असतेही. पण ते आपल्यातच मशगुल असतात आणि करून घेणाऱ्यांना काहीच कल्पना असत नाही..

तू म्हणशील काय पुराण लावल आहेस हे. काहीतरी चुरचुरीत सांगायच सोडून या भिकारड्याचा कसला परिचय करून देतोस ! पण मी कुठ परिचय करून देणार आहे ? कुणीतरी तो अगोदरच करून दिला आहे. मी फक्त तुझ्या स्मरणशक्तीची परीक्षा पाहातोय. ज्यानी परिचय करून दिला ते फार थोर होते...फार थोर आहेत. परतु माझी तक्रार वेगळी आहे. परिचय नीट केला नाही अन् म्हणूनच ओळख पटत नाही अस मला म्हणायच आहे.

थाव. रागवू नकोस. मला माहीत आहे तुला काय म्हणायच आहे ! 'या रोगट भिकारड्याशी माझा सबंध जोडू नको हेच ना ?' परतु मी माझा उखाणा पुढ चालू ठेवणार आहे तू त्याच उत्तर सागीपर्यंत. मी तो अधिक विशद करीत जाईन. जिथ तू ओळखशील तिथ मला आनंद होईल आणि सर्व स्पष्टीकरण मी करीन. ते ऐकल्यावर तुझी खात्री पटेल. पण तोवर धीर धर. स्मरणशक्तीला ताण दे... ओळख त्याला ओळख...ओळख.

नाही ओळखता येत ? पण भलतीकडच जाऊ नकोस. रागवू नकोस. आपण हा खेळ पूर्ण करू या.

कोण म्हणाल होत तुला ? हळूच कोणीतरी सागितल होत.. कानात, उजव्या कानात. असच होत ना ते ? 'एक भव्य देऊळ होत. फार जुन त्याच शिल्प, त्याच वय सागत होत.. त्या वरच्या शिल्पाकृत्या पुरातन देवदेवताच्या होत्या..... गाभ्यातील मूर्ती अती सुदर होती .. दीपज्योतीच्या मद प्रकाशात आणि देवळापाठीमागच्या पिंपळाची सळसळ चालू असता दर्शन घेताना एक वेगळ गांभीर्य येई.'

थांब रे. मधे बोलू नकोस. काय म्हणालास ? 'कुठल्यातरी' कथा कादंबरीतल्या या ओळी असतील ! मला आनंद होत आहे. पण अर्धवट बोलू नकोस. तुला सगळ समजल असल तर सांग. मला पुढ सांगू दे. तो पुढ म्हणाला होता...कोपऱ्यात एक भिकारी होता. वैशिष्ट्यपूर्ण भिकारी. तो लंगडा होता आणि मुकाही—कोणी त्याला हिंदू समजत. कोणी मुसलमान. पण तो हिंदू नव्हता. मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध किंवा ज्यू कोणीच नव्हता ( ...आणि शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण होता किंवा नाही कोणास माहीत. ) तरीही तो सर्व काही होता. तो कचऱ्यात बसे, कचऱ्यात निजे. कुणाचच त्याच्याकड लक्ष नसे तरी सर्वांच असे...

### कधी येईल सायान्ह !

माथी तापते प्रखर
दग्ध दुपारचे ऊन,
जीव भटके एकला
माळावर वणवण !
पोळतात पायतळी
तापलेले रुक्ष कण,
होरपळती देहाला
अग्नि–ज्वालेपरि क्षण !
ओसाड या प्रदेशात
नाही तहानेस जळ,
विसाव्यास नाही छाया
नाही झुळुक शीतल !
तप्त–जाळती–पोळती–
कधी सरेल माध्यान्ह ?
रम्य शामल छायांनी
कधी येईल सायान्ह ! !

—*विश्वनाथ जोशी*

पाहा, तुझा चेहरा आनदान फुलला आहे. उत्तर तुझ्या ओठावर आहे. पण ते पूर्ण उत्तर नव्हे. तुला त्याचा पूर्ण परिचय झाला असताही तू त्याच एक अंग उत्तर म्हणून सागणार आहेस. 'हा अश्वत्थामा कादबरीचा नायक आहे !' होय. हा अश्वत्थामा कादंबरीचा नायकच आहे. तो अश्वत्थामा ज्यान वाङमयात प्रचड वादळ निर्माण केल. हजारो वाचकानी वाङमयीन अश्वत्थाम्याच दर्शन घेतल. त्याच्या बरोबर मुक्याच्या बोलीतते बोलले. त्याची सुखदुःख त्यांनी अनुभवली आणि उत्कटतेमुळ त्यांच्या हृदयाला पीळ पडला. ठिकठिकाणी कादबरीचे उद्घोष झाले. तीवरच्या चर्चा रंगल्या. अश्वत्थामा कादंबरीच एकूण वातावरण व विशेषतः अश्वत्थाम्याच पात्र अतिवास्तव आहे असा आरोप टीकाकार करू लागले. एका चर्चेत तू स्वतः उदाहरण देऊन सागितलस, 'अश्वत्थामा पूर्ण वास्तव आहे' परंतु तुला अश्वत्थाम्याची खरी ओळख पटलीच नव्हती. त्याच्या वाङमयीन रूपाची तुला खडा न खडा माहिती असली तरी अस्सल अश्वत्थामा तू ओळखू शकला नाहीस. स्वतः कादंबरीलेखकाला तरी त्याची खरी ओळख पटली होती किंवा नाही याची शंकाच आहे. एका सुप्रभाती हे लेखक आपल्या मित्राबरोबर या देवळावर आले व देवावर त्याचा विश्वास नसल्यामुळ बाहेरच घुटमळले. या भिकाऱ्यान त्याच लक्ष वेधून घेतल आणि त्यानी त्याच बारकाइन निरीक्षण चालवल. एवढ्यात त्याचा मित्र बाहेर आला. त्यान या भिकाऱ्याला अर्धा आणा दिला—आणि लेखकानी फक्त खिसे चाचपले. त्याच्या सुदैवान परमेश्वरान त्याना 'फोटो मेमरी' दिली होती. त्यांनी दिसल तेवढ टिपल नव्हत, ते रचल आणि अश्वत्थामा कादंबरीचा जन्म झाला. कादबरीन त्याना अमाप पैसा दिला, आडमाप प्रसिद्धी दिली. कादंबरी लिहिताना किंवा लिहिल्यानतर अश्वत्थामा एकसारखा त्यांच्या मनश्चक्षूपुढ होता. आपल्या कल्पनेतल त्याच रूप न्याहाळताना त्याना अतिशय आनंद होई. परतु, त्याच कारण या भिकाऱ्यासाठी आपण काही केल आहे किंवा पाहिजे हे नव्हत. एक व्यक्तिचित्र आपण किती यथार्थपणे दाखवू शकतो या अभिमानान त्यांना आनद होई आणि अश्वत्थाम्याच्या स्वरूपाला अधिक सुस्पष्ट करण्यासाठी ते झटू लागत. ( आणि स्वत.च्या कौशल्यावर खुश होत ) सदरहू लेखक हा असा एकच कलावत नाही ज्यान या भीकमाग्याचा आपल्या कलेसाठी आश्रय केला. याच लेखक महाशयांच्या एका चित्रकार मित्रान त्यांना त्यासबधी विचारल तेव्हा त्यांनी याचा हा पत्ता देऊन टाकला. हे थोर चित्रकार रोज देवळावर येऊ लागले. आपली भरलेली

## दूर दूर

क्षितिजाच्या ओठी
वाकते आकाश
करी सावकाश मधुपान ।
पाहते धरणी
हळूच चोरून
क्षितिज गगन एक झाले ।
क्षितिजाच्या गाली
खुलते माणिक
पाहती देवक स्वर्गातून ।
आपुले गुपित
कळता साऱ्यांना
पळते क्षितिज दूर दूर ।

—शरद गजानन वाघ

पाइप ओढीत ते समोरच्या कोपऱ्यात उभे राहत आणि घरी जाऊन पुढच्या भागाच चित्रीकरण करीत. हळूहळू एक महान चित्र पूर्ण झाल आणि नंतर भरलेल्या प्रदर्शनात त्याला पहिल बक्षीस मिळाल. त्या थोर चित्रकारान एक महान कलाकृती सजीव केली होती. देवालयाच्या गर्दीची ही बोलकी पार्श्वभूमी, कचऱ्याच्या फलाटाच आसन आणि हा कारुण्यमूर्ती अश्वत्थामा यांच अगदी यथार्थ दर्शन त्यांनी घडवल होत. अश्वत्थाम्याच्या व्यक्तिरेखेचे कोणतेही भाग त्यांनी गाळले नव्हते. विशेषतः डोक्याची टेंगळ, नासक्या जखमांच्या निशाण्या आणि मळकट रकटयातून डोकावणारे रोग, या गोष्टी बीभत्सपणाचा आरोप येण्याची शक्यता असूनही त्यांनी जशाच्या तशाच चितारल्या होत्या. पुढ तसा आरोप टीकाकारांनी केलाही परंतु रसिकांनी एकमुखान त्या कलाकाराच अभिनंदन केल. त्या वेळची एक आठवण द्यायला पाहिजे तुला. त्या चित्राच्या सौंदर्याच रसग्रहण करणारा निबंधही तूच वाचला होतास. तू म्हणाला होतास, याथातथ्य चित्रण ( Faithful Reproduction ) म्हणजे जर बीभत्सपणा असेल तर चित्रकलेतून वास्तवतेला फाटाच द्यायला हवा आणि नुसती स्वप्नदृश्य म्हणजे चित्रकला असा अर्थ होईल. उत्तरादाखल चित्रकारांनीही सांगितल होत, 'ज्या वेळी चित्रवस्तूत मुद्दाम बाहेरून काही घुसडल असेल, मग ते बर दिसो अथवा वाईट, त्याला नाव ठेवली तर मला काही वाटणार नाही— किंबहुना अशा प्रकाराला मी बीभत्स म्हणेन. परंतु जसच्या तस चित्रण करताना एखादी गोष्ट रूढ नजरेला खटकली तर तेवढ्यासाठी त्याला बीभत्स म्हटलेल मला बिलकुल खपणार नाही. या दृष्टीन पाहिल तर हे चित्र पूर्ण वास्तव आहे. या उप्परही कुणाची शंका असेल तर मी ज्या व्यक्तीवरून हे चित्र उतरवल ती व्यक्ती सादर करायला तयार आहे.

परंतु चित्रकारावर ती वेळ कधीच आली नाही. त्यानी दिलेल स्पष्टीकरण सर्वांना पुरेस वाटल आणि आपल्या कुंचल्याच्या सामर्थ्याची किमयागारी अनुभवीत ते तल्लीन होऊन गेले.

परंतु, कलाकारांची या अश्वत्थाम्यावरील नजर इथच संपली नाही. लेखक महाशयांची ती कादंबरी फार गाजल्यामुळ एका विख्यात नटाला त्यावर बोलपट काढावा अस वाटू लागल. अश्वत्थाम्याच कादंबरीतील वर्णन वाचून आणि कलाकारान काढलेल त्याच चित्र पाहून हे व्यक्तिचित्र पडद्यावर अमर होऊ शकेल अशी खात्री त्यांना वाटू लागली. त्यांनी पटकथा लिहून घेतली आणि अभिनयाच्या सरावाला सुरुवात केली. परंतु ती सोपी गोष्ट नव्हती. त्यांना अपरंपार कष्ट करावे लागले. लंगड्या पायाची आणि सुजल्या पायाची ही लकवीची चाल. नासक्या जखमांच्या विचित्र निशाण्या. रोगग्रस्त शरीराच दर्शन, डोक्यातली टेंगळ, खोल गेलेले डोळे, वाढलेली दाढी आणि मुक्या तोंडावरचे वैशिष्ट्यपूर्ण भाव, डिवचल्यावर डुकरासारख रेकण, एक एक जमवून घेताना त्यांच सार अभिनयकौशल्य पणाला लागल. त्यांचा 'मेकअप' करणाऱ्या माणसाला तर शूटिंगपूर्वी चारचार तास खपाव लागे. तरीही कुठ वैगुण्य राहून जाई. परंतु नटराज ते आपल्या अभिनयकौशल्यावर निभावून नेत. अशा या असामान्य अभिनयपटूच शूटिंग तर पूर्ण झाल पण 'रशेस्' पाहताना मात्र त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. कमाल होती मेकअप करणाऱ्याची आणि त्याहून अभिनय करणाऱ्याची.

प्रेक्षकांनीही असाच शेरा दिला, अस उत्कृष्ट व्यक्तिचित्र पडद्यावर आल नाही आणि येणार नाही. चित्रपटाच्या प्रसिद्धीखात्यान चित्रपटावर चर्चा घडवून आणली. त्या चर्चेत भाग घेण्यासाठी सर्व प्रकारच्या प्रेक्षकांना आमंत्रण होत त्यात तूही होतास. आपली नेहमीची पुरोगामी मत तू जोरदारपणे मांडलीस आणि टाळ्या मिळवल्यास. मित्रा तू एक रसिक आहेस हे मी आनंदान मान्य करीन. पण या बाबतीत काहीतरी चुकल आहे अस अजूनही वाटत. बरेच दिवस झाले. हे सगळ झाल. पण, आज काय परिस्थिती आहे अस वाटत तुला ?

कादंबरीचे आणि चित्रपटाच्या हक्काचे आलेले पैसे घेऊन लेखक महाशयांनी एक सुंदर फ्लॅट घेतला आहे. तिथ बसून ते नव्यानव्या कथानकांचा शोध करीत आहेत. चित्रकार नव्या कल्पनांच्या शोधात पूर्वीपेक्षा उंची गुडाखू पाइपमध्ये भरून झुरके घेत आहेत. नटवर्यांनी आपली नव्या मॉडेलची कार प्रेयसीला दाखविण्यासाठी बाहेर काढली आहे.

मधूनच लेखकाना आपल्या कादंबरीची आठवण येते आणि आपणच लिहिलेल्या वर्णनांची मौज ते पुन्हा पुन्हा अनुभवतात. चित्रकारांची नजर अशीच कधीतरी उंच ठिकाणी लावलेल्या त्या चित्राकडे जाते आणि क्षणभर डोळे मिटून हातातल्या पाइपच्या टोकाने ते हवेत रेषा उमटवतात. नटवर्यांना पुनः कधी तरी तसच लंगडत चालाव वाटत—रेकाव वाटत आणि हे सर्व करताना अभिमानान त्यांचा ऊर दाटून येतो. पण मित्रा, हा समोर बसलेला—अनेक कलांचा नायक होता तिथच आहे—तसाच आहे—दुर्दैवान तसाच राहणार.

• • •





एखाद्याच शरीर सिमेंटशी एकजीव झाल तर त्याची अनंत स्मारक होतील. अशा जगावेगळ्या स्मारकांची कल्पना करणारी प्रेयसी या जपानी कथेत तुम्हाला भेटेल. बराच काळ तुम्ही तिला मग विसरणार नाही.

---

# मानवी सिमेंटची भिंत

एक जपानी लघुकथा

: अनुवाद :

**मनोहर देखणे**

---

मतसूदो योशीजो सिमेंटची पोती रिकामी करीत होता. त्यान आपल्या अंगावर सिमेंट पडू नये याची खूप काळजी घेऊन-देखील डोक्याच्या केसांवर नि ओठांवर सिमेंटचा पातळसा थर साठला गेला होता. नाकात शिरणार सिमेंटही त्याला त्रासदायक होत होत पण नाक शिंकरायलाही त्याला उसंत नव्हती. कारण, मिनिटागणिक सिमेंट-मिक्सरमधून दहा घमेली सिमेंट तयार होत होत– आणि ते त्याला काढाव लागत होत.

त्याला दिवसातले अकरा तास काम कराव लागत होत आणि त्यातून एक वेळही नाक साफ करायला सवड होत नव्हती. मधल्या जेवणाच्या सुटीत खातो न खातो तो पुन्हा सिमेंट-मिक्सर उघडण्याची वेळ होई.

दिवस मावळत होता. त्याच सर्वांग कष्टान दमलेल थकलेल होत. पोती हलवायला त्याची सारी शक्ती खर्ची पडली होती. अखेरच पोत सरकवीत असता एकाएकी त्याची दृष्टी त्या पोत्यांतल्या एका डब्यावर गेली. तो लाकडी डबा हातात घेत तो आश्चर्याने उद्‌गारला, " हे काय आहे!" पण आश्चर्य आवरून त्याने पोत्यातल सिमेंट मिक्सरमधे ओतल. नंतर तो डबा कोटाच्या खिशात ठेवला व मनाशीच पुटपुटला, हलका दिसतोय ? फारसे पैसे नसावेत–! त्याची कामाची गती मंदावली होती व त्यामुळे मिक्सरमधे आणखी सिमेंट टाकण्यासाठी फावड वेगान भरून टाकाव लागत होत. चपळाईन त्यान एक फावड ओतल व दुसर भरू लागला. मिक्सरची गती कमी झाली व ते बंद झाल. योशीजोच काम बंद व्हायची वेळ झाली होती. त्यान मिक्सरपासून रबरी नळी दूर केली व हात व चेहरा पुसला. मग जेवणाचा डबा खांद्यावर लटकावला व घराकड निघाला. त्याच सार लक्ष आता घरच्या जेवणावर व विशेषत: तांदळाच्या मद्यावर केंद्रित झाल होत.

त्यान नवा कारखाना ओलांडला. कार-

## नाते !

तुझे माझे नाते
युगांचे कितीक
कराया कौतुक– व्यास कमी !
आसवांनी तुझ्या
ओले माझे डोळे
हसताच मिळे– सारे काही !
असे गोड नाते
मेघ नि गिरीचे
भाव अंतरीचे– सारखेचि !

—रमेश गोविंद वैद्य

खान्याच बांधकाम संपत आल होत–लवकरच विजेच कनेक्शनही मिळणार होत. कीराकीच्या डोंगरावर अंधार साकळला होता व वर्फाने तो पार झाकून टाकला होता. त्याच्या घामेजल्या शरिराला एकाएकी थंडीची एक सूक्ष्म जाण झाली. शरीर थरथरल... आता तो किजो नदीच्या जवळून चालला होता–जिथ नदीच पाणी दुधिया रंगाच बनून गर्जत पुढे धावत होत.

“ मरू दे ! – तो मनाशी बडबडू लागला,” या साऱ्यांना मरू दे ! – किती लज्जास्पद गोष्ट आहे की थेरडी पुन्हा गर्भार झालीय् !”

त्याच्या मनात त्याच्या सहा मुलांविषयी विचार आले, जे भाड्याच्या एका खोलीत अडमडत होते–आणि पुन्हा थंडीच्या आरंभी परत सातव मूल जन्मणार होत... कस भागणार यापुढ ? मालक आपल्याला एक येन व नव्वद सेन रोजी देतो. त्यातून एका येनचे तांदूळ व उरलेल्या नव्वद सेनमधून कपडे, घरभाड वगैरे सारा इतर खर्च ! अन् मग दारूला कुठून उरणार पैसे ?”

एकदम त्याला सापडलेल्या डब्याची आठवण झाली. त्यान कोटातून तो बाहेर काढला व पायजम्यावर घासून साफ केला. डब्यावर काहीच लिहिलेल नव्हत– झाकण घट्ट होत. “काही तरी विशेष असाव डब्यात–” म्हणत त्यान तो एका दगडावर आपटला–त्यासरशी तो फटकन उघडला गेला व त्यातून एका कपड्याच्या तुकड्यात गुंडाळलेला एक कागद दिसला. त्यान कागद उचलून वाचायला सुरवात केली–

“ मी जोमेरा सिमेंट कंपनीत काम करणारी युवती आहे– सिमेंटची पोती शिवण्याच काम करते. माझा प्रियकरसुद्धा याच कंपनीत नोकरीला होता. सिमेंट करण्याच्या मशीनमधे दगड टाकायच काम तो करी. सात आक्टोबरला सकाळीच काम करताना चिखलावरून त्याचा पाय घसरला व हातातल्या दगडाबरोबरच तोही त्या सिमेंट बनवायच्या मशीनमध्ये जाऊन पडला.

दुसऱ्या कामगारांनी त्याला बाहेर काढण्याची खूप धडपड केली पण ती व्यर्थ गेली–तो दगडांच्यात जाऊन पुरता अडकला होता...व दगडांबरोबरच त्याच्या देहाच्याही ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या व गुलाबी रंगातील एकेक दगड बनून त्या ठिकऱ्या बाहेर पडू लागल्या आणि तिथून त्या दुसऱ्या मशीनमधे जाऊ लागल्या. जिथ सिमेंट तयार होत होत तिथ त्याच्या देहाचा बारीक बारीक चुरा झाला व नंतर ते सिमेंटमध्ये परिणत झाल.

त्याच्या अस्थी, त्याच मांस, त्याचा मेंदू या सर्व गोष्टींच पॉवडरमध्ये रूपांतर झाल होत. हाय ! माझा प्रियकर फक्त सिमेंट बनून नष्ट झाला होता. जे उरल होत भाग, ते कपड्याच्या चिंध्यांच्या रूपान अन् मी ती पोती शिवू लागले होते ज्यात ‘ते’ सिमेंट भरल जाणार होत.

त्याच सिमेंट बनण्याच्या आदल्या क्षणी मी हे पत्र लिहीत आहे–हे लिहून, डब्यांत घालून मी तो डबा त्याच पोत्यात शिवून टाकीन.

त्याच्या सिमेंटचा उपयोग एखाद्या थिएटरच्या व्हरांड्यासाठी अथवा मोठ्या हवेलीच्या भिंतीसाठी होऊ नयेस वाटत पण मी ते कस रोखू शकणार? तू जर एखादा कामगार असशील तर ह्या सिमेंटचा उपयोग अशा जागी होऊ देऊ नकोस.

आणखी एक गोष्ट, तुला हव तिथ तू हे सिमेंट वापर. त्याला जिथ गाडल जाईल ती जागा यशस्वी ठरेल. तो एक चांगला मजबूत मजूर होता व त्याला जिथ लावाल तिथ तो चांगलच काम करील.

तो अत्यंत नम्र वृत्तीचा पण तगड्या शरिराचा माणूस होता. अजून तरुण होता–पंचविशीही ओलांडली नव्हती. त्याच माझ्यावर किती प्रेम आहे, हेही मला नीटस समजल नव्हत. अन् आता मी त्याच्यासाठी हे पोत शिवतेय–नव्हे. कफनच! स्मशानात न जाता तो फिरत्या मशीनमध्ये अंतर्धान पावला. पण त्याची समाधी मला कुठ सापडणार ? ते मला कस कळणार! तू जर मजूर असशील तर कृपा करून उत्तर धाड. त्या बदल्यात मी तुला त्याच्या कोटाचा हा फाटलेला तुकडा भेट देईन ज्यात हे पत्र लपेटलेल आहे.

त्या दगडावरची धूळ, त्याचा घाम हेच सार त्याच्या कोटाला लागलेल आहे. हा तुकडा त्याच्या त्याच कोटाचा आहे, जो अंगात घालून तो मला आपल्या बाहुपाशात लपेटून घेत असे! किती घट्ट पकड असे त्याच्या हातांची!


कृपया माझ्यासाठी एवढ काम कर– नाही करणार? मला ठाऊक आहे ते किती कठीण आहे ते–पण तरीदेखील त्याच्या सिमेंटचा ज्या जागी वापर केला गेला ती जागा व ती तारीख मला कळव. तसच तुझ नावही. करशील ना एवढ माझ्यासाठी! - अच्छा नमस्ते-”


–मुलांचा आरडाओरडा योशीजोच्या डोक्यांत पुन्हा एकदा घुमला. त्यान पत्रावरच त्या मुलीच नाव व पत्ता पाहिला व ग्लासातली मदिरा एका दमात पिऊन टाकली.

“ मला फक्त प्यायला हव– प्यायला !” तो ओरडला. “माझा हात जिथ पोचेल त्या सर्व जीनसा मी तोडून टाकणार आहे !”

–पण तोच हाताच्या अंतरावर असलेल्या पत्नीच्या गर्भातील नव्या अंकुराची त्याला आठवण आली व त्याची सारी नशा उतरली. तरीसुद्धा त्याच्या नजरेसमोर मानवी सिमेंटची ती गुलाबी भिंत हसत उभी होती... आणि त्याच्या डोळ्यांतून पाणी ठिबकत होत !

• • •





• एका इमानी कारकुनाचा अनुभव

**मामा कोकजे**

# माझा विमानप्रवास

**फा**यलीत डोक खुपसून बसलो होतो. भिकू शिपाई टेबलाजवळ येऊन अदबीन उभा राहिला. (माझ्यासमोर अदबीने उभी राहणारी एकुलती एक व्यक्ती म्हणजे भिकू शिपाई.) मी वर पाहिल. अर्थ – 'काय रे ! काय आहे ?"

"साहेब बोलावताहेत."

शब्द दोनच परंतु त्यांनी माझे नाडीचे ठोके शंभर पटींनी वाढले. घशाला कोरड पडली. दरदरून घाम फुटला. काय चूक झाली असेल याचा विचार करीत खुर्चीचा आधार घेऊन उभा राहिलो. या विचाराच्या तंद्रीतच साहेबांच्या खोलीच्या दिशेने पावले टाकू लागलो. भिकूने दरवाजा उघडला आणि मी साहेबांसमोर अपराधी मुद्रेने गेलो.

आता साहेब वर पाहणार व कडाडणार, 'मिस्टर पावटे, हॅव यू एनी सेन्स ? काय काय झोपेत काम करता की काय ? किती चुका या स्टेटमेंटमध्ये ! जा पुन्हा करा, आणि डोळे उघडे ठेवून लक्ष देऊन करा. धांदरट कुठले . . . !

साहेबांची क्रुद्ध नजर मला दिसू लागली. साहेबांचे नेहमीचे शब्द बंदुकीतून सुटणाऱ्या गोळ्यांप्रमाणे आधीच कानांवर थडपडू लागले. साहेबांनी वर पाहिल. तोफखाना सुरू होणार म्हणून म्यालेला मी सशाप्रमाणे अंग चोरून उभा राहिलो. श्वासोच्छ्वास बंद पडला, पाय लटपटू लागले.

"मिस्टर पावटे, बसा." साहेबांनी समोरच्या खुर्चीकड बोट दाखवल. मला वाटल फायरिंग सुरू झाल. मी जास्त ताठ होऊन खाली मान घातली. नंतर ध्यानात आल, साहेब 'बसा' म्हणाले. शब्दाचा अर्थ लक्षांत येताच मी गोंधळलो. मी चुकीच ऐकल की साहेब तस चुकून म्हणाले ? गोंधळलेल्या मनस्थितीत मी तसाच उभा राहिलो.

"सिट डाऊन प्लीज" ( डाऊन भलतच जोरात ) साहेबांचे हुकमी शब्द कानांवर पडले आणि मी खुर्चीत कोसळलो. विचार करायलाही वेळ मिळाला नाही. किंबहुना विचारशक्तीच कार्यच बंद पडल.

"हे पाहा पावटे, उद्या तुम्हाला दिल्लीला जाव लागणार आहे. परवा सकाळी तुम्ही तिथ पोहोचण आवश्यक आहे." साहेबांनी कामाच स्वरूप समजावून दिल. "जाल ना ?"

'येस सर' हे शब्द नेहमीप्रमाणे ओठांवर आले होते. परंतु, झटकन लक्षात आल की हे नेहमीच फायरिंग नाही. दिल्लीसारख्या दूरच्या प्रवासाला जाण्याचा प्रश्न आहे आणि या विचारासरशी 'येस सर' शब्द जिभेवरच आतल्या आत विरघळले. भिडस्त स्वभावाने उचल खाल्ली.

कोणत्याही गोष्टीत झटकन निर्णय घेण्याची व तो सांगण्याची मला सवय नाही. शिवाय दिल्लीसारख्या परप्रांतात जायच तर एकुलत्या एक पत्नीचा सल्ला नको का घ्यायला ? मी एक स्मित करून गप्प बसलो. म्हणजे 'हो किंवा नाही'चा निर्णय तावडतोब द्यावयास लागू नये ही इच्छा.

"अहो विचार कसला करताय ?"

"नाही . . . म्हणजे मीच गेल पाहिजे काय ?" मी भीत भीत विचारल.

"होय. कारण, ह्या प्रकरणाची तुम्हालाच नीट माहिती आहे. हे कागदपत्र तुम्ही सतत हाताळले आहेत. तुम्हीच नीट मार्गदर्शन करू शकाल. म्हणून तुम्हाला पाठवतोय. काय समजल ? "

"बर ठीक आहे. पण केव्हा निघायचय मी ?"

"दॅट्स् गुड, उद्या रात्रीच्या विमानान निघा." साहेब आनंद झाल्यासारखे ओरडले. माझा मात्र चेहरा आणखी पडला आणि मी एक मोठा आंवढा गिळला.

"विमानान ?" मी दचकून ओरडलो-दिल्लीला जायच आणि तेसुद्धा विमानान ! कल्पनतसुद्धा जे शक्य झाल नाही ते प्रत्यक्षात घडण्याचा योग ! छे, छे, कुठतरी घोटाळा होतोय. रेल्वेच्या तिसऱ्या वर्गान दिल्ली

गाठण मुश्कील; तिथ विमानान ? शक्यच नाही. साहेब काहीतरी चुकून बोलले असावेत. मेष राशीला या आठवडयात प्रवास-लाभ नाही. असलाच तर लोकलच्या तिसऱ्या वर्गाचा किंवा बस-ट्रॅमचा ! की साहेब माझी चेष्टा करीत आहेत ? तेही शक्य नाही. साहेब आणि चेष्टा हे दोन शब्द एकत्र येऊच शकत नाहीत अर्थात कारकून मंडळी साहेबाची चेष्टा करतात ती गोष्ट वेगळी.

माझी गोंधळलेली अवस्था साहेबांच्या ध्यानात आली असावी. "तुम्हाला जायच नाही क् काय मिस्टर पावटे ?" त्यानी विचारल.

"छे, छे, तस नाही साहेब! " मी उत्तरलो.

"मग, असे गोंधळलेले का दिसता तुम्ही. काही अडचण आहे ? काय स्पष्ट सागा."

"साहेब, तस नाही. खर सांगतो मला हे खरच वाटेना."

"म्हणजे मी काय चेष्टा करतोय अस वाटल ?"

"तस नाही. परतु सर्वच काही अनपेक्षित होत. आयुष्यात अस काही घडेल अस स्वप्नातसुद्धा वाटल नव्हत."

"अस होत कधी कधी, आता वेळ घालवू नका. कॅशरकडे जाऊन पैसे घ्या. त्याला मी सागून ठेवलय. तिथून थेट एअरलाइन्सच्या कचेरीत जा व तिकीट रिझर्व करा..." साहेबानी मला सर्व सूचना दिल्या. "दिल्लीला जाताय तर दिल्ली पाहून या. लाल किल्ला आणि कुतुबमिनार पाहायला विसरू नका." साहेबांचा हा संदेश घोकीत, बाहेर पडलो व कॅशरसमोर उभा राहिलो.

कॅशरने शंभरच्या सहा नोटा दिल्या; त्या खिशात जपून ठेवल्या. आयुष्यात प्रथमच इतकी मोठी रक्कम एकदम हातात आली होती. (लग्नाच्या वेळी हुंड्याची रक्कम यापेक्षा थोडी मोठी होती परंतु ती परस्पर वडिलांच्या हातात गेली.)

पैसे घेताना बोटाना गुदगुल्या झाल्या. हृदय अभिमानान भरून आल. परंतु हा आनद अल्पकाळच टिकला. कारण एवढी मोठी रक्कम सांभाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीव होताच मनात काळजीन घर केल.

माझ्या दिल्ली-वारीची बातमी एवढ्या वेळात सबंध कचेरीत पसरली होती. कोणी वरवर माझे अभिनदन करू लागले. सल्ला देण्याची स्पर्धा सुरू झाली. कोणी तर ही माझ्या बढतीची नादी असल्यांच सुचविल. चेहरा शक्यतो निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करीत मी सर्व ऐकत होतो.

"जातो आहेस तर मजा करून ये. खिशातले पाचपचवीस रुपये गेले तरी हरकत नाही." देसायान सल्ला दिला.

मी दिल्लीत काय पाहाव, काय खरेदी कराव यांबाबत जाऊन आलेल्यांनी आपले अनुभव सागितले. कीर्तिकरन तर टेबलाच्या ड्रॉवरमधून टूरिस्ट ऑफिसमधून आणलेल रंगीत पॅम्प्लेट दिल, "यात दिल्लीची सर्व माहिती आहे."

"तुम्ही दिल्लीला जाताय म्हणे!" म्हातारा साठे अखेर बोलता झाला.

"होय."

"तुम्हाला कोणी काही सांगो. माझ म्हाताऱ्याच ऐका. तुम्हाला त्या गावची माहिती नाही. उगाच कुठतरी भटकू नका. मजा करायला जाल आणि भलताच प्रसग ओढवून घ्याल. आपण कुटुंबवत्सल माणस ! उल्लुगिरीन वागून चालणार नाही. काम संपताच परत या. आणि विमानात जाण्याची गरज नाही, 'फ्रॉंटियरन किंवा जनता 'न जा फार तर. आपला नेहमीचा तिसरा वर्ग बरा. उगाच उसन अवसान हव कशाला ? ससार नेटका करायचा म्हणजे असे पैसे वाचविले पाहिजेत." साठे यांनी आपला काटकसरी व व्यवहारी दृष्टिकोनातून सल्ला दिला.

सर्वांचे सल्ले ऐकून घेतले. कोणालाही दुखवले नाही आणि तिकीट खरीदण्यासाठी एअर लाइन्सच्या कचेरीत आलो. एवढा लांबचा आयुष्यातला पहिलाच प्रवास. त्यामुळे गोंधळून गेलो होतो. आमचा सर्वात लाबचा प्रवास म्हणजे एस. टी.ने सातारपर्यंत आणि बोटीने रत्नागिरीपर्यंत.

एअर लाइन्सच्या कचेरीत जाण्याचा हा पहिलाच प्रसग. काचेचा दरवाजा लोटून त्या थंडगार कचेरीत शिरलो. परंतु तिकिटाची विंडो किंवा रांगही कोठे दिसेना. आम्हाला आपली बोरीबदरवरील तिसऱ्या वर्गाच्या तिकिटाची विंडो व तीवरील गर्दीची सवय. येथे अमुक स्टेशनाची व तमुक गाडयाची तिकिटे मिळतील या पाटीखेरीज एक 'खिसेकापूंपासून सावध राहा' अशी पाटी लोंबत असते. येथे तसे काहीच दिसेना. वास्तविक त्या पाटीची येथे जास्त गरज. कारण येथे येणाऱ्या लोकांच्या खिशात शेकडयांच्या रकमा असतात. इकडे-तिकडे पाहत असता "चौकशी" अशी सुबक पाटी दिसली. तेथे बसलेल्या सुदर मुलीला भीतभीत विचारले "दिल्लीच तिकीट कुठ मिळेल ?"

तिने मला एकदा आपदमस्तक न्याहाळले. तिने मज भाऊसाहेबांस ओळखले असावे. तिच्या एकदर हावभावावरून तिला माझी कीव आली असावी असे दिसले. तिने समोरच्या लावलचक टेबलाकडे बोट दाखविले. टेबलामागे पांढऱ्या युनिफॉर्ममधील स्मार्ट मंडळी बसली होती. टेबलाअलीकडे स्प्रिंगच्या गुबगुबीत खुर्च्या होत्या. त्यांवर बसून मंडळी विविध ठिकाणांची तिकिटे खरेदी करीत होती.

मनात विचार आला – बोरीबंदर, बॉम्बे सेंट्रल किंवा एस्. टी. च्या सातारा स्टँडवर अशी व्यवस्था कधी होईल !

एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसलो. समोर बसलेल्या तरुणाने स्मित केले. रेल्वे तिकिटाच्या खिडकीवरील कारकून त्रासिक आणि तुच्छतेने आपल्याकडे पाहतो हा नित्याचा अनुभव. त्यामुळे तिकिटे देणारा कारकन सुहास्यवदन पाहून मी आश्चर्यचकितच झालो. त्याने फडर्या इंग्रजीत विचारले "बोला, आपली काय सेवा करू? " सौजन्य सप्ताहातसुद्धा रेल्वे बुकिंग क्लार्क किंवा इतर नोकरवर्ग इतक्या सौजन्याने बोलत नाही.

"मला दिल्लीच तिकिट हवय." मी घाबरत बोललो.

"केव्हाच ?"

"उद्याच."

"कठीण दिसतय."

"परवाच चालेल, परंतु परवा गेलच पाहिजे."

"पाहू या." त्यान फोन उचलला. कोणाशी तरी तो बोलला आणि मला म्हणाला, "परवासुद्धा सर्व फ्लाइटस् फुल आहेत. परतु नाव वेटिंग लिस्टवर ठेवतो. चान्स नं. एक. तुम्ही ओपन तिकिट घ्या. उद्या फोन करा व कन्फर्म करा."

"पण परवा नाही मिळाली जागा तर?"

" अस होणार नाही. कारण तुमचा चान्स नं. एक आहे. नं. एक म्हणजे निश्चित धरावयास हरकत नाही. "

घरी आलो आणि सर्व घटना सौ.स निवेदन केली. सर्व काही अनपेक्षितपणे आणि अकस्मात् घडले होते. विचार करावयास वेळच मिळाला नव्हता. प्रथम सौ. थोडी नाराज झाली कारण या प्रकरणात तिचा काहीच विचार घेतला नव्हता. परंतु 'साहेबांची आज्ञा' असे सांगताच तिची नाराजी थोडी कमी झाली. अर्थात मी एकटा जाऊन दिल्ली पाहणार–तिला नेणार नाही–म्हणून तिची थोडी कुरबूर राहिलीच. परतु मी त्याकडे फारसे लक्ष न देता कपडे शोधून बॅग भरण्याच्या तयारीस लागलो.

विमानाने जावयाचे तेव्हा पत्र्याची बॅग कशी न्यावयाची? लेदरची हवी. निदान त्यापेक्षा स्वस्तातली फायबरची तरी! म्हणून शेजारच्या विसुभाऊंकडे गेलो. गेल्या वर्षी त्याचे लग्न झाले तेव्हा त्याना लेदरसारखीच एक बॅग प्रेझेंट मिळाली होती. त्यांना विमानाने दिल्लीला जाणार असल्याचे सांगून त्यांच्याकडे त्या मौल्यवान वस्तूची मागणी केली.

'आम्ही नाहीतर नाही, आमची बॅग विमानान दिल्लीपर्यंत जाऊन येतेय. तिच्या भाग्याच्या आड कशाला या' असे म्हणत त्यानी बॅग दिली. मीपण त्याच्या या विनोदावर खळखळून हसलो आणि त्याच्या उपकाराबद्दल त्यांचे आभार मानून बॅग घेऊन परतलो.

सौ. बाहेर गेली होती. मी विमानाने जाणार असल्याचे चि. सुधी, सुहास यास कळले होते. ती दोघे दिल्ली, विमान व त्याबाबत अनेक प्रश्न विचारीत होती. मी नेहरूना भेटणार काय? असेहि तिने विचारले. त्याना जुजबी उत्तरे देऊन मी त्याचे शकानिरसन करीत होतो. मी दिल्लीहून त्याच्यासाठी काय आणावे याच्या याद्याही ती दोघे ऐकवीत होती. 'हो, हो!' करीत मी कपडे गोळा केले आणि बॅग भरली. कपडे कपडे ते काय? कारकुनाचे कपडे. एकुलता एक सूट, तो जातानाच घालावयाचा होता. म्हणून दोन पॅन्टस्, दोन शर्टस्, एक धोतर व एक कोट, टॉवेल! ते भरायला किती वेळ लागणार. बॅग केव्हाच भरून झाली.

## 'तार छेडिता तुटली'

तार छेडिता तुटली जीवनाच्या समेवर ।।
बोल बोलता संपले गीत गाता हळुवार ।।
ताल चुकला असाच नकळत सुटे सूर ।।
रंग चढता चढता मैफलीचा गेला नूर ।।
लाल गुलाबी रंगाची सरमिसळ साधली ।।
चित्रे मनीची रेखिता थांबे कुंचला अवेळी ।।
हात थरथरला अन् पाल चुकचुकली ।।
रेखा अपुऱ्या उमटता पापणी ओलावली ।।
आला वसंत बहर आसमंत फुलवेडा ।।
दृष्टि सुखावे परंतु त्यात भीतीचा पगडा ।।
धुंदी चढली क्षणिक उडे ऊर धडधडा ।।
उभा केविलवाणा वृक्ष वठलेला बापुडा ।।

—सौ. राधा हरदास

बऱ्याच वेळाने सौ. आली. तिच्या हातातली पिशवी शिगोशीग भरली होती. मी विचार करू लागलो हा काय प्रकार? शेवटी तिने खुलासा केला, " एवढ्या लांबच्या प्रवासाला जायच तेव्हा बरोबर थोडा चिवडा आणि लाडू असलेले बरे! शिवाय नानूच्या मुलाना खाऊपण होईल. "

या वेळपर्यंत एक महत्त्वाचा मुद्दा माझ्या लक्षातच आला नव्हता. दिल्लीला उत्तरायच कोणाकडे? सौ.च्या धोरणाने तो प्रश्न सोडवला. माझ्या नात्यातले अगर ओळखीचे कोणीच दिल्लीला नाही. सौ.चे दोनचार नातेवाईक दिल्लीला होते. त्यात नानूचा उल्लेख वारवार होई. तो तिचा चुलत आतेभाऊ होता आणि लहानपणापासून तसे त्याचे जाणेयेणे असल्यामुळे मी त्याच्याकडे उतरावयास हरकत नाही असे सौ.चे मत. शिवाय तो स्वभावाने फार मनमिळाऊ. "त्याला फारस बोलायला नको, तुम्हाला नको." माझे व त्याचे जमेल असे सौ. म्हणावयांची. तेव्हा त्याच्याकडे उतरण्याचा बेत निश्चित केला. नानूचा निश्चित पत्ता माहीत नव्हता. तो दुसऱ्या दिवशी मिळविण्याची जबाबदारी सौ.ने पत्करली.

जेवावयास बसलो तो सासूबाई हजर. अशा भलत्याच वेळी त्याना आलेल्या पाहून मनात चरकलोच. पण नंतर खुलासा झाला तो असा की सौ. काही वेळापूर्वी जी गडप झाली होती ती माझ्या या प्रयाणाची बातमी देण्यासाठी आपल्या आईकडे गेली होती आणि चिवडालाडू करण्यासाठी तिने आईला मदतीला बोलाविले होते.

" इतक्या घाईनच का जायला हवय? " सासूबाईंचा उगाच प्रश्न.

" होय, साहेबाचा हुकूम आहे तसा. "–मी.

" इतक्या लांबच्या प्रवासाला जायच तेव्हा ......

यावर माझी प्रश्नार्थक मुद्रा.

" म्हणजे एकटयान ...... "

" ऑफिसच्या कामासाठी जायच तिथ दुसरा कोण आणणार बरोबर? " माझा रोख सवाल.

" विमलला न्याव बरोबर." पूज्य सासूबाई.

" विमानान जायच म्हणजे पैसे फार लागतात. तेवढे..." माझ्या पुढील बोलण्याचा आशय सासूबाईंच्या ध्यानी आला.

" पण मी म्हणते, विमानानच कशाला जायला हव? तसा धोक्याचाच प्रवास तो! "

" ते काही असल तरी वेळेचा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि ठराविक वेळी तिथ हजर होण्यासाठी विमानानच जाण आवश्यक आहे. साहेबानी ... " पुन्हा एकदा साहेबाचे लोणचे लावले. हेतु साहेबावर मात्रा नाही.

" साहेबाच काय जातय सांगायला. आगगाडीन गेला असतात म्हणजे काळजी नव्हती."

यापुढे मीच तोंड बंद केल्यामुळे चर्चा संपली.

सर्व तयारी झाली. कोणाची सूटकेस, तर कोणाचा वुलनचा कोट, कोणाचा स्कार्फ अशा आवश्यक वस्तू पैदा करून राजधानी-प्रयाणाची तयारी केली.

दुसऱ्या दिवशी दुपारी रात्रीच्या विमानावर जागा निश्चित झाल्याचे कळले. विमानकंपनीच्या कचेरीतून रात्री ९–१५ वाजता बस निघणार होती. मी आपला ८–३० वाजताच हजर झालो. उगाच घोटाळा नको आणि गाडी फलाटावर लागण्यापूर्वी निदान एक तास तरी बोरीबंदरवर हजर राहण्याची सवय आहे. ठीक सव्वा नऊ वाजता लाऊडस्पीकरवर घोषणा झाली, " नाइट एअर मेलन जाणाऱ्या प्रवाशानी बसमध्ये जाऊन बसाव. बस विमानतळावर जाण्यासाठी तयार आहे. "

सर्व प्रवासी बसमध्ये बसले व बस सांताक्रूझ विमानतळावर आली. मी इतर प्रवाश्यांबरोबर खाली उतरलो आणि प्रशस्त दालनात फेऱ्या मारू लागलो.

थोडया वेळाने लाऊडस्पीकर गरजला, "श्री. पावटे, कृपया आय्. ए. सी. च्या काऊंटरवर हजर व्हा." दोन मिनिटांनी पुन्हा घोषणा झाली, "श्री. पावटे यांनी आय् ए. सी. च्या काऊंटरवर हजर व्हाव."

अभिमानान छाती फुगली. विमानतळावर जमलेल्या पाच–सातशे लोकांनी आपल नाव ऐकल. केवढा मोठा असामी. लाऊडस्पीकरवर आपल नाव जाहीर व्हाव व पाचसातशे लोकांनी ते ऐकाव ही काय साधी गोष्ट आहे. यापूर्वी एकदा माझ नाव लाऊडस्पीकरवर जाहीर झाल होत. सार्वजनिक गणेशोत्सवात एका गाण्याला मी गेलो होतो तेव्हा रात्री बाराच्या सुमारास लाऊडस्पीकरवर सांगण्यात आल होत. "इथ कोणी पावटे आहेत काय ? त्यांच्या सौभाग्यवती मंडपाबाहेर त्यांची वाट पाहात आहेत." नतर मंडपात एकच हंशा पिकला होता.

कशासाठी बोलावले असेल याचा विचार करीत मी काऊंटरकडे निघालो. मनात विचार आला,'माझ तिकीट रद्द झाल्याच तर सागायला मला बोलावल नसेल ?' या विचाराबरोबर छाती धडधडू लागली, हातापायांना घाम सुटला. काऊंटरवर गेलो आणि भीत भीत विचारल,"माझ नाव पावटे, कशाला पुकारल माझ नाव ?"

त्याने माझ्या हातात प्लास्टिकचा एक रंगीत चौकोनी तुकडा दिला. "तुमचा पास" तो म्हणाला.

मी त्यावरचा मजकूर वाचला. विमानात प्रवेश देण्यासंबंधीचा तो पास होता.

पावणेअकरा वाजले. अकराला विमान सुटणार होत. मला प्रश्न पडला,'मी विमानात जाऊन केव्हा बसायच, माझ विमान कुठ उभ आहे व मी तिथ कस जावयाच ?'

काऊंटरवर कोणी नाही अस पाहून पुन्हा काऊंटरवर गेलो आणि चाचरत विचारल "'नाइट एअरमेल'च विमान कुठून सुटणार आहे ?"

काऊंटरवरच्या इसमान माझ्याकड पाहिल. 'अगदी मामाच दिसतोय' असा त्याच्या दृष्टीचा अर्थ स्पष्ट दिसला. तरीपण त्यान सागितल. तिकड लौंजमध्ये बसा. लाऊडस्पीकरवर घोषणा होईल.

थोडया वेळाने घोषणा झाली, 'दिल्ली, मद्रास व कलकत्ता या ठिकाणी नाइट एअरमेलन जाणाऱ्या प्रवाश्यानी विमानात जाऊन बसाव विमान डाव्या कोपऱ्यात आहे.

विमानतळाच्या भव्य पटांगणात जाण्यासाठी एक दरवाजा होता. त्या दरवाजावर एक दरवान उभा होता. दोनचार मडळी त्या दरवाज्याने आत शिरली. मीपण त्याच्यामागोमाग विमानाकड जाऊ लागलो. अर्थात एकदम पुढ गेलो नाही. कारण काही माहीत नव्हत. परतु फार मागही राहिलो नाही. कारण खिडकीजवळची जागा पकडावयाची होती.

विमानात चढावयाच्या जिन्याजवळ गेलो. हातातला प्लास्टिकचा बिल्ला तेथील माणसाच्या हाती दिला आणि जिना चढू लागलो. जिन्याच्या तोडाशी एक सुदरी माझी वाट पाहात असेल. ती स्मित वदनान माझ स्वागत करील. या विचारान हुरळून धावत जिना चढलो. विमानात प्रवाश्याच्या सुखसोयीकडे लक्ष देण्यासाठी एक सुंदरी असते अस वाचल होत. सिनेमात पाहिलही होत. ही आकाशसुदरी, आमची विमान-यजमानीण (Air Hostess) कशी असेल याच चित्र रेखाटीतच विमानात शिरलो. परंतु विमानाच्या प्रवेशद्वारापाशी कल्पनेतील ती सुदरी नव्हती. तिच्याऐवजी एक घटिंगण तिथ उभा होता.

मनात विचार आला. अद्याप आली नसेल. येईल थोडया वेळान.

आत जाऊन खिडकीजवळच्या एका खुर्चीवर बसलो. माझ्यामागून भराभर उतारू आले आणि विमान भरून गेल. लगेच विमानाचा आवाज सुरू झाला. समोरच्या दरवाज्याच्या बाजूला एक पाटी होती, 'धूम्रपान करू नका !' दुसरी पाटी होती, 'पट्टे बाधा.' माझ्या बाजूला बसलेल्या गृहस्थान खुर्चीच्या बाजूचे पट्टे घेऊन पोटावर बाधले. मीपण त्याच अनुकरण केल. इतक्यात एक धिप्पाड गृहस्थ आमच्या बाजूला येऊन उभा राहिला. त्यान स्मित करून एक बशी पुढ केली. तीत टॉफी होती व प्लॅस्टिकच्या बारीक पिशव्या होत्या. प्लॅस्टिकच्या पिशव्यांत कापूस होता. मला त्या माणसाचा राग आला. आम्हाला टॉफी देऊन तो आमची टिंगल करतोय अस मला वाटल. 'टॉफी द्यायला आम्ही काय पोर आहोत !' असा विचार मनात आला. माझ्या बाजूच्या गृहस्थान त्यातील दोन टॉफ्या उचलल्या व कापूस असलेली पिशवी घेतली. मीपण त्याच अनुकरण केल. त्यान टॉफी तोंडात घातली. मीपण तसच केल. टॉफी तोंडात टाकताना मुलाची आठवण आली. प्लॅस्टिकच्या पिशवीतील कापूस त्यान काढला व त्याचे दोन बोळे करून दोन कानांत घातले. का ते कळल नाही. परंतु, मीही दोन बोळ कानांत घातले.

विमान सुरू झाल. ते अद्याप जमिनीवरच होत. थोडया वेळान विमानाचा आवाज मोठा झाला तेव्हा कानातील बोळयाचा उपयोग समजला. काय ही व्यवस्था ! सौ. नेहमी म्हणते कानात बोळे घातले आहेत काय ? कापसाचा बोळा कानात घालायला दिला जातो आणि तोसुद्धा स्मितवदनान. रेल्वेस्टेशनावर माणसाला जर जखम झाली तर कापसाचा बोळा मिळवण्यासाठी स्टेशनमास्तरच ऑफिस धुंडाळीत हिंडाव लागत आणि ऑफिस मिळाल्यावर कापूस मिळेलच याची खात्री नाही.

विमान मोठा आवाज करीत धावू लागल आणि माझ्या छातीत धडकी भरली. पोटात खळगा झाला आणि डोक्यात विचारांच काहूर माजल. सतत एकच विचार व एकच भीती. हे विमान सुखरूप दिल्लीपर्यंत जाईल काय ? विमान अपघाताच्या वृत्तपत्रात आलेल्या बातम्या डोळयांसमोर नाच लागल्या. मी महिम्नस्तोत्र पुटपुटू लागलो इतक्यात विमान हवेत तरगू लागल्याचा भास झाला. काचेतून खिडकीबाहेर दृष्टी टाकली. विमान हवेत तरंगत असल्याची खात्री पटली. विमान उडताना अगर उतरताना सर्वसाधारणपणे अपघात होतो अस वाचल होत ते आठवल व समाधानाचा सुस्कारा टाकला. आता अपघाताचा एक प्रसंग टळला होता.

अपघाताचा एक प्रसग टळल्यामुळ मनाला थोडी स्वस्थता आली आणि आठवल की विमानात प्रवाश्याच्या सेवेसाठी एक सुंदरी असते. त्या सुदरीची वाट पाहत बसलो. तिच्याकडून काय सेवा करून घ्यावी याचा विचार करू लागलो. सुदर विमानात ती

चुणचुणीत बाई भारी छान वाटत होती. Very beautiful ... .

माझ्या बाजूला बसलेल्या गृहस्थान आपल्या खुर्चीची पाठ आणखी थोडी कलती करून घेतली व तो आराम करू लागला. त्यान काय केल ते मला समजल नाही. त्याला विचारायचा संकोच वाटू लागला. त्याला विचाराव की विचारू नये ?

मघाचा टॉफी देणारा घटिंगण पुरुष पुन्हा आला. त्यान पलीकडच्या बाकावर बसलेल्या गृहस्थाला वर ठेवलेली एक उशी काढून दिली, एक ब्लँकेट दिल व खुर्चीही आराम करून दिली. माग वळून त्यान माझ्याकड पाहिल, स्मित केल. मी हसल्यासारख करून 'प्लीज' म्हटल. त्यान उशी दिली. ब्लँकेट दिल आणि खुर्चीची पाठही तिरकी करून दिली.

विमानातले बरेचसे प्रवासी केव्हाच झोपेच्या अधीन झाले होते. काही बारीक दिवा लावून वाचीत होते. मी झोपण्याचा खूप प्रयत्न केला. पण झोप काही येईना. कारण डोळा लागत आला की एकदम अपघाताची आठवण होई व झोप उडे. न जाणो अपघात झालाच तर, किमान जाग असाव.

नागपुरचा विमानतळ जवळ आला आणि तो घटिंगण ( त्याला पर्सर म्हणतात अस मला नंतर कोणीतरी सागितल ) पुन्हा आला. प्रत्येकाच्या हातात त्यान एक छोटा पावतीसारखा कागद दिला. नागपुरला विमानतळावर उतरल्यावर चहा घेण्यासाठी ( कपनीच्या खर्चाने ) ते कूपन होत.

विमान नागपूर विमानतळावर सुखरूप उतरल. अपघाताच्या दुसऱ्या धोक्यातून निसटल्याच्या आनदात कँटीनमध्ये चहा घेतला. सँडविचीस ( अर्थात व्हेजिटेबल ) खाल्ले व मोठ्या हॉलमध्ये आलो. तिथ माहितीपट चालू होते. ते पाहण्यासाठी आरामखुर्च्या होत्या, सोफासेट होते. परंतु मी असा आरामात बसलो नाही कारण, आरामात बसलो आणि झोप लागली व विमान सुटून गेल तर. म्हणून एका साध्या खुर्चीवर ताटकळत बसलो. एकदा विमान उभी राहतात त्या बाजूला पाहून आलो. एखाद विमान निघून गेलेल नाही ना ?

थोड्या वेळान दिल्लीला जाणाऱ्या विमानाची घोषणा झाली. मी इतरांच्या बरोबर विमानाकड जाऊ लागलो. हेच विमान दिल्लीला जात ना अशी शंकाही मनात आली पण कोणाला विचाराव तर बावळटपणा पदरात यायचा म्हणून काहीच बोललो नाही.

विमानाच्या दारात जातो तर एक गृहस्थ हातात कागद घेऊन उभा. त्यावर नावे टाइप केलेली होती.

"नाव प्लीज ?" त्याने विचारले

"पावटे"

त्याने हातातल्या कागदावर पाहिले. "येस, मिस्टर ए. एस. पावटे, दिल्ली."

काय ही व्यवस्था. नाव टाइप करून आधी हजर !

मी रिकाम्या जागेवर जाऊन बसलो. विमान सुरू झाले. पुन्हा पट्टे बाधले. विमान हवेत तरगू लागले.

इतका वेळ लक्षात न आलेली गोष्ट माझ्या आता लक्षात आली. सीटच्या मागच्या बाजूला एक पिशवी होती तिच्यात एक डबा सापडला. सिगरेट टिनसारखा तो डबा होता. मला वाटल आत सिगरेट आहे. उघडून पाहिल तर आत काहीच नाही. डब्यावर एअरलाइन्सच बोधचिन्ह होत आणि त्याखाली लिहिल होत. "यूज मी इन केस ऑफ एअर सिकनेस."

खूप विचार केला पण याचा अर्थ कळला नाही. मुबईला परतल्यावर एका दोस्ताला विचारल. त्यान सागितल विमान लागल (आम्हाला बोट लागते हे माहीत होत. विमानही लागत हे माहीत नव्हत) तर त्या डब्याचा उपयोग करायचा. ज्या गोष्टीचा उपयोग करण्याचा चान्स मिळाला नाही अशी विमानातली ही एकच गोष्ट !

पहाटे साडेपाच वाजता दिल्ली विमानतळावर विमान उतरल. अपघाताच्या चार सकटातून बचावून मुबईचा कारकून अच्युत शंकर पावटे सुखरूप दिल्लीत पोहोचला.

तेव्हापासून एखाद विमान कुठ कोसळल अशी बातमी वाचली की माझ्या पोटात गोळा येतो आणि दिवसभर मी अस्वस्थ असतो. मग हळूच ती हवाईसुदरी आठवते. .........आणि हा अच्युत शकर पावटे मग हळूहळू शात होतो.

• • •

# हुशार आरोपी

एका कोंबडयांच्या खुराडयातून कोंबडया चोरताना आरोपीला पकडले होते. त्याचा खटला कोर्टात सुरू झाला. न्यायाधीशानी आरोपीला विचारले "तुला खटला चालवण्यासाठी कोणी वकील द्यायचा आहे काय ?

"नाही. माझा खटला मीच चालविणार आहे." अरोपीने सांगितले.

ज्या पोलिसाने आरोपीस पकडले होते त्याचा पुरावा आला.

"तुला काही विचारायच आहे काय ?" न्यायाधीशांनी आरोपीस विचारले,

"होय." आरोपी म्हणाला.

"तुम्ही मला कोंबडयाच्या खुराडयात जाताना पाहिल होत काय ?" आरोपीने पोलिसाला विचारले.

"होय." पोलिसाने सागितले.

"तुम्ही मला खुराडयातून बाहेर येताना पाहिल काय ?" आरोपीने पोलिसास विचारले.

"नाही" पोलीस म्हणाला.

आरोपीने न्यायाधीशाना सागितले "माझा बचाव संपला. मला जास्त काही विचारायच नाही. कारण मी अजून त्या कोंबडयांच्या खुराडयातच आहे.

अनुवादक

वसंत माजगावकर

# समीक्षा

## एक अभिमानास्पद कामगिरी

स्त्रीजीवनाची सुरुवात कन्येच्या नात्याने झाली तरी तिच्या आयुष्याला अर्थ येतो, रंग चढतो तो, सासरी गेल्यावर. पुरुषप्रधान कुटुंबसंस्थेतून. म्हणूनच कन्येला गौण स्थान आले. 'परक्याचे धन' या दृष्टिकोनातून तिच्याकडे आईबाप पाहत असतात. याचा दुसरा परिणाम असा होतो की एकदा सासरी गेल्यावर तिच्यावर आपली सत्ता नाही, या भावनेतून कौमार्यावस्थेपर्यंतचा मुलीचा काळ सुखात जावा, अशी सर्वसाधारण संपन्न घरातील मातापित्यांची धडपड असते. घरात तिला थोडे झुकते मापही मिळते. माणूस वयाच्या १७–१८ वर्षांपर्यंत जे जे सुखदुःख अनुभवतो तेच सुखदुःख त्याला जन्मभर आठवते असा मानसशास्त्रीय दृष्टिकोनही आहे.

म्हणूनच जन्मभर वडिलांच्याच घराशी संबंधित न राहूनही स्त्रीला आपल्या माहेरासंबंधी आजन्म विलक्षण ओढ असते. माहेरची एखादी आठवण तिच्या डोळ्यांत गंगायमुना आणते. माहेरी जाण्यासाठी तिचे मन उतावीळ असतानाच सासरचे पाश हळहळू तिचा कबजा करीत असतात.

अशा असंख्य अर्धोन्मीलित स्त्रीजीवनांनी, सासरमाहेरविषयक ओवीगीतांची आणि लोकगीतांची अमाप जडणघडण केली. ओवी ही मुळात अती गोड आणि त्यातून ती जर माहेरविषयक असली तर स्त्रीच्या काळजालाच हात घालते. 'ओवी ज्ञानेशाची' हे खरे, परंतु 'ओवी माहेराची' ही स्त्रियांना अधिक जवळची-अधिक आवडणारी !

डॉ. सरोजिनी बाबर यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी स्त्रीगीतांचे लहानसे पुस्तक तयार केले होते. खेडोपाडी घराघरातून पसरलेल्या स्त्रियांच्या तोंडांतील लोकगीतांचा त्यात समावेश होता. महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या अध्यक्ष म्हणून केवळ नव्हे तर त्यांना लोकगीतांविषयी विलक्षण आत्मीयता असल्यामुळे, लोकसाहित्यमालेच्या सासर-माहेर-विषयक या ग्रंथाचे संपादन त्यांच्याकडे ओघानेच आले असले पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाचे अंतरंग अत्यंत विलोभनीय आहेच परंतु त्याची श्रमपूर्वक केलेली संपादणी ही डॉ. सरोजिनी बाबर यांच्या रसिकतेची खात्री पटवते. संपादनाचे जिकिरीचे काम एकाच व्यक्तीने स्वीकारल्यामुळे कदाचित असेल परंतु काही दोषही या ग्रंथात शिरले आहेत; व त्यांचा उल्लेख अखेर मी करणार आहे. परंतु हे दोष मान्य करूनही डॉ. बाबर यांनी या पुस्तकाची संपादिका या नात्याने अभिमानास्पद कामगिरी केलेली आहे हे प्रथम नमूद करणे भाग आहे.

**जा माझ्या माहेरा**

**संपादिका–डॉ. सरोजिनी बाबर**

**महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला**

**मूल्य ३–५०**

पुस्तकाच्या पहिल्या भागात सासर-माहेरांच्या जीवनाचे लागेबांधे उकलणारे पंधरा निबंध दिलेले आहेत. श्री. पोहनेरकर, सौ. आनंदीबाई शिर्के, डॉ. विमल चोरघडे, डॉ. सरोजिनी बाबर आदी पंधरा लेखक-लेखिकांनी उपलब्ध ओव्या आणि लोकगीतांच्या आधारे हे गद्य लिखाण गुंफलेले असून ते मनोज्ञ झालेले आहे. त्यात भावजयीच्या तोऱ्याची खीळ आहे–

'बंधुजी घेतो चोळी भावज गुजरी देईना दोरा
चांदाच्या उजेडात काय चांदनी तुझा तोरा.
भाऊ ग आपुला भावजय ग पराई
अग माझे सये बाई मनधरनी करावी'

सुनेची शालीनता आहे–

'सासूसासरा माझ्या देव्हाऱ्यावरल सोन
त्यांच्या उजेडात मी लोटते चारी कोन.'

नवऱ्याच्या रागाची खुशामत आहे–

'भर्ताराचा राग जसा पेटारीचा नाग
अग माझे मंगूबाई त्याच्या मरजीन वाग.'

माहेराचे वैभव आहे–

'काय सांगू सई माझ्या माहेरच्या रीती
तांब्याच्या पराती–भावजया पाय धूती–'

भाऊ असल्याचा आनंद आहे–

'वहिणीला भाऊ एकतरी तो असावा
चोळीचा एक खण एका रातीचा विसावा.'

रस्त्यातून चालावे कसे याची जाण आहे–

'जाते मी उभ्या गल्ली बाजू देईना जोडव
चुडयानला माझ्या लावीना आडव'

आता जोडवी जात चालली. 'उभ्या मी गल्ली जाते दंडभुजा झाकुइनी' हा गावढळपणा ठरू लागला आहे. परंतु मादाम ब्लाऊझच्या युगातही शेजार कुणाला चुकलेला नाही. हा शेजार कसा असतो त्याची बानगी पाहा–

'शिजीच्या घराला सहज मी बसायला,
शिजी मागाऱ्या बोलती–आली असल उसन्याला !'

म्हणून उसने मागणे काही सुटत नाही. उसने जे आणता येते ते परतही करता येते. परंतु जे उसने या भावनेत कोंडता येतच नाही त्या आईच्या प्रेमाची वाट काय ? माहेराची आठवण या उसन्यापासन्यापासूनही होते–

'शिजीच उसईन – बाई मी फिडीन भाजीपाल्या
बयाच उसईन – मला फिटना काशी गेल्या –'

माहेर गच्च श्रीमंत आहे; भाऊ तालेवार आहेत.

'जन लोक पूसती । भाऊ हैत किती
हजाराचे चार मोती । नथेला शोभा देती.'

तरी सासुरवास सगळयानाच चुकवता येत नाही. सासूला वाटते मी मुलाच्या खस्ता खाल्ल्या. त्याच्यावर माझा हक्क आहे. सुनेला वाटते नवऱ्यावर खरा हक्क बायकोचाच – हा झगडा सनातन आहे. त्याची वळणेवाकणे बदलली तरी मूळ स्वरूप बदलण्याची शक्यता नाही. त्यामुळे सासुरवासाची वर्णने या गीतातून कधी नर्म तर कधी अतिरिक्त आहेत –

सासूचा सासरवास । नन्देचे टालेटोले
इचे काकन ढिले झाले ।।
सासूचा सासरवास । शितासारकीला व्हता
आपुली काय कथा ?
सासूचा सासरवास । मन सारख विटल
वाऱ्याच्या झटक्यान, पान केळीच फाटल ।।

– पान केळीच फाटल – असे या सासुरवासाचे अटळ स्वरूप आहे. सीतेसारख्या साध्वीला जो चुकला नाही तिथे आपली काय कथा ? अशी शरणागती आहे. अशी परिस्थिती असली की माहेरची ओढ शतपटीने वाढू लागते –

झुनझुन पाखरा । जा माझ्या माहेरा –
माझ्या का मायेला । सागशील काय
पोरिले सासुरवास । खाल्ली तिन हाय
मावाले पाठवून । मले घेवून जाय.

नवी नवरी असते तोपर्यंत हा मार्ग सुचतो. माहेरी जावे, आईला कहाणी सागावी, तेवढेच सुख लाभेल. परंतु अनुभव तिला शिकवीत राहतो –

जवर मायबाप तवर माहेराची गोडी.
कोणाचे भाऊ भाचे दोन्ही आधारत्या मेढी ।।
बोलतो भाऊ बहिणीला वाढ दही
बोलती भावजय रात्री विरजल नाही. ।।

अशा वेळी खंत असह्य होते. उरातला कढ डोळयांत उसळतो. ती सांगते –

चोळी बांगडीची नाही मजला असोशी
पाठीचा बंधू माझा तू सुखी मी संतोषी.

स्त्रीजीवनाला शाप मिळतात ते बहुधा स्त्रियाकडूनच, म्हणूनच ही जीवघेणी ओढाताण होते. भावजय हीदेखील आपल्या माहेराकरिता झुरतच असते. परंतु नणदेच सुख तिला सांभाळता येत नाही. आजची सासू ही पूर्वीची सून असते परंतु पूर्वीची दुःख तिला आवरू शकत नाहीत. म्हणूनच या सर्व लोककाव्यातून सासऱ्याचा उल्लेख येतो तो फक्त आदराचा –

सासऱ्याला सून आवडली मनातून.
तोडयाखाली पैंजण हळू वापर जिन्यातून ।।
पहाटे उठूनी हाती दावे वासराचे
दैव तुझ्या सासऱ्याचे ।।

सासुरवास हळूहळू पचनी पडतो. मनाची समजूत होते –

सासुरवाशिणीची गोष्ट । सांगावी धीरधार ।
जशी आकाशी फिरे घार । तिला कशाचा आधार ।।

तिला आधार असतो नवऱ्याचा. सुख असते न सांगता येण्यासारखे.

'जीव माझा शिणला - उसे तुमच्या माडीवर.
तावडया मंदिलाची छाया पडू द्या तोंडावर.'

विवाहित स्त्रीचा सारा मानसन्मान पतीवर अवलबून असतो. पतीकडून लाथाडल्या गेलेल्या स्त्रिया असंख्य आहेत. परतु त्याच्या दुःखाचे चित्रण करणारी लोकगीते नाहीत. सौ. सविता जाजोदिया यानी अभ्यासपूर्वक लिहिलेल्या – मराठी व अन्यप्रांतीय लोकगीतांवरील आपल्या लिखाणात – अन्यप्रांतीय लोकगीतांतही अशीच स्थिती असल्याची तक्रार केली आहे. याला कारण त्यांनी असे दिले आहे –

'माहेरच्या व्यक्तीशी स्त्रीचे रक्ताचे नाते असते. त्यामुळे त्यांनी काही केले तरी स्त्री ते पचवून टाकते.' परित्यक्ता स्त्रीला माहेरी उपेक्षाच पदरी येते. परंतु तेही दुःख ती पचवते. – या म्हणण्यात थोडाफार तथ्यांश आहे. परंतु लोकगीतातून या दुःखाचे चित्रण नाही याला कारणे अन्य आहेत.

(१) परित्यक्ता स्त्रीची दुःखे ही काव्यविषयाला जवळची नसून नाटयविषयाला त्यांची अधिक जवळीक आहे.

(२) लोकगीते, ओव्या, उखाणे आदी लग्नसमारंभासारख्या किंवा सणासुदीसारख्या आनंदाच्या प्रसंगी म्हटली जाणारी गीतेच प्रमुख्याने असल्यामुळे त्यात स्त्रीवर कोसळणाऱ्या निबर दुःखाचे चित्रण अप्रस्तुत वाटेल.

सौ. जाजोदिया यांनी असेही एक विधान केले आहे की – 'काव्य नेहमी समाजातील वरच्या थराच्या लोकांबद्दल असते.' मराठीतील लोकसाहित्याचा विचार करता हे विधान तितकेसे बरोबर नाही. आदिवासीचे लोकसाहित्य या ग्रंथात समाविष्ट नाही याचे दुःख तर डॉ. सरोजिनी बाबर यानी प्रस्तावनेतच नमूद केले आहे. म्हणजे सासरमाहेरविषयक, विवाहविषयक गीतरचना आदिवासीपासून तो ब्राह्मण वर्गापर्यंत सर्व थरात विपुल आढळते. लोकसाहित्यात जमा झालेल्या रचनेत काव्य तर भरपूर असते. फक्त 'महाकाव्या' बाबतच त्यांचे हे विधान असल्यास – पुढील आवृत्तीत तशी सुधारणा आवश्यक आहे.

पहिल्या भागाचा वरील परामर्ष घेतल्यावर मुख्य दोष जाणवतो तो नमूद करतो. सौ. जाजोदिया व डॉ. बाबर याचे लेखन सोडता इतर सर्व तेरा निबधांची रचना एकाच घाटणीची आहे. बहुधा सर्वांना लोकगीतांच्या आधाराने सासर–माहेरविषयकच लिखाण करावयास सागितल्यामुळे असे घडले असावे. त्यामुळे तीच तीच गीते, त्याच त्याच ओव्या पुनःपुनः वाचनात येतात. संग्राहक प्रा. आनंद यादव यांच्या नावे जमा केलेले पृ. ४०४ वरील 'कारल्याच बी पेर ग सुने' हे गीत त्यापूर्वी दोनतीनदा या निबंधातून भेटलेले असते. हाच प्रकार इतरही बऱ्याच ओव्याच्या बाबतीत झाला आहे. थोडक्यात लेखांचे स्वरूप एकाच कवितेचे अनेकांनी केलेले रसग्रहण असे झाल्यामुळे या विभागात मोठा दोष निर्माण झाला आहे. अपवाद वर सांगितले आहेतच.

सासरमाहेरच्या अनुषंगाने स्त्रीजीवनाचे जे इतर असंख्य पैलू काव्यविषयक झाले आहेत त्याचे समग्र दर्शन ओवीगीते – लोकगीते या दुसऱ्या भागात घडते. संपादकांनी सुरवातीला सूचित केल्याप्रमाणे 'या ओव्या वाचताना मनाला आल्हाद वाटतो व काव्यानंदात

मन रमून जाते.' असंख्य स्त्रियांनी वेचलेले अनामिकाचे हे वाङ्मय-धन इथे एकत्र केलेले आहे. ४७ मायभगिनीनी या भागासाठी गीते पाठवली आहेत. त्यांतले बारकावे कसे आहेत पाहा —

नवऱ्याचा आब कसा राखावा याची ओवी आहे —

' फाटला पालव बाई । निऱ्यात झाकावा ।।'

ज्या गावात आपले प्रेमाचे माणूस असते त्या गावावरच माणूस प्रेम करतो. कसे ते पाहा —

' ज्या गावात आईबाप, त्या गावाच मला याड
सयानू किती सांगू तिथे गारव्याच झाड ।। '

परंतु मुलीला माहेरी पाठवा असे बाप हक्काने थोडाच म्हणू शकतो —

' अवारीचा हत्ती भरल्या पेठेत गेला रिता
लेकीच्या बापाला धाडा म्हणाया नाही सत्ता ।

चांगला भाऊ कसा असतो —

पाटाच पाणी सरळ सापावाणी
माझा तो बंधुराजा इमानी बापावाणी.

सासरची माणसे मनसबदाराकडे ऊठबशीला असली तर अभिमान केवढा—!

गावोगावचे पाटील कोरेगावच्या बाजारी
चतुर बंधुजीची खुर्ची मनसुबाशेजारी.

सासरी घरात किती का बद्द नाणी असोत रुपया मात्र बंदा असावा—

पाण्याच्या जाळीमंदी मगरमाशाचा बंगला
लेकीच्या जन्माला धनी असावा चागला ।।

कारण—

जोवर आईबाप लेकी तवर तुझी उडी
झाली पुनव पाठमोरी मग चादाला लागे घडी ।।

परंतु जावयाच्या जातीवर फारसा विश्वास नसतो. ठेवूही नये.

जावई सोयरा — जसा चिंचचा आकडा
सदा बोलतो वाकडा— ।।
जावयाची जात — जशी हुलग्याची पेरणी
लेक देऊनिया याची उगीर बोलणी ।।
परव्याला पाहूनचार, जावयाला दूधभात
लक्ष केल दान शिवी देतो गोतात ।।

सगळे अनुभव कसे मोजूनमापून टिपलेले आहेत. बायको किती चांगली मिळाली तरी पुरुषाची जात. त्याला उपदेश करण्याचाही प्रयत्न आहे—

घरातली अस्तुरी — तलवारीच पान
परनारीसाठी नको घेऊ आडरान ।।
घरची अस्तुरी — जशी सापाच वेटोळ
परनारीसाठी केल — घराच वाटोळ ।।

पोटी बाळ जन्मला. त्याच रूपडच उफाडयाच ! घष्टपुष्ट ! मग आई सांगते—

माझ्या पोटीचा, नाही शोमत माझा मला
सांगते बाळा तुला, आई म्हण मावशीला ।।

साहजिकच आहे. आत्ता आत्ता तर आईच रूप अस होत—

नेसली चंद्रकळा तुझी बारीक कंबर
निरी पडली शंभर ।

सोमवारी न्हाऊ नये, उभ्याने कुंकू लावू नये, अशा कितीतरी बायकी समजुतीचा उल्लेख या गीतातून आहे.

आळंदीच्या वाटेला पिंपरी — उगाच नाही.—

आळंदीच्या वाटे पिंपरी लावली ।
वारकऱ्याला सावली ।।

अशा एक ना दोन हजार गोष्टी या स्त्रीगीतांच्या वेलीना लगडलेल्या आहेत.

माहेरच्या या विलक्षण ओढीमुळेच विवाहित स्त्रीला म्हणूनच जर विचारले की ' जग यात्रेला निघाल आहे तू येतेस का ? तर ती सांगते—जग जातया यात्रेला ! आपण जाऊया माहेराला ! ! प्रत्यक्ष माहेर ज्याच्या नशिबात असेल त्यांनी ते अनंतकाळ उपभोगावे. परंतु या स्त्रीगीताचा सहवास त्यांना सहज जवळ ठेवता येण्यासारखा आहे. प्रत्येक मराठी घरात हे पुस्तक असले पाहिजे. ओवीगीतांचा व लोकगीतांचा हा भाग अतीव समृद्ध आहे.

या अनामिक ओवीगीतात सौ. शशिकला देशपांडे यानी ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' हे कृ. न. निकुंबाचेच गीत समाविष्ट कसे केले ? हे गीत त्यांच्या ' उज्वला ' या काव्यसंग्रहात आहे व तेथून ते घ्यावयास हरकत नव्हती. परंतु अनामिक गीतात ते बसवता येणार नाही.

तिसऱ्या भागात उखाणे, म्हणी, रागोळ्या आदी स्त्रीजीवनाशी निगडित अशा गोष्टींची रेलचेल आहे. उखाण्यांतून पेरलेले विनोद—पुरुषाच्या कानावर आडून ऐकून पडले तर पडतात. परंतु येथे ते सर्व त्याना एकत्र वाचता येतील. कदाचित पुरुषवाचकांना हाच भाग अती आवडेल.

केवळ तीन रुपये पन्नास न. पै. एवढ्या अल्प किंमतीत, ५६० पृष्ठांच्या ऐवजाचे हे एकत्र केलेले विखुरलेले धन, वाचकाना उपलब्ध करून महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती व डॉ. सरोजिनी बाबर यानी मोठीच कामगिरी बजावली आहे यात शंका नाही. प्रत्येक मराठी कुटुंबाने या श्रमाचे चीज करावे व या ग्रंथाचे घरात अगत्यपूर्वक जतन करावे.

रा. म. शास्त्री


# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यांपासून सावध राहावे.

वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन,
मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

# शहरी जीवनाचे उत्कट आणि वास्तव दर्शन ....

मराठी ललित वाङमयाचा इतिहास पाहिला तर असे दिसते की त्याचे बाळसे नुकतेच संपून त्याला किशोरावस्था प्राप्त झाली आहे. परंतु त्याची प्रकृती पाहिली तर कुठे त्याला अकाली प्रौढत्व आल्यासारखे दिसेल तर कुठे त्याने नुकत्याच अल्लड तारुण्यात प्रवेश केला आहे असे दिसून येईल. थोडे बारकाईने पाहिल्यास या अल्लड तारुण्यातले अनेक पाठभेदही दिसून येतील. निरनिराळ्या अवस्थेतील जीवनचित्रे रंगविताना कलावंताला जीवन संशोधनाबरोबरच जीवन-दर्शनातील कलात्मक वास्तवताही सांभाळावी लागते. मात्र आजवर प्रकाशित झालेल्या ललित साहित्याकडे पाहताना असे दिसून येते की ही कलात्मक वास्तवता क्वचितच सांभाळलेली दिसते. फार तर असे म्हणता येईल की याला अपवाद काही थोड्याच पण निर्दोष कलाकृती दाखविता येतील !

असे विधान वाचताना आश्चर्य वाटण्याचा फार संभव आहे. परंतु त्याचे अधिक स्पष्टीकरण केल्यास हे समजण्यास मदत होईल असे वाटते.

मराठीतील अलीकडे काही गाजलेल्या कादंबऱ्या पाहिल्यावर त्यांच्या मोठेपणाबरोबरच त्यातील मोठाले दोषदेखील लक्षात आल्यावाचून राहत नाहीत. गेल्या दहा वर्षांत कादंबरीकार म्हणून ज्यांनी कीर्ती मिळविली त्या श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्याच उदाहरणादाखल घेतल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल. तसेच त्यांचेच समकालीन गो. नी. दाडेकर यांच्या कादंबऱ्यांचा उपयोग यासाठी करता येणार आहे.

उर्दू भाषेत 'लैला मजनू' हे प्रेमकाव्य आज कित्येक शतकांपासून उर्दू भाषेतील एक श्रेष्ठ कलाकृती म्हणून समजण्यात आले आहे. ते एक काव्यनाट्य आहे. पाचसात वर्षांमागे हिंदीत 'लैला मजनू' हा चित्रपट याच कथानकावरून घेतलेला अनेकांच्या पाहण्यात आला असेल.

या कथानकात काय आहे असे विचारले तर सांगणे फारसे अवघड मुळीच नाही. प्रियकर-प्रेयसी, त्यांच्या मीलनाच्या मार्गात येणारी संकटे आणि शेवटी मृत्यू !

या व्यतिरिक्त त्या कथानकात श्रेष्ठ काय आहे असे विचारले तर मात्र सांगणाऱ्याची पंचाईत होऊन बसेल !

---

**शहरचे दिवे**

वि. ग. कानिटकर,
मनोहर ग्रंथमाला, पुणे
रुपये चार

कारण यात श्रेष्ठ काहीच नाही ! त्या प्रेमाचा आविष्कार ज्या पद्धतीने केला आहे त्या पद्धतीला पोरकटपणाव्यतिरिक्त इतर काहीच विशेषण देता येणार नाही !

वर सांगितलेली अवास्तव उत्कटता आणि कृत्रिम नाट्यनिर्मितीचा अनावर मोह यामुळे डागाळलेल्या मराठीतील काही श्रेष्ठ कलाकारांचा उल्लेख वर केला.

### भावनाविवशतेचा दोष

तसे पाहिले तर विसाव्या शतकातील मराठी ललित साहित्याची प्रकृतीच कलात्मकतेपेक्षा भावनाविवशतेकडेच अधिक वळलेली दिसून येते. मराठीचे आद्य कादंबरीकार हरि नारायण आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यामध्ये गुणाबरोबरच जे काही दोष आहेत त्यात भावनाविवशता हा मोठाच दोष आहे हे नाकबूल करता येणार नाही. इतकेच नव्हे तर भारतातील श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून ज्या शरद्‌बाबूंचा आदर्श पुढे ठेवला जातो त्यातही हा भावनाविवशतेचा दोष प्रामुख्याने आढळतोच. परंतु त्यांना मानवी जीवनाची आणि कलात्मक संयमाची जी विलक्षण समज होती तीपुढे त्यांच्यातला हा दोष टीकाकार आणि वाचक सहज नजरेआड करू शकतात.

याला अपवाद आपल्याकडे दोनच व्यक्ती दिसतात. त्या म्हणजे श्रीधर व्यंकटेश केतकर आणि वामन मल्हार जोशी या होत. त्यांच्या लेखनात ही भावनाविवशता मुळीच सापडणार नाही. विलक्षण तटस्थता, अलिप्तता हा त्यांच्या लेखनाचा स्थायिभाव चटकन् लक्षात येतो. परंतु त्यांचेही कादंबरीलेखन यशस्वी झालेले दिसत नाही. (वा. म. जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' आणि 'आश्रमहरिणी' या दोन कादंबऱ्या सोडून) परंतु त्यांची कारणे वेगळी आहेत आणि त्यांचा विचारही येथे प्रस्तुत नाही.

तसे पाहिले तर मराठी कादंबरीचा इतिहास फार अलीकडचा आहे. त्यामुळे जे काही बऱ्यापैकी लेखन झालेले आहे ते अविपुलतेच्या एका कारणामुळे त्यांच्यातील दोषांसकट वाचले गेले आहे आणि नावाजले गेले आहे. परंतु मराठी भाषेव्यतिरिक्त शरद्‌बाबू हा एकच असा कादंबरीकार आहे की त्यांच्या कादंबऱ्या पुनःपुन्हा वाचल्या जातात, त्यांतील पात्रे आजही जिवंत आणि रसीली वाटतात. जीवनाचा खोल अर्थ आपल्या सामर्थ्याने शरद्‌बाबूंनी तिथे साठवून ठेवलेला आहे याची साक्ष पटते.

परंतु मराठी भाषेला असा कादंबरीकार अजून मिळावयाचा आहे. समाधानाची गोष्ट अशी की, मध्यंतरीच्या काळात काही वर्षे कादंबरीलेखन जवळजवळ बंदच पडलेले होते ते गेल्या काही वर्षांत जोमाने सुरू झालेले दिसते आणि मर्ढेकरांची 'तांबडी माती', शरच्चंद्र मुक्तिबोध यांची 'क्षिप्रा', गंगाधर गाडगिळांची 'लिलीचे फूल', दाडेकरांची 'कोणा एकाची भ्रमण गाथा', पेंडशांची 'हद्‌पार', मंगेश पदकींची 'काशंभट', वसंत कानेटकरांची 'घर', ज्ञानेश्वर नाडकर्णी यांची 'कोंडी', ए. वि. जोशी यांची 'रानफूल' या कादंबऱ्या ज्यांनी वाचल्या असतील त्यांना मराठी कादंबरीच्या यशाचा पुढील टप्पा प्रतीत झाला असणार.

### कानिटकरांचा वेगळा प्रयोग

अशाच परवाच वाचनात आलेल्या एका नवीन कादंबरीकडे माझे लक्ष चटकन वेधले. वि. ग. कानिटकरांची 'शहरचे दिवे', हे त्या

कादंबरीचे नाव. कनिटकरांची ही दुसरीच कादंबरी. पहिली 'खोल घावे पाणी' प्रसिद्ध झाली. निवेदनशैलीचा एक वेगळा प्रयोग आणि कथाविषयातील नावीन्य या दोन गोष्टींमुळे वाचनीय झालेली होती. परंतु त्यांची 'शहरचे दिवे' ही अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण वाटते. तिची कथावस्तूच विशेष आकर्षक वाटते. विशेषत: जीवनाचा विशिष्ट आलेख साचेबंद चौकटीत बसविण्याचा सांकेतिक खटाटोप इथे केलेला दिसत नाही. 'शहरचे दिवे' वाचायला घेतली की दादरच्या एका बोळात वाचक जातो. तिथे त्याला 'मिर्झा मॅन्शन' ही दुमजली इमारत दिसते आणि त्या इमारतीत दयानंद नाडकर्णी नावाच्या एका गृहस्थाने अजंठा केमिकल वर्क्स नांवाची एक लॅबोरेटरी उघडली असल्याचे त्याला कळते.

मग हळूहळू संथपणे परंतु तितक्याच संयतपणे त्या ऑफिसमध्ये कामे करणाऱ्या व्यक्ती मनाच्या डोळ्यांपुढे येऊ लागतात. काशीबाई झाडूवालीपासून वावटळीप्रमाणे येऊन लॅबोरेटरीचाच कब्जा घेणाऱ्या राजकुमार त्रिपाठीपर्यंत साऱ्या व्यक्ती, त्यांचे आपसांतील (ऑफिशियल !) संबंध आणि त्या संबंधांच्या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीच्या घराचाही आवश्यकतेनुसार होणारा परिचय ! कानिटकर हे सारे इतक्या विलक्षण आत्मविश्वासाने आणि सुजाणपणाने रेखटतात की क्षणभर हे सत्य आहे का काल्पनिक याचा संभ्रम पडावा ! त्यातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे रसायन, त्यांच्या इच्छा-आकांक्षा आणि असहाय्यता यांचे आलेख ते इतक्या समर्थपणे मांडून जातात की प्रत्येकाच्या हृदयाची स्पंदने आपल्याला ऐकू यावीत.

कुठल्याही ऑफिसातून दिसणारी लेडी टायपिस्ट परंतु तिच्या स्वत:च्या व्यक्तित्वाने ओळखली जाणारी मालती पडविद्री, पापभीरू काशीकर, छाकटा परंतु जीवनाचा पोच नसलेला दीक्षित, कामावरोवरच ऑफिसातल्या पोरींवर लाईन टाकणारा दिवेकर, आपली फर्म तगणार का बुडणार या दोन अर्धवर्तुळांभोवती अस्थिर लंबकाप्रमाणे फिरणारा नाडकर्णी ! या साऱ्या व्यक्ती आपल्याला प्रथम एकएकट्या भेटतात. नंतर ज्या एका व्यवहाराच्या धाग्याने ती माणसे एकमेकांना बांधली गेलेली असतात त्या त्या भावधाग्यांची ओळख कानिटकर हळूहळू करून देतात आणि कादंबरी पुढेपुढे सरकत जाते. आपण वाचीत जातो आणि पुढे असे वाटू लागते की कानिटकर हे काही सांगत नसून जणू प्रत्येक व्यक्ती आपल्याला भेटते आहे आणि त्या त्या व्यक्तींबरोबरच आपण प्रवास करीत आहोत. एवढी अलिप्तता मराठी कादंबरीत क्वचितच प्रत्ययास येते.

या कादंबरीत जीवनातील निरनिराळे पैलू पाहावयास मिळतात. तिथे प्रेम आहे, प्रेमभंग आहे, मुलीच्या लग्नाचा प्रश्न आहे, काळ्या बाजारावर पोसलेली मनोवृत्ती आहे. तारुण्यातील स्वप्नाळूपणा आहे, भावनेच्या आहारी गेल्यामुळे झालेली फसवणूक आहे आणि सिनेमा सृष्टीत वावरणारे कमला त्रिपाठीचे आंधळे तारुण्य आहे आणि त्याचा भीषण शेवटही आहे. तिथे पाषाणहृदयी भावाला वहिणीच्या अपघाती मृत्यूने होणारे अतीव दु:ख आहे; भावनांची उत्कटता आहे परंतु असे असूनही निवेदनात भावनाविवशता कुठेही दिसत नाही. हे या कथेचे मोठे यश आहे.

परंतु दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट मला वाटते ती म्हणजे या कादंबरीला कथानक नाही. तिला नायकनायिका नाहीत. तिला नायक असलाच तर तो आहे मुंबई शहर. चित्रण आहे ते मुंबईच्या अस्थिर जीवनाचा प्रत्यय आणून देणारे.

'अजंठा केमिकल वर्क्स' चे ऑफिस हे केवळ कादंबरीची सुरुवात होण्याला निमित्त आहे आणि कमला त्रिपाठी या स्वप्नाळू, दिशाहीन मुलीच्या मृत्यूने जरी कथानकाचा शेवट केलेला असला तरी बकाल मुंबईतील प्रत्येक माणसाला आपल्या जीवनाच्या शेवटाबद्दल असेच काही वाटत तर नसेल ना ? असा मन अस्वस्थ करणारा विचार मात्र कादंबरी वाचून संपविली तरी मनात रेंगाळत राहतो.

**वि. शं. पारगांवकर**

# जाळे बांधियेले उंच जागी



**देवकी**

मधु मंगेश कर्णिक

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

चार रुपये

**दे**वकी ही मधु मंगेश कर्णिक यांची पहिलीच कादंबरी.

कादंबरीची नायिका देवकी हिचा जन्म एका माविणीच्या पोटी झालेला आहे. परंपरागत चालत आलेला शरीरविक्रयाचा व्यवसाय तिला करावयाचा नसतो. पण तिच्या समजूतदार आईच्या मृत्यूनंतर परिस्थितीच अशी काही निर्माण होते की, अखेर ती विहिरीचा तळ गाठून आत्महत्या करण्याचा निर्णय घेते. ही देवकी आचऱ्यात रामनवमीच्या उत्सवाच्या वेळी देवालयाच्या परिसरातील विहिरीत जीव द्यायचा प्रयत्न करीत असताना बाबीकाका खोत तिचा जीव वाचवतात. तिला आपल्या पंखाखाली घालून घरी आणतात आणि बाबीकाकांची रुग्णाईत बायको काकीबाय ऊर्फ सरस्वतीही अतिशय समजूतदारपणे तिच्यावर आपल्या पदराची सावली धरतात.

### मानवतेचा मुखवटा

बाबीकाकांच्या या वर्तनामागे उदंड मानवता असल्याचा आभास निर्माण करण्याचा कर्णिकांनी अखेरपर्यंत प्रयत्न केलेला आहे. देवकीला घरी आणताना ती कोण आहे याची त्यांना माहिती असते. तिच्या येण्यामुळे आपल्याला कोणकोणत्या शक्तींविरुद्ध लढा द्यावा लागणार आहे, याचीही त्यांना स्पष्ट

जाणीव असते. म्हणजेच एकूण संघर्षाविषयीचा त्याचा दृष्टिकोण हा वास्तव असतो. इतकेच नव्हे तर तो लढा देण्याची त्यांची तयारीही असते. अशा रीतीने श्री. कर्णिकानी बाबीकाकांच्या वर्तनामागील उदड मानवता गृहीत धरलेली आहे. पण, प्रत्यक्ष कादंबरी मात्र या उदंड मानवतेच्या पातळीवर वावरण्यापेक्षा व्यक्तिगत, पातळीवरच वावरत राहते. याचे अगदी स्पष्ट कारण असे आहे की, ती खरोखरीच उदंड मानवता नसून बाबीकाकांच्या मनात देवकी या स्त्रीविषयी खोल दडून बसलेले आकर्षण आहे. या देवकीशी ते लहानपणी खेळलेले आहेत, तिच्यासाठी त्यानी मार खाल्लेला आहे आणि म्हणूनच त्याच्या हृदयात तिच्याविषयीची एक शब्दातीत मृदुता खोल घर करून बसली आहे. कालातराने देवकी त्यांच्या आयुष्यातून निघून गेली असली तरी ही मृदुता मात्र तशीच कायम राहिली आहे आणि वयाच्या पस्तिशीच्या सुमारास जेव्हा त्याना देवकी पुन्हा नाटयपूर्ण रीतीने भेटते त्या वेळी ती मृदुता पुन्हा वर उफाळून येते; पण, वेगळया स्वरूपात! कारण, जेव्हा देवकीसाठी त्यानी मार खाल्ला होता तेव्हा ते लहान होते. स्त्री आणि पुरुष याच्यातील नाजूक नात्याची त्याना जाणीवही नव्हती. पण आता वासनेची रूपे त्यानी भोगलेली आणि अनुभवलेली आहेत. परतु, आपल्या अन्तर्मनातील देवकीविषयीच्या भावनाचे हे वेगळे स्वरूप बाबीकाका स्वतःशीही मानीत नाहीत किंवा कबूलही करीत नाहीत. देवकीला घरी घेऊन आल्यानतर ते काकीवायला (बायकोला) सांगतात, "ही एक वनवासातली गाय माझ्या मागून आली आहे. तिला पाठची बहीण म्हणून तू सांभाळायला हवस..." हीच उदार सहानुभूती मूलभूत राहिली असती तर "आता तरी बघू या. गावकऱ्याची तोंड बंद होतात का..." अशी लाचारी त्यांच्यात कधीही आली नसती. गावकऱ्याच्या विरोधाला आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे, ह्याची बाबीकाकाना अगोदर जाणीव होती ना? मग एवढ्या डोळसपणे स्वीकारलेल्या संघर्षाचे एवढे भय त्यांच्या मनात कसे? खरे म्हणजे त्यांची मूळप्रवृत्ती हीच आहे. पण त्यांना हे स्वीकारता येत नाही. कारण, मानवतेचा मुखवटा त्याना चढविला गेलेला आहे. लेखकाचे गृहीत आणि बाबीकाकांचे प्रत्यक्षात विकसित होणारे व्यक्तित्व यांच्यात अशा रीतीने अन्तराय निर्माण झालेला आहे. असे त्रिशकुत्व प्राप्त झाले नसते तर ज्या केविलवाण्या अगतिकतेने बाबीकाका टेंबवलीकरांच्या पोरीशी लग्न करायला तयार झाले ती क्षुद्रता त्यांच्या ठिकाणी आली नसती. खऱ्या संघर्षापासून त्यानी असे पलायन केले नसते तर त्या सघर्षाचे स्वरूप समजवून घेतले असते; इतकेच नव्हे तर, देवकीच्या संदर्भात, त्याच्यात एक समंजसपणा आला असता. त्यानी तिच्या दुःखाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला असता. तिच्या करुणतेचे मर्म जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता. पण, त्यांना देवकी कधीच कळली नाही. इतकेच नव्हे तर खऱ्या अर्थाने ती त्याना कधी जाणवलीही नाही. याचे कारण असे की देवकी व बाबीकाका यांच्यातील नात्याचा खरा प्रमज बाबीकाकाला कधीच आला नाही...आणि कर्णिकांनाही! आणि म्हणूनच होते काय की, बाबीकाका हा, समाजाने देवकी या एका व्यक्तीवर केलेल्या अन्यायाच्या विरोधात दड थोपटून झुजारपणे उभा राहिलेला देवमाणूस वाटत नाही. त्याला कुठल्याही स्वरूपाची सामान्य किंवा असामान्य प्रातिनिधिकता लाभत नाही. तो सकुचितपणे स्वतःभोवतीच्या रिंगणातच गिरक्या घेत राहतो. असे असूनही कर्णिक बाबीकाकाला थोर करण्याच्या धडपडीपायी (म्हातारीला विहिरीतून काढणे, गावकऱ्याची शेती जळू नये म्हणून धरण बांधणे इत्यादी) उदात्त घटना त्यांच्यावर लादू लागतात. अशा वेळी बाबीकाका हे थोरपणाचा पायघोळ झगा घातलेले कणाहीन वाटू लागतात आणि त्यामुळेच अखेरीस ते विसगतीचा कधीही न उकलला जाऊ शकणारा गुन्तवळा झाल्यासारखे वाटतात.

### उपऱ्या घटना

माजलेल्या खोंडाला एका थपडीत नामोहरम करणाऱ्या धिप्पाड बाबीकाकाला देवकीने पाठीवर घेऊन आणण्यासारखे प्रसंग केवळ कृत्रिम, उपरे आणि अशक्यप्रायच नव्हे तर अक्षरशः हास्यास्पद वाटतात. घटनाची अपरिहार्यता नजरेआड झाल्यामुळे, संघर्षातील व्यक्ती घटकाच्या स्वभावातून त्यांचे उद्बोधन न झाल्यामुळे अनेकदा कार्यकारणांची सगती ही संशोधनाचाच विषय ठरते. बाबीकाकांच्या नोकराला रुमडघालावेड का लागते, हे कळणे कठीणच जाते. रुमडघाने आग लावल्यानंतर देवकीचा मांगर धडाडून पेटून डोंब उडूनही बाबीकाकाने आगीत शिरून देवकीला उचलीपर्यंत तिला जाग येत नाही ही घटनाही अशीच मुद्दाम घडवून आणली गेली आहे अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सगळ्या उपऱ्या घटनांच्या गर्दीत देवकीने योगायोगाने बाबीकाकांच्या घरात झोपायला यावे व त्याच रात्री तिच्या मांगरावर वादळाने वृक्ष कोसळून ते छिन्नभिन्न व्हावे या घटनेतील प्रतीकात्मकता प्रत्ययासच येत नाही. तर ती एक कृत्रिम योगायोगाची नाटकी घटनाच प्रतीत होते. टेंबवलीकराच्या शाताचे कथेतील आगमन हे असेच उपरे वाटते.

### काही वेधक चित्रण

सामाजिक सघर्षाचे वस्तुनिष्ठ दर्शन न झाल्यामुळे सपूर्ण कथेच्या सदर्भात कर्णिकांच्या व्यक्तिरेखा या पांगळ्या तर झालेल्या आहेतच; पण संकुचित आणि स्वयंकेंद्रितही झालेल्या आहेत. त्याला थोडाफार अपवाद वाटते ती बाबीकाकाची पत्नी काकीबाय ऊर्फ सरस्वती. ती सगळा विरोध वस्तुनिष्ठ दृष्टीने स्वीकारते. कारण तिच्याजवळ जीवनासबधीची आस्था आणि निष्ठा आहे. माणुसकीविषयीचा तिचा समंजसपणा डोळस आहे. भोवतालची परिस्थिती ती याच सुजाणतेने स्वीकारते. बाबीकाका आणि देवकी यांच्या नात्यातले सत्य तिला नुसतेच जाणवले नाही तर उमगलेही आहे. म्हणून "तुम्ही तिला परकेपणाने वागवू शकणार नाही आणि तिलाही ते साधणार नाही." असे ती बाबीकाकाला सागते. तिच्या या समजूतदार


**Ramanata Anant Kessarkar**

*Import & Export*

P. O. Box No. 126

**MARGAO – GOA**

*specialized Dealers in*

**Bicycles, Cycle Spare parts**

डोळसपणामुळेच तिचे दुःख प्रभावी वाटते. तसेच दुसरी प्रभावी व्यक्तिरेखा सगुणेची झाली आहे. संपूर्ण कथेच्या संदर्भात सगुणेला तसे फारसे महत्त्व नाहीच. तरीदेखील तिच्याविषयी, तिच्या दुःखाविषयी वाचकाला करुणा वाटू लागते. ही पात्रे शब्द उधळीत नाहीत. आपल्या दुःखाचे, त्यागाचे किंवा पतनाचे कोडकौतुक करीत बसत नाहीत तर फक्त सगळे भोगीत राहतात. त्यांच्या या मौनामुळेच त्यांच्या दुःखांना धार चढली आहे. त्यांचे दुःख कणखर बनले आहे. त्या विरोधात उठत नाहीत किंवा प्रतिकार करीत नाहीत, हे खरे असले तरी त्या दुःख नाकारीतही नाहीत. या डोळसपणामुळेच त्यांच्या व्यक्तित्वाला चैतन्य लाभलेले आहे. त्यांच्या व्यक्तित्वविकासात मनोज्ञ अशी भावनात्मक तर्कसंगती आलेली आहे. मात्र देवकी ही प्रमुख व्यक्तिरेखा असूनही ती सदैव पार्श्वभूमीदाखलच वापरली गेली आहे. त्यामुळे तिच्या व्यक्तित्वाची धार कधी जाणवतच नाही. तिच्या चित्रणात मानवसहजता प्रत्ययास येत नाही. कारण, अनेकदा ती अशी वागून जाते की सर्वसाधारणपणे वास्तव जीवनात माणसे तशी वागत नाहीत. ती समजूतदार आणि जीवनसंघर्ष डोळसपणे स्वीकारणारी आहे. हा जो सूर लेखकाने अखेरपर्यंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्याच्याशी प्रत्यक्षातील देवकी एकसंध वाटत नाही. वाचकाला देवकी जाणवत राहते ती केवळ तिच्या नवथर स्वप्नशील प्रणयार्त वृत्तीमुळेच. ती सदैव प्रेमासंबंधीच्या Romantic illusion मध्येच वावरत असते. बालपणची चिंचा खाणारी देवकी, बाबीकाकांच्या आजारात मध्यरात्री चोर पावलाने जाऊन त्यांचा घाम पुसणारी देवकी, त्यांच्याबरोबर घरण बांधू लागणारी देवकी, बाबीकाकांना न्हाऊ घालणारी देवकी, रघूच्या आग्रहाखातर बाबीकाकांजवळ निजणारी देवकी, बाबीकाकांचे चुंबन घ्यायची इच्छा दडपून टाकणारी देवकी; या देवकीच्या अनेक रूपातून ही प्रेमहुरहूर व्यक्त झालेली आहे. अशा या प्रेमार्त हुरहुरीच्या प्रदर्शनापलीकडे देवकीच्या व्यक्तिरेखेत कोणतीही विशेषता प्रत्ययास येत नाही. तिचे व्यक्तित्व हे एकांगी आणि त्यामुळेच बोथट वाटते. देवकीला केवळ प्रणयार्त प्रतिमा करून आणि तिला सदैव पार्श्वभूमीदाखल वापरून लेखकाने तिच्या व्यक्तित्वाच्या विकासाची गती अवरुद्ध करून टाकली आहे. लेखकाने आपल्या स्वतःच्या व्यक्तिरेखेवर केलेला फार मोठा अन्याय होय.

कर्णिकांनी या सगळ्या व्यक्तींवर स्वतः कल्पिलेले व्यक्तित्व न लादता त्यांचे जीवन त्यांनाच जगू दिले असते आणि त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करून त्यांना त्यांच्याच सुख-दुःखांच्या भाषेत उमगून घेण्याचा प्रयत्न केला असता तर 'देवकी' तील संघर्षाला व्यापक सखोल आणि प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झाले असते आणि त्यांच्या या कादंबरीतून त्याना जे जीवनदर्शन घडवावयाचे आहे. तेही सच्चे, सखोल आणि उच्च दर्जाचे झाले असते.

—वसु शंकर भगत


## पुरंदरे यांचे कथासाहित्य

### शिवकथा

- लाल महाल
- प्रतापगड
- पन्हाळगड
- राजगड
- पुरंदर
- आग्रा

### स्फुट ऐतिहासिक कथा

- दख्खनची दौलत – भाग १
- दख्खनची दौलत – भाग २
- मुजऱ्याचे मानकरी
- जाळत्या ठिणग्या

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणें २




# दीर्घायुष्य व कायाकल्प

*जानेवारी १९६३ पासून*
*सुरू असलेल्या*
**श्री. पु. ना. ओक**
*यांच्या लेखमालेचा हा समारोप,*
*आनुषंगिक विषयांवरील*
*लेखकाचे मतप्रतिपादन येथे सादर केले आहे.*

## : १ : शरीर सौष्ठव : कृत्रिम आणि नैसर्गिक

मानवी शरीर हे बागेसारखे आहे. दक्षतेने व मेहनतीने एखाद्या सुंदर उद्यानाप्रमाणे ते डौलदार, फुललेले, उमललेले, ताजेतवाने करता येईल तर उलट हेळसाड व आततायीपणाने कुरूप, निर्जीव, निस्तेज, घाणेरडे आणि करंटेही बनवता येईल.

शरीरप्रकृती उत्तम असली तर सामान्य चेहरेपट्टीची समजली जाणारी व्यक्ती एकदम सुंदर दिसू लागते. प्रकृती बिघडू लागली की शरीरातील तजेला व शक्ती ओसरून ते दुर्बल व निस्तेज दिसू लागते. तारुण्य व वार्धक्य अशा अवस्थांत हाच फरक आहे. आपण ज्या वयाला तारुण्य समजतो त्या वयातसुद्धा कोणी खरोखर सशक्त व सुंदर दिसतात तर इतर वृद्धाप्रमाणे रोगजर्जर, केस पाढरे झालेले, डोळयाना चश्मा लावणारे व लवकर थकून जाणारे असते. म्हणून लहान वयाचे वृद्ध असू शकतात तसे उतार वयाचे दमदार तरुणही असू शकतात. एकूण वय हे मुख्य नसून आंतरिक शारीर यंत्र कोणाचे कितपत शाबूत आहे याच्या खुणा चेहऱ्यावर व शरीरावर प्रतिबिंबित होतात.

पुरुषाच्या शारीर सौष्ठव स्पर्धांत स्नायूंच्या ढब्बूपणास मान देण्याची पद्धत सध्या रूढ आहे. मग नाकावर चश्मा असला, चेहरा पडका दिसत असला तरी चालते. हे योग्य नव्हे. आरोग्याची छाप चेहऱ्यावरील व इतरत्र शरीरावरील लखलखाटाने जाणवली पाहिजे. स्नायूचा ढब्बूपणा ही गोष्ट दुय्यम किंवा तिय्यम येईल.

नदवंशाच्या अखेरच्या काळात भारतात एक सौंदर्यस्पर्धा झाली होती तीत मुरा नावाची स्त्री ( चद्रगुप्ताची भावी माता ) पहिली आली. स्पर्धेपूर्वी ती पाचसहा महिने काश्मीरच्या शीतल व स्वच्छ हवेत जाऊन राहिली होती. तेथे नियमित फळे, गाईच्या दुधाचे लोणी असा आहार आणि भरपूर व्यायाम घेऊन तिने आपल्या सौंदर्याचा बाग खुलवला होता. सौदर्याची म्हणजेच शारीर सौष्ठवाची जोपासना व मशागत अशी करायची असते.

तासन्तास आरशासमोर बसून निरनिराळया साड्या व पोलकी घालून पाहणे, भुवयाना, गालाना व ओठांना रंग लावणे, चेहरा पुसण्यासाठी अनेक टॉवेल वापरणे म्हणजे सौंदर्याची जोपासना किंवा उपासना नव्हे. मानवी शरीरात सौंदर्यास आवश्यक त्या सर्व रंगांचे कारखाने जय्यत तयार आहेत. ते योग्य आहार, विहार, व्यायाम, नियमितपणा, स्वच्छता, सयम यानी जोरात चालू मात्र केले गेले पाहिजेत. हे आंतरिक सौदर्य स्त्री-पुरुषास दोघासही साध्य आहे. मात्र त्यासाठी जिभेवर व मनावर नियत्रण ठेवून एकाग्र चित्ताने प्रयत्नाचे सुकाणू मात्र नीट हाताळले पाहिजे.

### काही बाह्य कसोट्या

शरीराचे वजन उंचीस अनुरूप असावे म्हणजे उंची जितके इंच असेल त्याच्या दुप्पट पौंड सरासरी वजन असावे. त्यापेक्षा अधिक असणे हे शरीर लठ्ठ असण्याचे द्योतक आहे. वजन वाजवीपेक्षा कमी असणे हे कृशता दर्शवते. अंगावर सूज येणे आपण जसे वाईट व चिंताजनक समजतो तसेच लठ्ठपणासही समजून त्याच्या उपायास लागले पाहिजे. छातीपेक्षा पोट पुढे असणे हेही सूज असल्याप्रमाणे धोक्याचे मानले पाहिजे. निरोगी माणसाचे पोट नेहमी खपाटीच असले पाहिजे, मग जेवण झालेले असो किंवा नसो. लठ्ठपणा व कृशता ही दोन्ही अपचनाची लक्षणे होत. तूप-दूध खाल्ल्याने माणूस लठ्ठ होतो व कोरडी कादाभाकरी खाल्ल्याने कृश, अशा समजुती सर्वत्र पसरलेल्या दिसतात त्या चूक होत. शास्त्रीय परिभाषेत ज्याला 'फॅट' अथवा 'चरबी' असे संबोधतात ते खाल्ल्याने माणूस लठ्ठ होते ही कल्पनाच मुळात चुकीची आहे. तसे असते तर रक्तक्षय झालेल्या माणसाला रक्त प्यायला देऊन व कृश माणसाला चरबी किंवा मासाचा रतीब लावून ताबडतोब बरे करता आले असते. प्रत्यक्षात तसे होत नाही. उलट लठ्ठ व्यक्तीस कांदाभाकरी भरवली तरी ती व्यक्ती लठ्ठच होत राहते व कृश माणूस दूधदुभते सेवन करूनही कृशच राहतो. याचे कारण एकच आहे की दोघांचीही पचनक्रिया बिघडलेली असते. एकाच्या शरीरात अन्नाचे संपूर्णपणे रक्त-मांस व इतर रसायने न बनता चरबीच होत जाते तर दुसऱ्याच्या शरीरांत चरबीही होत नाही. दोघांनाही पचनक्रिया सुधारावयाचे उपाय सुरू केले पाहिजेत. म्हणजे योग्य आहार, विहार, निद्रा, व्यायाम, शुद्ध वायू इत्यादीचा अंगीकार केला पाहिजे.

तजेलेदार चेहरा, योग्य वजन व खपाटी पोट यांच्याप्रमाणेच शरीरसौष्ठवाचे दुसरे गमक म्हणजे तीक्ष्ण दृष्टी. मरेपर्यंत कधीही

चश्मा लावावा न लागणे, डोळे निरोगी व कार्यक्षम असणे अत्यंत आवश्यक. अर्थात चश्मा लावणाऱ्यास आदर्श शारीरसौष्ठवाच्या स्पर्धातून वगळले पाहिजे. कारण डोळे हा शरीराचा महत्त्वाचा भाग असताना दुर्बल दृष्टी हे शारीरसौष्ठवातील मोठे वैगुण्य समजले गेले पाहिजे.

तोंडाला घाण येणे हेही शारीरसौष्ठवातील न्यून समजले पाहिजे.

शारीरसौंदर्याचे एक प्रमुख गमक म्हणजे तळहात व तळपाय स्वच्छ, मऊ, तजेलेदार व गुलाबी दिसणे. शारीरिक ऱ्हास तळपायांच्या खरबरीतपणाने प्रकट झालेला बऱ्याच वेळा दिसतो. म्हणून इतर सर्व ठाकठीक असून तळपाय काळे व खरबरीत असता सौंदर्यात तो कमीपणा असल्याचे मानले गेले पाहिजे.

दृष्टीप्रमाणेच श्रुतीही तीक्ष्ण असली पाहिजे. कानांची वधिरता काही वेळा बाह्यसौंदर्यास घातक झालेली दिसली नाही तरी तो एक मोठा आतरिक विघाड समजून त्या शरीरास 'सुदर' समजता येणार नाही. कारण 'सौंदर्य' हा दीर्घायुष्य व निरोगी जीवनाचा दृश्य शिक्का आहे. तो शिक्का वरून दिसतो तितका आतून मजबूत नाही हे सिद्ध करणारे कोणतेही चिन्ह त्या सौंदर्यास बाधकच मानले पाहिजे.

आदर्श शारीरसौष्ठवास एकही केस पिकलेला दिसता कामा नये. अंगावर कोठेही पांढरी छटा असलेला केस असणे हे त्या शरीरात बऱ्याच दिवसांपासून आंतरिक विकृती सुरू झाल्याचे द्योतक आहे.

अशा तऱ्हेचे बाह्यांग असेल त्यानाच शारीरसौष्ठवस्पर्धांतून उमेदवार म्हणून प्रवेश मिळावा. नंतर त्याचा वैयक्तिक तजेला, रेखीव चेहरेपट्टी, शात स्थिर दृष्टी, नितळ वर्ण, आकर्षक केश, डौलदार डोके, छाप पाडणारे व्यक्तिमत्त्व, घट्ट घोटीव मांड्या इत्यादीचे गुण ठरवून सौंदर्य व शारीरसौष्ठवस्पर्धांतील व्यक्तीव्यक्तीचे क्रमाक ठरवावेत. स्त्रियांच्या बाबतीत केवळ चेहरेपट्टी व पुरुषाच्या बाबतीत केवळ स्नायूची कृत्रिम पुष्टता हे मुख्य गुण न समजता दोघाच्याही बाबतीत योग्य वजन, उंची, काळे केस, आदी वर वर्णन केलेल्या सर्व कसोटचा लावण्यात याव्यात. पुरुष शूरवीर व सशक्त असूनसुद्धा नाजूक व सुंदर दिसू शकतो हे रामायण-महाभारतांवरून कळण्यासारखे आहे. वरील सर्व शारीरिक गुण असल्याशिवाय शारीरसौष्ठवाचा शिक्का कोणालाही लावणे अयोग्य होय.

## : २ : ज्योतिषशास्त्र व शारीरोपचार

आरोग्य व आयुर्वर्धनास ज्योतिषशास्त्राधारे चांगले मार्गदर्शन होऊ शकते. एवढ्यासाठी तरी प्रत्येकाने आपल्या जन्मटिपणावरून आपली पत्रिका करून ठेवणे सहाय्यकारी. ठरेल प्रत्येकाचा देह कोणत्या बऱ्यावाईट घटकांचा, कच्च्यापक्क्या परमाणूंचा, साधकबाधक द्रव्याचा, ऊष्णशीत तत्त्वाचा आणि रोगीभोगी जिवाणूंचा बनलेला आहे ह्याचे अनुमान जन्मपत्रिकेवरून निघू शकते.

ह्या दृष्टीने प्रत्येकास निदान आपली पत्रिका पाहून स्वतःच्या प्रकृतीविषयी काही अटकळी बांधण्याइतके वैद्यकीय फलज्योतिषाचे ज्ञान असणे इष्ट होय. जीवनोपयोगी अशा अनेक हेतूंनी पूर्वी वैद्यक, ज्योतिष इत्यादी विषयाचे थोडेबहुत ज्ञान प्रत्येक कुटुंबातून अनेक स्त्रीपुरुषांस असे. ते सर्वंकष व सर्वांगीण ज्ञान कमी होत गेले तसतशी खाण्यापिण्यातील व आचारव्यवहारातील शुद्ध-अशुद्धीची बंधने अज्ञानाच्या बेशुद्धीमुळे शिथिल होत गेली.

स्वतःस ज्योतिषाचे ज्ञान नसल्यास एखाद्या चांगल्या ज्योतिषाकडून वेळोवेळी तशी माहिती करून घेऊन प्रत्येकाने आपल्या स्वतःस मानवणारा आहार, औषधे, पथ्ये व बहुधा होणारे रोग याची सूची तयार करावी.

### पंचमहाभूतांचा पिंड

प्रत्येकाचा पिंड हा पंचमहाभूतांचा बनलेला असतो हे आपणास माहीत आहे. ह्या पंचमहाभूताचे परस्परांशी कोणत्या प्रमाणात मिश्रण होऊन प्रत्येक मानवाचा देह बनलेला आहे ह्याचे जन्मपत्रिकेवरून कोष्टक तयार होऊ शकते. सूर्याच्या तेजामुळेच पृथ्वीवर जीवसृष्टी उत्पन्न झाली व टिकूनही आहे हेही सर्वश्रुत आहेच. सूर्यकिरण काही प्रमाणात पृथ्वीवर परस्पर येतात तर काही अशी चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी आदी ग्रहांवरून परावर्तित होऊन पृथ्वीवर पोचतात. ज्या ज्या ग्रहावरून हे सूर्यकिरण परावर्तित होऊन पृथ्वीवर येतात त्या त्या प्रमाणात त्या किरणांचे गुणधर्म निरनिराळे असतात. शिवाय ग्रह हे आपापल्या गतीने पृथ्वी व सूर्यापासून सतत कमीअधिक अंतरावर असल्याने परावर्तित होऊन येणाऱ्या किरणांच्या तीव्रतेत फरक पडत असतो. आणखी पुन्हा ग्रहातील धातू व माती यांची ज्या ज्या प्रमाणात क्षय वा वृद्धी होत राहील त्या त्या प्रमाणात त्याच्यावरून परावर्तित होऊन पृथ्वीवर पोचणाऱ्या सूर्यकिरणात काही गुणदोष निर्माण होतील. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की जीवसृष्टी निर्माण करण्यास कारणीभूत होणाऱ्या किरणांत दरक्षणी फेरबदल होत असल्याने अनंत कोटी जीव प्रत्येक क्षणी उत्पन्न होत असतानासुद्धा एक दुसऱ्यासारखा नसतो. एकाच्या हातावरील, पायावरील व शरिरावरील सूक्ष्म रेषा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या रेषांपेक्षा भिन्न असतात. म्हणूनच एकदा निघून गेलेली वेळ जशीच्या तशी पुन्हा येत नाही हेही सिद्ध होते.

पंचमहाभूतांच्या मिश्रणाने जीवसृष्टी कशी निर्माण होते ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण पावसाळ्यात विशेषेकरून दिसते. पावसाळ्यात एवढ्यासाठी की जीव तयार व्हायला जेवढे उष्मा, वाफ व ओलावा जरूर असतात ते पावसाळी वातावरणात भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. पावसाळ्यात गवत, कावळ्याच्या छत्र्या इत्यादी वनस्पतिजीव भरपूर प्रमाणात उगवतात, तसेच गाडुळे, अळ्या, सर्प, विंचू, बेडके, मुंग्या, मच्छरे, मुंगळे आदी प्राण्याची उत्पत्तीही डोळ्यात भरण्याएवढी होते. पावसाळी हवेत दिवा लावल्याबरोबर त्या दिव्याच्या प्रकाशकिरणानी वायुमंडलातील सूक्ष्म अंड्यात जीव संचरून दिव्याभोवती घिरट्या मारणारे अनेक किडे, उडणारे मुंगळे इत्यादी जीव त्यातून उत्पन्न होतात. जितक्या प्रखर किरणाचा दिवा असेल तितके अधिक वेगवान व पुष्ट शरिराचे किडे वातावरणात फिरताना दिसतात. दिव्याच्या प्रकाशानेच त्यांच्यात जीव संचरत असल्याने प्रकाश श्वासोच्छ्वासाप्रमाणेच त्यांच्यात जीवजोपानेस अवश्य असतो. दिवा विझवताच हे किडे मरतात. दिवा असेपर्यंत ते दिव्याच्या भोवतीच घिरट्या घालतात. कारण दिव्यापासून लाब जाण्याने त्याचे

जीव गुदमरतात. जेथे झाडी असेल तेथे निराळ्या प्रकारचे जीव तयार होतात. कारण झाडाचे अनेक रस, बाष्पमय पावसाळी वातावरण व दीपप्रकाश (किंवा सूर्यप्रकाश) यांचे मिश्रण निराळ्या प्रकारचे जीव तयार करते. तेलाचा दिवा, मेणबत्ती, कमीअधिक प्रखरतेचे विजेचे दिवे, पेट्रोमॅक्स् ह्या सर्वांच्या प्रकाशाने निरनिराळ्या प्रकारचे जीव तयार होतात. तसेच बर्फमय प्रदेश, रेताड वाळवंट, धूळ, पर्वत अशा विविध पार्श्वभूमीत विविध जीव उत्पन्न होतात याचे कारण त्या त्या प्रदेशाच्या गुणधर्मानुरूप तेथील पंचमहाभूताचे मिश्रण-प्रमाण भिन्नभिन्न होते.

अन्नधान्यात, कणकीत इत्यादीत पाणी पडले किंवा सर्द पावसाळी हवा शिरली की अळ्या, पोरकिडे आणि जीवजंतू त्यात निर्माण होतात हा आपला सर्वांचा अनुभव आहेच.

प्रथम सूर्यासारखा एक भला मोठा प्रखर तेजोगोल आकाशात फिरत होता. नंतर त्याचे तुकडे होऊन ते ग्रह बनले व ते कमिजास्त प्रमाणांत थड झाले. ह्यापैकीच एक पृथ्वी. तिच्यावर पाणी निर्माण झाल्याने पृथ्वीची अगची उष्णता व शिवाय सूर्याची उष्णता ह्यांमुळे वाफ तयार होऊन त्यात जीवजंतू उत्पन्न होऊ लागले. कोठेकोठे बेडकाचा व किड्याचा पाऊस पडल्याचे आपण ऐकले आहे. ही बेडके व किडे वातावरणातच पंचमहाभूताच्या मिश्रणाने तयार होऊन भूतलावर पडतात. जीवसृष्टी अशीच .निर्माण झाली असावी. ह्यांवरूनच अनेक प्रकारचे जीवजंतू, पशुपक्षी, वानरे व स्त्रीपुरुष मानव पंचमहाभूताच्या विविध मिश्रणांनी पृथ्वीवर जागोजाग स्वतंत्रपणे तयार झाले असले पाहिजेत. ते वानरापासून माणूस अशा पाश्चात्य सिद्धाताप्रमाणे एका प्राण्यापासून दुसरा असे उत्क्रांत झालेले नाहीत. अशा स्वतंत्र उत्पत्तीमुळेच मानववंश खुजे, उंच, काळे, गोरे, पिवळे, घारे, पिंगट अशा विविध गुणाचे निर्माण झाले. पृथ्वीवर ठिकठिकाणी ज्या ज्या प्रकारचे पचमहाभूताचे भिन्न मिश्रण तयार झाले त्या त्या प्रमाणे तेथे तेथे विशिष्ट प्रकारचे मानव, पशुपक्षी व जीवजतू तयार झाले. भूगोलांतील माहितीवरूनही हेच स्पष्ट होते. ह्याच कारणामुळे शनीसारख्या एखाद्या ग्रहाच्या दृष्टीने मानवी शरिरात विशिष्ट जीवजतू निर्माण होऊन रोग उद्‌भवतो. ती दृष्टी गेली की जतूची निर्मिती बद होऊन रोग बरा होतो. वरील ऊहापोह करण्याचा उद्देश एवढाच की मानवी देह पंचमहाभूताच्या मिश्रणाने कसा तयार झालेला असतो ते स्पष्ट व्हावे. तसा तो तयार झालेला असल्याने त्याच्या पिंडात व रक्तात कोणकोणती बरी वाईट तत्त्वे आहेत ते पत्रिकेतील ग्रहपरिस्थितीवरून कळते.

ज्या प्रकाशतत्त्वांचा ( किंवा पंचमहाभूताच्या मिश्रणाचा ) पिंड बनलेला असेल त्यास सर्वथैव प्रतिकूल असे मिश्रण वातावरणात तयार झाले की त्या व्यक्तीचा मृत्यू होतो. जड देह राहतो पण त्यातील चेतना मात्र नष्ट होते. ह्यावरून देहातील चेतना ही ईश्वरी अंश असते हे वेदाती तत्त्वही स्पष्ट होते. कारण देहातील ज्योत अथवा चेतना ही विश्वातील सर्वव्यापी प्रकाशातून निर्माण झालेली असते.

व्यक्तीच्या जीवज्योतीत व पिंडात कोणकोणत्या किरणांचे व घटकाचे मिश्रण कशा प्रकारे झालेले आहे ह्याचा काहीसा अंदाज जन्मपत्रिकेवरून का लागावा हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

## पत्रिका आणि प्रकृतिनिदान

आता जन्मपत्रिकेवरून व्यक्तीच्या शरीरप्रकृतीसंबंधी कसे निष्कर्ष काढता येतील त्याची केवळ दिशा दाखवण्याचे या प्रकरणात योजिले आहे. ह्यावर अधिक सशोधन व्हावयास हवे. तनुस्थानी कोणती राशी आहे व त्या राशीचे ऊष्ण–शीत, सुरूप-कुरूप, आदी कोणते पर्याय संभवतात त्याचा विचार केला पाहिजे. नतर तनुस्थानाच्या दोन्ही बाजूस शुभ ग्रह आहेत की पाप ग्रह हे पाहावे. तनुस्थानचा अधिपती (म्हणजेच लग्नेश) तनुस्थानीच असता किंवा तनुस्थानी त्याची दृष्टी पोचत असता मूलतः प्रकृती निकोप, सुदृढ, आजारातून लवकर बरी होणारी, भूक चांगली लागणारी, अगपिंड सुदृढ बनवणारी अशी असली पाहिजे हे सिद्ध होते. लग्नेश शत्रुग्रही, शत्रुग्रहाने विद्ध, व्ययात किंवा नीचीचा असता अपचन, शैत्य, काहीतरी शारीरिक व्यथा नेहमी संभवते. व्ययेशाची दृष्टी लग्नावर असणे, व्ययेश लग्नी असणे, एखाद्या ग्रहाची लग्नावर किंवा लग्नेशावर नीच दृष्टी असणे किंवा शत्रुग्रह लग्नी असण्यानेही प्रकृतीत मूलतः दोष असल्याचे लक्षण दिसते. अशा लक्षणानी अपघात, ऑपेरेशन किंवा वारंवार पीडा देणारे रोग हे त्या त्या ग्रहाच्या व राशीच्या गुणधर्मांप्रमाणे संभवतात. पत्रिकेतील ह्या मूळच्या गुणदोषावरून ग्रहाच्या परिभ्रमणामुळे वेळोवेळी शरिरास काय काय व्याधिउपाधी जडणे शक्य आहे ते काढता येते. मानसिक अवस्थेसबधीही असेच निष्कर्ष काढण्याचे विशिष्ट नियम आहेत.

राशी व ग्रहांच्या प्रमाणे प्रकृती वातुळ, कफप्रधान की पित्तकारी, उष्ण की शीत इत्यादी निदान करता येते. शनी लग्नी दुर्बल असता किंवा मेष लग्नावर शनीची दृष्टी असता अपचन, अग्निमाद्य, बद्धकोष्ठ, शैत्य इत्यादी विकार उद्‌भवतात. लग्नेश (चंद्र नसून) कर्क राशीत पडला असता पिंड पिचपिचीत असतो. अशांचे स्नायू घट्ट, मोठे व कणखर बनत नाहीत. लग्नेशासह शनी असता शरीर व चेहरा कृशता किंवा लठ्ठपणा यामुळे ओबडधोबड दिसेल. गुरू लग्नी असता चेहऱ्यावर शाती, तेज व हुशारी विलसते. अपघातापासून व कठीण आजारातून निभाव होतो. गुरू कोणत्या राशीचा लग्नी आहे त्यावर चेहऱ्यावरील तेज इ. अवलबून राहील. लग्नेश कर्कराशीत पडून लग्नाच्या दोन्ही बाजूस गुरू व चद्र असता व्यक्ती लख्ख गोरी असते. राहू द्वितीय स्थानात असता चेहरा व व्यक्तिमत्त्व सुदर व छाप पाडणारे असते. ही उदाहरणे द्यायचा उद्देश एवढाच की ग्रहाच्या परिस्थितीचा देहावर परिणाम होतो हे सिद्ध व्हावे. लग्नेश शत्रुगृही शनीच्या राशीत असता जठराग्नी मद असतो. अशा व्यक्तीस सत्री, भात आदी थड खाद्यपदार्थांनी अपचनाचे विकार होतील. लग्नेश शत्रुगृही अग्निराशीत असता थड पदार्थ चागले मानवतील.

एकूण तनुस्थानातील राशी, लग्नेश कुठल्या राशीत कोठे पडला आहे, लग्नी काही शत्रुमित्रग्रह आहेत की काय, लग्नावर किंवा लग्नेशावर शत्रु-मित्र गृहाची दृष्टी व लग्न आणि लग्नेश यांच्या उभय बाजूंस असणारे पाप, शुभ किंवा शत्रुमित्र ग्रह यावरून व्यक्तीची मूल प्रकृती, होणारे रोग, मानवणारे खाद्यपदार्थ व परिणामकारक ठरणारी औषधे यांचे निदान करता येईल.

## : ३ : अन्य महत्त्वाच्या गोष्टी

### ब्रशने दात घासणे

ब्रशने (कुंचल्याने) दात घासण्याची घातुक पाश्चात्य पद्धत रूढ होत आहे हे बरे नव्हे. त्याने दतरोग वाढत असून दात लवकर पडतात किंवा पाडावे लागतात. रोज आघोळीच्या वेळी आपण जर कुंचल्याने अग घासू लागलो तर अंगास सूक्ष्म चरे पडून ते रक्तबंबाळ होईल व त्यावर थोडी सूजही येईल. हिरड्या तर बाहेरील त्वचेपेक्षा किती कोवळ्या व ओलसर असतात. रोजच्या कुंचलघर्षणाने चिरा पडून त्यात अन्नकण कुजत राहिल्याने हिरड्या रोगट व दुर्बल होतात. आपण समजतो की आतून काही रोग उद्भवला असावा. ते खरे नव्हे. तो दुष्परिणाम कुचला वापरल्याचा होय.

ब्रशचा दुसरा एक मोठा अवगुण म्हणजे ब्रशच्या बुडाला जेथे कुंचल्याच्या लहान जुडग्या वाधलेल्या असतात तेथे रोज आपली थुंकी जाऊन साचत राहते. त्या ठिकाणी ब्रश कितीही घुतला तरी स्वच्छ होणेच नाही. ब्रशमुळे रोजची साठणारी व ब्रशमध्ये अनेक महिने कुजत पडलेली थुकी आपल्या तोंडात जाते.

ब्रशचा तिसरा एक अवगुण म्हणजे त्याने म्हणतात तितकी दातांची व हिरड्याची सफाई होत नाही. हिरड्या ह्या बोलूनचालून कोवळ्या व मांसल असतात. त्यांना बोटानी दाबून रगडल्यानेच त्याच्यातील अस्वच्छता बाहेर येईल. कुंचल्याने चरे पाडून हिरड्यांतील अशुद्धतेस रुजण्यास जमीन नांगरून दिल्यासारखे होते. फटीफटीत कुंचल्याचे कुंतल पोचून स्वच्छता करतात असा कित्येकांचा गैरसमज आहे. फटीफटीत कुंचल्याचे कुतल पोचतात पण ते केवळ स्पर्श करून चरे व भोके पाडण्यापुरतेच. दातावर जमलेले कीट नखाने खरडूनसुद्धा मोठ्या कष्टाने निघते तेथे कुचल्याच्या एकेका कुंतलाच्या नाजूक स्पर्शाने कसे निघेल. म्हणून कुंचल्याचे कुंतल फटीफटीत पोचून उपायाऐवजी अपायच करतात.

पाश्चात्य देशात ब्रशने दात घासण्याची पद्धत रूढ झाली ती त्याच्याकडे पूर्वापार कडाक्याची थंडी वर्षभर असते तेव्हा हात भिजवण्याचा त्रास नको म्हणून.

पाश्चात्य टूथपेस्ट (जंतुघ्न दंतमंजन) वापरणे चागले. ब्रशऐवजी बोटावरच टूथपेस्ट घेऊन दात (हिरड्या) घासण्याने दात अकाली किडणे व पडणे थाबेल. मात्र दातांची मागील बाजू व दातातील फटींतील कीट तर्जनीचे नख आडवे तिडवे करून खरडून काढावे. खालच्या दाताची मागील बाजू नेहमी फार पिवळी होते. तसेच दाताच्या फटीतून कीट जमण्यास सुरवात होताच ह्या दोन्ही ठिकाणी रोज टूथपेस्ट घेऊन दोनदोन वेळा प्रत्येक बाजू बोटाने घासली व बोटाच्या नखाग्राने कानेकोपरे खरडले तर दात स्वच्छ व पाढरे राहतात.

### औषधोपचार

माणूस काटेकोर वागला तरी कळत न कळत व अचानक काही रोग, अपघात, जखमा, ताप हे होणे संभवते. अशा वेळी काय काय करावे हा प्रश्न पडतो.

रोग बरा करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की रोग वा जखम आवून शारीरिक क्रियेनेच बरी होत असते. जखम बरी होते ती औषधामुळे नव्हे तर आतून रक्तपुरवठा इत्यादी योग्य तऱ्हेने झाल्यामुळे. म्हणून रक्तशुद्धी व अन्य तऱ्हेने नैसर्गिक शारीर व्यवहारास मदत करणे हेच औषधोपचाराचे ध्येय असले पाहिजे. रक्तात पाण्याचे वा साखरेचे प्रमाण जास्त असले तर जखमेवर वाटेल ते औषध लावूनसुद्धा जखम बरी व्हायची नाही किंवा ताप निघायचा नाही.

हे तत्त्व लक्षात घेऊन रोग्यास शीघ्रपाचक व रक्तवर्धक वस्तूच खाद्यपेये म्हणून दिल्या गेल्या पाहिजेत. चहा, कॉफी ही त्यातील विषारी पदार्थांमुळे व अपाचक साखरेमुळे अगदीच त्याज्य होत. ओव्हलटीन, बोर्नव्हीटा इत्यादीही साखरमिश्रित पेये देऊ नयेत. आजाऱ्याला साखर घातलेली खाद्यपेये देणे हे जिलबी वाढण्याइतके घातुक होय. कारण जिलबीत तरी साखर हीच अपाचक वस्तू असते.

अगोदर तर आजाऱ्यास भूक व चव लागेपर्यंत काहीच देऊ नये. नतर चव असेल त्याप्रमाणे शुद्ध, साधे, मंदाग्नीवर चागले तापवून थंड केलेले गाईचे दूध, दही, लोणी, डाळीचे सूप, कोवडीचे सूप, गोड द्राक्षे, ओली अंजिरे, डाळिंबे, मोसंबी, शेवफळे व कागदी लिंबाचा थोडा रस एवढेच पदार्थ द्यावेत. वर अगोदरच सागितले आहे की रोग हा आतून बरा होत असतो. वरील आहारानेच रक्तशुद्धी व जीवनसत्त्वानी रोगपरिहार होईल.

औषधोपचाराबद्दल दुसरे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे अन्न हेच औषध व औषध हे अन्न असले पाहिजे. ह्या दृष्टीने आयुर्वेदीय औषधे फारच श्रेष्ठ ठरतात. आयुर्वेदीय औषधीत विड्याची पाने, आवळे, हिंग, दालचिनी, काळे मिऱ्ये, मोहऱ्या, आले, सुंठ अशासारख्या वस्तू असतात. त्या अन्नही होत व औषधेही होत हे आपल्या नेहमीच्या परिचयाचे आहे. म्हणूनच आले किंवा आवळे थोडे कमीजास्त खाल्ल्याने अपाय होत नाही. पाश्चात्य औषधे सहसा 'अन्न' या कसोटीला उतरत नाहीत. ती शरिरात अन्नासारखी जिरत नाहीत म्हणून एक पीडा बरी झाल्यासारखी वाटली तर दुसरी उद्भवते व काही दिवसांनी पूर्वीचीच पीडा अधिक तीव्रतेने सुरू होते.

औषध हेच अन्न व अन्न हेच औषध असावे ह्या तत्त्वास धरूनसुद्धा दूध व फळे हाच मुख्यत: आजाऱ्याचा आहार का ठेवावा ते स्पष्ट होते.

रोग्यास थंडी वाजत असल्याशिवाय किंवा बाहेर सोसाट्याचे वादळ किंवा गारठा असल्याशिवाय दारे, खिडक्या लावणे, रोग्यास पाघरुणात झाकून ठेवणे असले प्रकार करू नयेत. नाकाला जशी शुद्ध हवा लागते तशी अंगावरील सूक्ष्म छिद्रानाही लागते म्हणून शक्यतो अंग उघडे किंवा हवामानाप्रमाणे त्यावर सैल, पातळ कपडे एवढेच असावे.

### भोजन

कोठलाही आहार घेण्यापूर्वी 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' ही उक्ती आठवून ही वस्तू खाणे वा पिणे जरूर आहे का? त्याने आयुर्वर्धन व शरीरपोषण होईल का ह्याचा पूर्ण विचार केला पाहिजे. तसे नसेल तर ते खाद्यपेय न घेतलेले बरे. आजकाल वेळी अवेळी खाण्याचा व चहाचा सुळसुळाट झाला आहे.

वनस्पतीचा वापर करणे अपायकारक दिसून आलेले आहे. त्यात नाना जीवनसत्त्वे घालून ती यव्‌त्यंव्‌ करण्यात आल्याची जाहिरातबाजी दिशाभूल करणारी आहे. सरकीचे व खोबऱ्याचे तेल अतिशुद्ध

करून अनेक दिवस शिळे करून विकल्याने ते ज़ड, अपाचक व न जिरणारे ठरते. त्यामुळे घसा धरतो. पोटाचे नाना विकार सुरू होतात व त्वचारोग होतात. त्यापेक्षा तळणास व फोडणीस साधे तेल किंवा तूप वापरावे म्हणजे आजच्या बऱ्याचशा शरीरव्यथा नष्ट होतील. वनस्पतीचा वापर सरकारी कायद्याने बंद झाला तर उत्तमच; नाहीतर निदान आपल्यापुरता तरी प्रत्येकाने त्याचा वापर बंद करावा म्हणजे मुलाबाळांत व कुटुंबात रोगराईस थोडा तरी आळा बसेल. वनस्पती शरिरात वितळण्यास शरिराचे ९८।।° तपमान कमी पडते हे 'वनस्पती' तेल (तूप) शरिरात न पचण्याचे, न जिरण्याचे कारण होय.

गोड वस्तु खावीशी वाटल्यास खरी भूक नाही हे ओळखून खाणे-पिणे बंद केलेले बरे. तसेच भूक व चव असल्याशिवाय काहीही खाऊ-पिऊ नये. खरी भूक असता साधी कोरडी भाकरीही फार चवदार लागते हे लक्षात येऊन भूक व चव नसताना हात व तोंड आवरावे.

एक भोजन माध्यान्हीच्या सुमारास व दुसरे सूर्यास्ताच्या वेळी घ्यावे. भोजनसमयी इतपत जेवावे की भोजन झाल्याचा ताण किंवा जडत्व पोटास मुळीच जाणवू नये.

भोजनात मुळे, काकड्या, आंबेहळद, कोथिंबीर, बीटरूट, गाजरे अशा कच्च्या वस्तूंच्या फोडींची एक प्लेट, घट्ट वरण एक वाटी भरून, घट्ट भाजी एक वाटी भरून, दोनचार पोळ्या, दोनतीन औंस शुद्ध लोणी, पावशेर फळे व एखादा चमचा मध यांचा अंतर्भाव व्हावा. सायंकाळी भूक असल्यास असेच भोजन घ्यावे नाहीतर दूध, फळे, मध, एवढेच भूक असेल त्याप्रमाणे घ्यावे. दुधाइतकेच सत्त्वपूर्ण परंतु पचण्यास हलके म्हणून दुधाऐवजी वाटल्यास दही घ्यावे किंवा दूध-दह्यां-ऐवजी लोणी घ्यावे.

आजाऱ्याला पाणी व खाद्यपेये सोन्याचांदीच्या भांड्यात ठेवलेली द्यावीत. अंगावरही शक्यतो शुद्ध सोन्याचांदीचे दागिने घालावेत.

रोग्याभोवती नेहमी सुगंध दरवळत राहील अशी व्यवस्था असावी. आंघोळ घालणे शक्य नसल्यास अंग कोमट पाण्याने किंवा लिंबाच्या रसाळ फोडीने पुसून काढावे.

आजाऱ्यास आवडणारे शांत, मधुर, संगीत रेडिओ किंवा फोनो-ग्राफद्वारा चालू ठेवण्यानेही रोग लवकर बरा होतो.

साधे आजार वर सांगितलेल्या नैसर्गिक उपचारांनीच व विश्रांती-नेच बरे होतील. परंतु बऱ्याच दिवसांची अनैसर्गिक व हेळसांडी वागणूक किंवा मोठा अपघात यांमुळे रोग तीव्र असेल तर कोणत्याही अनुभवी, डॉक्टर, वैद्य वा होमिओपॅथकरवी औषधयोजना केलेली बरी. तरीही घरगुती उपाय म्हणून रोग्यास साखरमिश्रित खाद्यपेये न देता दुग्धफलाहारच ठेवावा. त्याने कोणत्याही औषधोपचारास मदतच होईल.

रोगी बरा होत आल्यावर त्यास चालण्याफिरण्यापासून परावृत्त न करता चालण्याफिरण्यास प्रोत्साहन द्यावे. अर्थात हे कोणता रोग आहे व कितपत बरा झाला आहे ह्यावर अवलंबून राहील.

• • •

# ने
# मजसी ने
# परत मातृभूमीला

[ पान १६ वरून चालू ]



वेळानंतर मात्र सामदूप नावाचे मंत्री स्वतःच्या मोटरीतून राज-वाड्याजवळ उतरताच जमावातून भिरभिरत आलेला दगड त्यांच्या वर्मी लागला. पाठोपाठ मोटरीवर दगडांचा वर्षाव होऊन मोटरीची नासधूस करण्यात आली. बेशुद्ध पडलेल्या सामदूप यांना जमावातीलच कुणीतरी भारतीय वकिलातीतील दवाखान्यात उपचारासाठी नेलं. चौथे मंत्री सुरखंग यांनी शहाणपणा करून मोटर दूरवर उभी केली व जमावातून वाट काढीत ते राजवाड्यात पोचू शकले. आत आलेल्या तिन्ही मंत्र्यांना जमावाचे उग्र स्वरूप प्रत्यक्ष पाहून पुढे काय घडू शकेल, याची कल्पना आलेली होती. काही अपप्रकार घडून प्राणहानी होण्यापूर्वी काहीतरी करणे आवश्यक होते. नगबो यांची वाट पाहावी असे ठरले व काही वेळ निघून गेला. नंतर कळले की राजवाड्या-भोवती जमाव गोळा झालेला आहे. हे कळताच नगबो परस्परच चिनी छावणीकडे गेलेले होते.

तिन्ही मंत्र्यांनीच मग जमावातील नेतृत्वाचा अंदाज घेऊन काही-तरी करण्याचे ठरवले. लोकांचा असा निर्धार दिसत होता, की दलाई लामांनी चिनी छावणीत जाता कामा नये. कदाचित् त्यांना राज-वाड्यातून जबरदस्तीने नेण्याचा चिनी प्रयत्न करतील व तसे झाल्यास चिन्यांशी दोन हात करण्याची तयारी लोकांनी चालवली होती.

आत याप्रमाणे मंत्री विचारविनिमयात गर्क असताना राजवाड्या-बाहेर पहिला बळी जमावाने घेतला. फाक्पल खेनचुंग ( Phakpala Khenchung ) नावाचे एक धर्मविषयक तज्ज्ञ होते. चिन्यांशी त्यांचे विशेष स्नेहसंबंध होते, अशी ल्हासात सर्वांना माहिती होती. अकराच्या सुमारास सायकलवर बसून हे गृहस्थ नॉरब्युलिंगका राजवाड्या-जवळ आले. त्यांचा पेहराव अर्धा चिनी होता. डोळ्यांना उन्हाचा काळा चश्मा होता व कमरेला पिस्तूल लटकलेले होते. जमावातील अनेकांना वाटले की हा कुणीतरी चिनी हस्तक आहे. जे त्यांना ओळखीत त्यांना वाटले की चिन्यांच्या वतीने, दलाई लामांना काही-तरी निरोप घेऊन स्वारी आलेली आहे. जमावाचे मनोदर्शन ज्यांना समजते, त्यांना पुढे काय घडेल हे न सांगताही समजू शकेल. त्यांच्याशी बोलाचाल सुरू झाली आणि मग दगडांनी त्यांना ठेचून ठार करण्यात आले.

या प्रकाराची बातमी राजवाड्यात पोचताच दलाई लामा चिंता-क्रांत झाले. तातडीने त्यांनी चिनी लश्करी अधिकाऱ्यांना फोन करून आपल्याला छावणीची भेट रद्द करावी लागत आहे, असे कळवले. दुभाष्याने फोनवरूनच चिनी अधिकाऱ्यांनाही हा निर्णय बरोबर वाटतो असे कळवले. दलाई लामांची एक काळजी दूर झाली.

दलाई लामा चिनी छावणीत जात नाहीत ही गोष्ट दूरध्वनि-क्षेपकांवरून जमावाला निवेदन करण्यात आली —'चिन्यांनो, चालते व्हा', 'तिबेट कुणाचा — तिबेटींचा' या घोषणांनी गगन भेदून

टाकणाऱ्या जमावात निमिषार्धात शांतता पसरली. विजयाचा आनंद सर्वांच्या तोंडांवर पसरला आणि सर्व दिशांनी हर्षाच्या आरोळ्या उठल्या आणि टाळ्यांचा कडकडाट झाला.

### दोन ज्वालामुखी

दोन जागृत ज्वालामुखी पर्वतांच्यामध्ये उभे राहावे तसे दलाई लामांना वाटत होते. एका बाजूला जनतेचा जागृत झालेला एकमुखी त्वेषपूर्ण निर्धार आणि दुसऱ्या बाजूला चिन्याचे पाशवी सैनिकी सामर्थ्य; यांच्या कोंडीत दलाई लामा सापडलेले होते. जर संघर्ष उडाला तर काय होणार हे ठरलेले होते. ल्हासात रक्ताचे पाट वाहणार होते. ल्हासात हजारो निरपराध नागरिकांची कत्तल होणार होती. सर्व तिबेटवर सैनिकी दंडुका फिरू लागणार होता. काही करून लोकाना समजुतीने सांभाळून घेणे आवश्यक होते.

दलाई लामांना वाटले की छावणीभेट रद्द झाली हे कळताच लोक पांगून घरोघर जातील. परतु पांगापाग होण्याची चिन्हेच दिसेनात. जमावातील नेत्यांनी असा आग्रह धरला की — हीच भेट फक्त रद्द करून भागणार नाही. यापुढे कधीही चिनी छावणीत आपण पाऊल ठेवणार नाही, असे दलाई लामांनी जाहीर केल्याखेरीज लोक हलणार नाहीत दलाई लामांनी ही गोष्टही कबूल केली. परतु लोक हटेचनात. त्याची खात्री पटली होती की दलाई लामाचा जीव धोक्यात आहे. चिन्यांच्या मनात काहीतरी काळेबेरे आहे. त्याचे मन दलाई लामाना समजत होते. ते सांगतात–

"I could not blame them for their anxiety for my safety, because the Dalai Lama represented most of what they lived and worked for"

[लोकाना मला दोष देता येत नाही. त्याना माझ्या सुरक्षिततेचीच काळजी वाटत होती. दलाई लामा हेच त्यांचे दैवत होते. जीवन-सर्वस्व होते.]

### जनताचौक्या

दहा मार्चची सायंकाळ व रात्र उलटली. परतु निदर्शकांनी सारी रात्र राजवाड्यामोवती जागून काढली. त्यानी आता चौक्या बसवल्या. पहारेकऱ्यांची जागोजाग योजना केली. राजवाड्याभोवती वेढाच ठोकला. आतला माणूस बाहेर जाऊ शकत नव्हता. बाहेरचा आत येऊ शकत नव्हता. चिनी छावणीकडून राजवाड्याकडे येणाऱ्या रस्त्यावर लोकानी ठिकठिकाणी अडथळे रचले. झाडे आडवी घातली. दगड रचले.

चिनी छावणीतून आता हालचाल सुरू झाली. दलाई लामांच्या मंत्रिमंडळाला फोन करून कळवण्यात आले की, 'जमावाने रस्ताच आडवला आहे. वाटेतले अडथळे जमावाने हलवले नाहीत तर परिणाम वाईट होईल.'

जमावाच्या नेत्यांना हा निरोप पोचवण्यात आला. मंत्र्यांनी त्यांचे मन वळवण्याची पराकाष्ठा केली. परतु ऐकेनात. त्यांचा असा ग्रह झाला की ज्या अर्थी चिन्यांच्या डोळ्यात राजवाड्याकडे येणाऱ्या रस्त्यावरील अडथळेच सलत आहेत, त्या अर्थी दलाई लामाचा विश्वासघात करण्याचा त्यांचा विचार उघड दिसतो.

नगवो चिनी छावणीत आश्रयाला गेले ही गोष्ट जमावाला ठाऊक होती. नेत्यानी सांगितले, नगवो जर चिनी सैनिकांच्या आधारावर सुरक्षित राहू शकतो तर दलाई लामांची सुरक्षितता पाहण्यासाठी आम्हालाही योग्य ते उपाय योजण्याचा अधिकारच आहे.

जमावापैकी ६०–७० नेत्यांची बैठक मग राजवाड्यात घेण्यात आली. दलाई लामांनी त्यांना सांगितले–

"चिनी अधिकाऱ्यानी छावणीभेटीचे निमंत्रण स्वीकारण्याची माझ्यावर सक्ती केलेली नव्हती. माझी आधी संमती घेण्यात आली होती. मला स्वतःला चिनी अधिकाऱ्यापासून कसलीही भीती वाटत नाही आणि लोकांनी आततायीपणाने वागून परिस्थिती चिघळवू नये, कारण जनतेचे त्यात हित नाही. सर्वांनी शांत राहावे."

दलाई लामाचे म्हणणे लोकांनी ऐकून घेतले. परिणाम इतकाच झाला की नॉरब्युलिंग्का राजवाड्यातील निदर्शने थांबवण्यात आली. घोषणा रद्द झाल्या. परंतु जनताचौक्या व पहारे मात्र कायम करण्यात आले.

### कोंडी पूर्ण झाली

दोन दिवस असेच तंग वातावरणात गेले. दि. १६ ला चिनी जनरलचे पत्र व सोबत नगवो याची चिठ्ठी आली. या चिठ्ठीत नगवो यानी दलाई लामाना असे कळवले होते, की लोकाच्या मदतीवर अवलबून राहून दलाई लामांनी राजवाड्यातून निसटण्याचा प्रयत्न करू नये. कारण सर्व वाटा चिन्यानी रोखलेल्या आहेत आणि जर यदाकदाचित् पळून जाण्यात त्यांना यश आलेच तरी पुनः ल्हासात परतणे अशक्य होईल. नॉरब्युलिंग्का राजवाड्यात दलाई लामाचे निवासस्थान नेमके कोणते त्याची माहिती नगवोने विचारली होती. यावरून राजवाड्यावर तोफा डागण्याचा विचार चिनी करीत होते, ही गोष्ट दलाई लामाच्या ध्यानात आली. दहशत निर्माण करण्यासाठी चिन्याना नॉरब्युलिंग्का उध्वस्त करावयाचा होता. परंतु यात दलाई लामांचा बळी पडू नये अशी मात्र त्यांची इच्छा होती. नगवोने पुढे कळवले होते, की जर लोकाचा वेढा उठत नसेल तर दलाई लामांनी निसटून चिनी छावणीत आश्रयला यावे हे उत्तम.

याला दलाई लामानी उत्तर दिले—

"शक्य होताच मी छावणीत येतो."

खरे पाहता दलाई लामाना छावणीत जाण्याची इच्छा नव्हती—

"I had no intention of going, but I hoped this promise would persuade him to delay the order to attack and that we could get the people away in time. That was last of the letters I wrote to him."

[माझी छावणीत जाण्याची इच्छा नव्हतीच. परंतु असे कळवले की राजवाड्यावर होणारा हल्ला काही काळ थांबवून धरता येईल व या काळात लोकाना समजूत घालून घरोघर पाठवण्यात मला यश येईल अशी मला आशा होती. मी चिनी जनरलला लिहिलेले हेच अखेरचे पत्र.]

परिस्थिती किती चमत्कारिक होती पाहा! चिन्यांना वाटत होते, दलाई लामांना आपल्या आश्रयाला यायचे आहे. परंतु बडखोर ल्हासावासी त्यांना येऊ देत नाहीत. लोकांना वाटत होते, दलाई लामांची इच्छा नसताना त्याना छावणीत पळवून नेऊन दगाफटका करण्याचा चिन्याचा विचार आहे. दलाई लामाची इच्छा एवढीच होती, की संघर्ष टळावा; चिन्यांच्या सैनिकी पाशवी सत्तेपुढे निरपराध स्त्रीपुरुषाची कत्तल उडू नये. याकरिता ते एकीकडे लोकाना

कधीही छावणीत न जाण्याचे आश्वासन देत होते व दुसरीकडे चिन्यांना 'सधी मिळताच येतो,' असा निरोप धाडीत होते.

दलाई लामाच्या या अखेरच्या पत्राचा चिनी सरकारने प्रचारासाठी भरपूर उपयोग केला. *जगाला असे भासवले की दलाई* लामाच्या सुरक्षिततेसाठीच आम्ही राजवाडा जमीनदोस्त केला. बंडखोरांना दलाई लामाचा कधीच पाठिंवा नव्हता. बंडखोरांच्या आततायी प्रयत्नांना–हिंसात्मक बंडखोरीला दलाई लामाची संमति नसली तरी त्यांच्या देशप्रेमाबद्दल आणि स्वातंत्र्याच्या इर्षेबद्दल त्यांना कधीच सशय नव्हता.

सोळा मार्चला सकाळी अशी बातमी राजवाड्यात आली, की आसपासच्या टेकड्यांवरून राजवाड्यावर तोफा बदुका डागण्याच्या दृष्टीने चिन्यांचे शस्त्रसज्ज दल मान्याच्या जागा घेऊ लागते आहे. आता कधी गोळाबारी सुरू होईल याची शाश्वती नव्हती. १६ मार्चची सायंकाळ व रात्र अत्यंत गंभीर परिस्थितीत पार पडली.

### कुंड धडाडले

सकाळ झाली. १७ मार्च १९५९ ची सकाळ. मंत्रिमंडळाने तातडीची बैठक घेतली. नगबो यांना चिठी गेली, की लोक कधी काय करतील याचा आता नेम नाही, परंतु अजून त्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. दलाई लामा सधी मिळताच चिनी छावणीच्या आश्रयाला येत आहेत. या दृष्टीने नगबो हे काय मदत करू शकतील?

सायकाळी चारपर्यंत चिनी छावणीतून कसलाही प्रतिसाद आला नाही. राजवाडा चिंतामग्न असतानाच तोफांचा आवाज झाला. प्रचंड आवाजाने *आसमत हादरले व दोन बॉम्बगोळे राजवाड्याच्या* उत्तरेच्या दरवाजावर येऊन आदळले.

सर्वत्र हाहाकार उडाला. राजवाड्याभोवती जमलेल्या जनतेत सशस्त्र खपा होते. अमडो होते. मिळेल त्या शस्त्रानिशी ल्हासाचा नागरिक दलाई लामाच्या सरक्षणासाठी उभा ठाकला होता. चिन्यांनी फैरी झाडून आव्हान दिले होते. मृत्युघटा वाजू लागली होती. जर चिन्याच्या गोळीला दलाई लामा मृत्युमुखी पडले तर तिबेटचे अस्तित्वच संपले अशी सगळ्यांची भावना झाली असती. तिबेट म्हणजे दलाई लामा. दलाई लामा आणि तिबेट हे दोन शब्द वेगळेवेगळे राहूच शकत नाहीत. म्हणूनच राजवाड्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या मनात व राजवाड्यामोवतीच्या जनसंमर्दात एकच विचार आता मुख्यत्वेकरून घोळत होता.––'दलाई लामांचे प्राण वाचवले पाहिजेत!' अशा प्रसंगी राजवाड्यातून पळून जाण्याचा निर्णय आपण का घेतला हे सांगताना दलाई लामा लिहितात—

"पळून जाण जवळजवळ अशक्य होत· नगबो यांनी ही गोष्ट अशक्य असल्याच कळवल होतच. समजा मी ल्हासातून निसटलोच तर जाणार होतो कुठ? आसरा कुठ होता? जर मी निघून गेलो तर – तर चिनी आपल्या पवित्र शहराची राखरांगोळी करून, लोकांची कत्तल तर उडवणार नाहीत? की कदाचित मी निघून *गेल्याच कळताच* लोक पांगून घरोघर जातील व असंख्य जीवाची हत्या टळेल? अशा अनेक अनुत्तरित प्रश्नांनी आमची मने व्यग्र झाली होती. जर मी अधिक काळ ल्हासात राहिलो तर फक्त माझ्याच लोकाच्या दुःखाला मी कारण होण्याची शक्यता होती. मी निसटून जाण्याच ठरवल."

"माझ्याबरोबर माझ्या मन्त्रिमडळातील चार सभासद, माझे शिक्षक, माझे खाजगी अधिकारी, माझे सरक्षक व माझे इतर अगदी जवळचे आप्तेष्ट इतकी मंडळी होती. माझे दोन बधू अमेरिकेत होते व एक भाऊ व बहीण *भारतात होती. जीवनाच्या अत्यावश्यक* गोष्टी सोडल्या तर दुसर काहीच बरोबर घेता येण शक्य नव्हत. पहाटेपूर्वी आम्हाला ल्हासापासून बरच दूर जाण भाग होत."

"आम्ही लहान लहान तुकड्या करून जायच ठरवल. प्रथम नदी ओलाडून जायला हव होत. नॉरब्युलिंग्का व चिनी कॅंप हे दोन्ही नदीच्या उत्तर अगाला होते. म्हणून दक्षिणेकडून पळून जायच आम्ही ठरवल."

"माझी आई, भाऊ व बहीण हे पहिल्या तुकडीत होते. त्यांनी खपा लोकाचा पोषाख केला. मी एकटा व माझा सरक्षक आम्ही नतरच्या तुकडीत होतो व माझे शिक्षक वगैरे मडळी शेवटच्या तुकडीत होती."

### प्रयाणाच्या क्षणी

राजवाड्याबाहेर जमलेल्या जमावाला अर्थातच दलाई लामा निघून जात आहेत हे कळणे श्रेयस्कर नव्हते. निघण्यापूर्वी दलाई लामानी बंडखोर जनतानेत्यांना दिलेला आदेश एका लखोट्यात बद करण्यात आला. दलाई लामा निसटल्यानतर हा लखोटा त्या पुढाऱ्यांना द्यावा असे ठरले होते. त्या लखोट्यात दलाई लामानी लिहिले होते—

"तुमच्यावर चिन्यांचा हल्ला झाल्याखेरीज गोळ्या झाडू नका. मी निघून जात आहे व पुढील आदेश धोक्याच्या मर्यादेपलीकडे जाताच मी देईन."

पहिल्या तुकडीत दलाई लामांची माता व धाकटी बहीण, भाऊ यानी राजवाडा सोडला. दुसऱ्या तुकडीत दलाई लामा निघणार होते. इतर मडळी पाठोपाठ येणार होती. प्रयाणाच्या क्षणाचे वर्णन दलाई *लामानी केले आहे ते त्यांच्याच शब्दात ऐकण्यासारखे आहे*—

"सैनिकाचा वेष आणि टोपी माझ्यासाठी ठेवण्यात आली होती. साडेनऊचा सुमार असावा. मी माझा धर्मगुरूचा पोशाख उतरवला आणि ते विचित्र कपडे अगावर चढवून माझ्या नेहमीच्या खोलीत प्रार्थना करण्याकरिता गेलो. नेहमीच्या उच्चासनावर बसून मी बुद्धदेवाच्या शिकवणुकीचे पुस्तक समोर उघडले......पुस्तक मिटून मी त्या खोलीचा निरोप घेऊन दिवे घालवले. मी बाहेर पडलो; तेव्हा माझ्या मनातील सर्व भावना निपटून निघाल्या होत्या. मन कोरडे, शुष्क झाले होते. जमिनीवर पडणाऱ्या माझ्या पावलाचा आवाज मला जाणवत होता आणि घड्याळाची टिकटिकच काय ती शांततेचा भंग करीत होती."

"माझ्या घराच्या दरवाजात एकच सैनिक माझी वाट पाहत होता व दुसरा दरवाजाबाहेर उभा होता. त्यांच्यापैकी एकाची बदूक मी गळ्यात अडकवताच माझा सैनिकाचा वेष पूर्ण झाला. ते दोघे सैनिक माझ्या पाठोपाठ चालू लागले. आम्ही बाहेर पडलो. बागेतून चालत जाताना माझ्या जीवनातील असंख्य सुखद आठवणी मनात गर्दी करू लागल्या होत्या."

"बागेच्या तोंडाजवळील दरवाजाशी पोचताच माझा मेव्हणा कुसुग डेपों याने दोघाही सैनिकाना पांगून चालण्यास सांगितले. मी व

डेपाँ चालू लागलो. पुढच्या दुसऱ्या दरवाजाशी माझ्या सरक्षक दलातील दोघे प्रमुख आमच्यापुढे चालू लागले. आमच्यामागून पागून चाललेले दोघे सैनिक वाटचाल करीत होते. मी चश्मा काढला होता व त्यामुळे माझा चेहरा ओळखणे कुणालाही आणखी कठीणच जाणार होते. "

" आम्ही बाहेर पडताच बागेचा दरवाजा बद झाला. एका अधिकाऱ्याने पुढे होऊन आपण तपासणीसाठी जात आहोत असे सांगून आमची सर्वांची त्याचे सहाय्यक म्हणून वाट मोकळी करून घेतली. राजवाड्याच्या दरवानानी त्या अधिकाऱ्याला सलाम ठोकले. दरवाजाचे मले मोठे कुलूप उघडण्यात आले......"

**पुढे काय ?**

दलाई लामा अखेर निसटले. आपल्या लोकाना न सागता, चिन्याना सुगावा लागू न देता ते नॉरब्युलिंग्का राजवाड्याबाहेर तर पडले...

दलाई लामानी जेव्हा प्रथम नॉरब्युलिंग्का सोडले तेव्हा सरळ भारतात जाण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. तिबेटमध्येच कोठेतरी राहावे अशी त्यांची इच्छा होती. भारताला जाणाऱ्या नेहमीच्या मार्गाने जाणे अर्थातच अशक्य होते. कारण चिनी सैन्याने ते पुरते वेढलेले होते. त्यामुळे ल्हासाच्या दक्षिणेकडून सर्वजण निघाले. त्या बाजूला अभेद्य अशा पर्वताच्या उंचच्या उंच रांगा होत्या व तेथे चिन्याना शिरकाव करणे शक्य झाले नव्हते. गनिमी कावा खेळणाऱ्या खंपा सैनिकांचा तो प्रदेश म्हणजे बालेकिल्लाच होता. भूतान व भारत यांकडे नेणाऱ्या अनेक बारीकसारीक वाटा या प्रदेशात होत्या. तिबेटी व भूतानी व्यापाऱ्यानी आज शतकानुशतके त्याचा वापर केला होता. त्यामुळे जर वेळ आलीच तर, जरा दिशा बदलून चिन्याच्या हातावर तुरी देणे सोपे जाणार होते.

**राजवाडा जमीनदोस्त झाला**

ल्हासा सोडल्यानंतर काही दिवसांनंतर एक भयानक बातमी दलाई लामाना ऐकावी लागली.

२० मार्चला पहाटे दोन वाजल्यापासूनच चिन्यांनी तोफा डागण्यास सुरुवात केली. (म्हणजे ही घटना दलाई लामांनी ल्हासा सोडल्यानतर ४८ तासाच्या आत घडली.) त्या वेळी चिन्याना दलाई लामा निसटले आहेत हे समजलेले नव्हते. सबंध दिवसभर नॉरब्युलिंग्कावर तोफाचा भडिमार केल्यावर त्यानी आपला तोफखाना ल्हासा शहर, पोटाला राजवाडा व इतर प्रर्थनागृहें याच्याकडे वळवला. हजारो लोक यात मारले गेले. निश्चित आकडा या बाबतीत सांगणे शक्य नाही. नॉरब्युलिंग्कामधील प्रमुख इमारती पार उध्वस्त झाल्या. खुद्द शहरात घरे पाडून टाकण्यात आली; काहीना आगी लावण्यात आल्या; मुख्य देवळे व इतर लहानसहान देवळेमुद्धा पार निकालात निघाली. शाळा, धर्ममठ काही काही यातून सुटले नाही. नॉरब्युलिंग्काला एक भकास, भयानक असे स्वरूप प्राप्त झाले. मग चिनी त्यात घुसले. त्या दिवशी संध्याकाळी चिन्यानी दलाई लामाना शोधण्यासाठी प्रत्येक प्रेत न प्रेत धुडाळले. परतु छावा निसटला होता. सुभाषचंद्राच्या भारतातून झालेल्या प्रयाणाइतकेच या प्रयाणाला पुढे इतिहासात महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल.

चिन्यानी हे असे का केले ? त्याला दलाई लामांच्या म्हणण्याप्रमाणे एकच कारण आहे आणि ते म्हणजे आठ वर्षेपर्यंत तिबेटवर आक्रमण करूनसुद्धा बहुजनसमाज चिनी सत्ता मानायला राजी नव्हता, हे चिन्यांना पूर्णपणे कळून चुकले व म्हणूनच त्यानी आपल्या पाशवी लश्करी सामर्थ्याच्या बळावर भावड्या तिबेटी जनतेला नमवून, आपले वर्चस्व मान्य करायला लावले.

दलाई लामानी तिबेट सोडले तेव्हा, भारतात येण्याचा विचार पक्का झालेला नव्हता. या वेळी त्याच्या मनाची स्थिती दोलायमान होती. ते सांगतात--

" त्या सर्व परिस्थितीचा शातपणे विचार केल्यावर मला अजूनही अस वाटत की तिबेटमध्ये राहून मी माझ्या प्रजेसाठी काहीच करू शकलो नसतो. भारतात येण्याशिवाय दुसरा मार्गच माझ्यापुढ नव्हता. भारतात राहूनच माझ्या लोकांची चिनी सत्तेपासून मुक्तता होण्याची आशा मी जिवंत ठेवू शकलो असतो. पण आपली प्रिय मायभूमी सोडण्याची कल्पनाच मला सहन करवत नव्हती. म्हणूनच डोझ् (Lhuntse Dzong) इथ आपल एक सरकार स्थापाव असा विचार माझ्या मनात आला. परंतु चिनी तिथही आमच्यावर हल्ला करण्यास सज्ज आहेत अशा बातम्या आमच्या कानांवर आल्या व आम्ही डोझ सोडले. मी पर्वतात कुठेही लपण्याचा प्रयत्न केला असता तरी मला हुडकून काढल असत व माझ संरक्षण करण्यासाठी पुढ होणाऱ्या शूर वीराचे बळी पडले असते. हे सर्व टाळण्यासाठी मी एक निर्णय घेतला–भारत सरकारकडे आश्रय मागायचा–"

दलाई लामानी १७ मार्च १९५९ ला रात्री १० वाजता भारताच्या दिशेने वाटचाल सुरू केली. भारताच्या सरहद्दीपर्यंत पोचायला त्याना २९ मार्च उजाडला. मध्यंतरीच्या काळात दलाई लामानी रीतसर भारताकडे आश्रय मागितला व भारताने आश्रयार्थी म्हणून त्याचे स्वागत न करता, आईने हरवलेल्या मुलाला कडकडून भेटावे अशा प्रेमाने त्याचे स्वागत केले. दि. ३–४–५९ रोजी पंडितजीनी लोकसभेत सागितले–

" मला दलाई लामाचा ठावठिकाणा दोन दिवसांपूर्वीच कळलेला होता. परंतु काल (२ एप्रिल) मी यासबंधी काही सागण्यास नकार दिला याच कारण मला सपूर्ण माहिती एकदमच सभासदाना सांगावयाची होती. एक एप्रिलला शिलांगहून आम्हाला सदेश आला, की २९ मार्चला दलाई लामा नेफामधील चेगेटंग (Chengetang) या आपल्या चौकीपर्यंत आलेले आहेत. त्याना भारतात आश्रय हवा असून, ते भारतीय सरहद्दीवर दि. ३० ला पोचतील. सदेशापाठोपाठ दि. १–४–६३ काल सायंकाळी दुसरा सदेश मिळाला, की दि. ३१–३–५९ ला सायकाळी दलाई लामानी भारताच्या हद्दीत प्रवेश केला आहे..." (प्रचड टाळ्या.)

**श्री. आप्पा पंतांचा हात ?**

दलाई लामाच्या या यशस्वी पलायनात भारताने त्याना काय मदत केली, याचा तपशील उजेडात यावयास अजून बराच कालावधी लागेल. परतु लंडनच्या 'डेली टेलिग्राफ' पत्रात खालील तर्क प्रसिद्ध झालेला आहे.

" The essentials of the plot seem to have been planned by Mr. Appa Pant, the Indian Political Agent in Gangtok who apparently made private contact with the Dalai Lama: "



[ दलाई लामांच्या प्रयाणाचा सर्व बेत गंगटोक येथील भारतीय वकिलातीचे श्री. आप्पासाहेब पंत यांनी रचला असे समजते. त्यांनी दलाई लामांशी गुप्तपणे संबंध प्रस्थापित केला होता. ]

या वृत्ताचा भारताच्या परराष्ट्र खात्याने घाईघाईने इन्कार केलेला असला, तरी हा इन्कार केवळ चीनशी राजकीय संबंध टिकविण्यासाठीच केला गेला असावा अशी शक्यता आहे.

कुणाच्या कोंबडीने का होईना, अखेर उजाडले व दलाई लामा भारतात सुखरूप आले. दि. २० मार्चला स्टेट्समन पत्राच्या वातमीदाराने दार्जिलिंगहून कळविले–


" दि. १९ मार्चला ल्हासा शहरात नॉरब्युलिंग्का राजवाडयाभोवती जमलेल्या १०००० तिबेटी नागरिकांना चिनी सैन्याने बाहेरून वेढा दिला. चिनी सैनिक माऱ्याची ठिकाणे साधून सुरक्षित स्थळी होते. सकाळी ७ वाजता राजवाडयावर बॉम्बसचा व गोळयांचा धडाका उडू लागला. उडालेल्या गोंधळात असंख्य माणसे ठार झाली. राजवाडयांतून बंदुकीने प्रतिसादही सुरू झाला. पेटलेल्या जमावाने प्रतिकार सुरू केला. "

दलाई लामांच्या परिवारात तूर्त असलेल्या एका निकटवर्तियाने ल्हासातील हल्ल्याची चक्षुर्वैसत्यं हकीकत तेझपूर येथे सांगितली. त्यानुसार सुमारे तीन हजार तिबेटी नागरिक दि. १९ मार्च ते २२ मार्चपर्यंत ठार झाले. दि. २२ मार्च रोजी पेकिंग रेडिओवरून सांगण्यात आले.

" The Chinese army stationed in Tibet acting on orders to suppress the rebellion completely smashed the rebel tribes and bandits in the city of Lhasa on March 22 nd. "

[ तिबेटमध्ये ठेवलेल्या चिनी सैन्याने आज्ञेप्रमाणे जमाती, टोळ्या व गुन्हेगार यांनी ल्हासात उभे केलेले बंड दि. २२ मार्च रोजी पुरते मोडून काढले. ]

लोकांचे बंड यथावकाश चिरडले गेले यात चिन्यांना भूषण वाटत असल्यास त्यांची कुणीही कीव करील. परंतु चिन्यांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या त्या दलाई लामा निसटले हे कळताच ! पंडित नेहरूंनी दलाई लामांना केलेल्या स्वागताच्या तारेत म्हटले होते–



" My colleagues and I welcome you and send you greetings on your safe arrival in India. "

**लढाई हरलो पण युद्ध संपल नाही ....**

तुम्ही सुखरूप निसटून आलात–आम्ही तुमच स्वागत करतो–! पंडितजींच्या या स्वागतात साऱ्या लोकसभेने टाळयांचा कडकडाट करून साथ दिली. तीस कोटी भारतियांनी जणू चिन्यांना बजावले–

' तिबेटची लढाई तुम्ही आज जिंकली असली तरी युद्ध अजून संपलेल नाही. '

लढाई कोण हरत नाही ? आग्ऱ्याहून जेव्हा शिवाजीराजा निसटला तेव्हाच भविष्यांत दिल्लीच्या तक्तावर भाऊसाहेबांचा घण उचलला गेला. नॉर्मंडीच्या लढाईत फ्रान्सने पराभव पत्करला. फ्रान्स नेस्तनाबूत झाले परंतु डि गॉल मिळेल त्या सहकाऱ्यांनिशी निसटला; आणि फ्रान्सचे युद्ध चालूच राहिले. जगाच्या इतिहासात अशा घटना सतत घडत असतात. ज्याला युद्ध जिंकावयाचे असते त्यांना लढाया काही वेळा हराव्या लागतात. ज्या वेळी लंडन शहर जर्मन तोफांनी आणि बॉंब वर्षावाने बेचिराख होत होते तेव्हा चर्चिलने बजावले होते ––

" उद्या जर्मन सेनांनी इंग्लंडवर कबजा केला तरी युद्ध संपणार नाही. अमेरिकेच्या भूमीवरून युद्ध चालूच राहील. "

युद्ध चालू ठेवणे याला महत्त्व असते कारण एकदा माणसाच्या जिद्दीनेच हार खाऊन तडजोड पत्करली की मग उरते ती स्मशानशांतता ! ज्यांना अशी दळभद्री शांतता केवळ युद्धाचा पर्याय म्हणून पत्करावीशी वाटते त्यांचा भविष्यकाळ संपलेलाच असतो. सभोवार घनदाट अंधकार पसरलेला असतानाच स्वप्ने उशाशी जपावी लागतात. अंध अंधारी बुडाले अशी हाकाटी चहू बाजूंनी उठत असताना जो स्वप्ने पाहू शकतो आणि ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मिळेल त्या साधनांनिशी प्रयत्नशील राहतो, त्याच्या जीवनात पहाट खुलल्याखेरीज राहत नाही.

वनवास वा बंदिवास कुणाही सत्यवाद्याला चुकलेला नाही. अन्यायाचा प्रतिकार हे व्रत म्हणून एकदा अंगीकारताच त्यानंतर अज्ञातवास वा बंदिवास चुकवताच येत नाही. रामचंद्रांना हा चुकला नाही. हरिश्चंद्राला हा चुकला नाही. पांडवांना हा चुकला नाही. जगातील

यच्चयावत देशभक्ताचा तर तो बहुश: जन्माचा सोबती ठरला आहे. मग दलाई लामाच्या नशिबी तो आज आला याचा बाऊ करण्यात काय अर्थ ?

समग्र भारतीय जनतेची अशी ज्वलन्त निष्ठा आहे आणि जगातल्या सर्व स्वातंत्र्यप्रेमी जनतेचा असाच विश्वास आहे, की दहा वर्षांनी पधरा वर्षांनी दलाई लामा परत ल्हासात तिबेटी जनतेचे एकमेव नेते म्हणून प्रवेश केल्याशिवाय तिबेटचे युद्ध सपणार नाही. दलाई लामाच्या भारतातील आगमनानंतर जगातील यच्चयावत् स्वातत्र्यप्रेमी देशातून भारतापुढे एकच प्रश्न फेकला गेला —

'चिन्यानी केलेला तिबेटचा अन्यायी कवजा ही शाततेची किंमत म्हणून पडित नेहरू मानणार आहेत काय ?'

वस्तुतः हा प्रश्नच विचारण्याची आवश्यकता आता उरलेली नाही. ज्या क्षणी पडित नेहरूनी दलाई लामा याना भारतात आश्रय दिला त्याच क्षणी याचे नाही असे उत्तर स्पष्ट झाले आहे. दि. १९ एप्रिलच्या Combat या पॅरिसमधून प्रसिद्ध होणाऱ्या लोकप्रिय पत्राने लिहिले होते —

"In granting asylum to the Dalai Lama in flight from the Chinese communists — Mr. Nehru has ended the honeymoon which India and Red China were enjoying,"

[ चिनी कम्युनिस्टाच्या भीतीने परागंदा झालेल्या दलाई लामांना भारतात आश्रय देऊन पडित नेहरूनी चीन व भारत याचा मधुचंद्र आता संपुष्टात आणला आहे. ]

'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राने २ एप्रिलच्या अंकात तिबेट-बाबत नेहरूनी लश्करी हालचाल न केल्याबद्दल ज्यानी त्याना दोष दिला, त्यांना मोठा मार्मिक प्रश्न विचारला आहे. ते पत्र लिहिते —

"This creates a most embarrassing situation for Mr. Nehru. Actually he can do little or nothing to save Tibet. India lacks the military power to intervene. It would be foolish for Americans and Western Europeans, who found it impracticable to go to the aid of Hungary, to taunt India for its inactivity in the face of a still hopeless situation in Tibet."

[पडित नेहरूची या प्रसगी मोठी चमत्कारिक स्थिती झाली आहे. प्रत्यक्षात तिबेटला वाचवण्यासाठी ते काहीही करू शकले नाहीत. भारताजवळ तिबेटला वाचविण्यासाठी लागणारे लश्करी सामर्थ्य नाही. जेव्हा हंगेरीवर असे प्राणसकट ओढवले तेव्हा अमेरिकेने वा पश्चिम युरोपीय राष्ट्रानी काय केले ? त्याना जर काहीही करणे त्या वेळी अशक्य झाले तर आज पं. नेहरूना टोमणे मारण्याचा त्याना अधिकार नाही. तिबेटची परिस्थिती हंगेरीपेक्षाही दयनीय होती ]

## घटिंगणापुढे लोटांगणे

स्वातत्र्यानंतर गेली पंधरा वर्षे आम्ही भारताच्या संरक्षणव्यवस्थेकडे दुर्लक्ष केले याची कबुली नेहरू सरकारने आता इतक्या वेळा दिली आहे की मेलेल्यांना नुसते मारीत राहण्यात हशील नाही. राष्ट्राच्या इतिहासात अशा चुका राज्यकर्त्यांच्या हातून होतात. ही चूक यापुढे दुरुस्त व्हावी. हे अशक्य नाही कारण एकदा भ्रान्त व उदात्त तत्त्वाची धुंदी उतरली की पुरुषार्थ जागा होण्यास फारसा वेळ लागत नाही. म्हणूनच 'टाईम् अॅण्ड टाईड्' या लंडनमधील पत्राने ४ एप्रिल १९५९ च्या अंकात भारत सरकारला ठणकावले आहे —

"There can be honour in neutrality but people who truckle to bullies cannot hope to lead their fellowmen. On the contrary, it is all too likely that those who today ignore the cries of oppression will to morrow themselves be the victims of the evil forces which they sought to ignore."

[ तटस्थतादेखील सन्मानाने पाळता येते. परंतु जे घटिंगणापुढे नमतात त्यानी लोकाचे नेतृत्व करण्याची आशा बाळगू नये. उलट अशीच शक्यता अधिक असते की जे आज विध्वसकानी निर्माण केलेल्या आर्त किंकाळ्याकडे दुर्लक्ष करतील त्याचा उद्या त्याच विध्वंसक शक्तीच्या भक्ष्यस्थानी पडण्याचा प्रसग येईल. ]

गेल्या लेखाकात उद्धृत केलेल्या कै. डॉ. राजेंद्रप्रसाद याच्या कबुलीप्रमाणे 'तिबेटबाबत आमच्या हातून पाप घडले. ही गोष्ट तर खरीच. परंतु या पापाचे प्रायश्चित्त घेण्याची वेळ येऊन ठेपण्याआधीच भारताने आणखी एक पाप केलेले आहे.

'तिबेटमध्ये मानवी स्वातत्र्यावर आघात झाला आहे.' अशा अर्थाचा ठराव यूनोमध्ये दि. २१ ऑक्टोबरला आयर्लंड व मलाया या दोन देशांनी माडला. या ठरावावर जे मतदान झाले त्या वेळी भारताने जे दुसरे पाप केले त्याबद्दल मात्र जनतेने 'या पापाचे धनी श्री. कृष्णमेनन यांना क्षमा केली नाही. ठरावाला ४५ मते अनुकूल पडली व नऊ मते विरुद्ध पडली. पाकिस्तानी राज्यकर्त्यांविषयी काही चांगले बोलण्याचा प्रसग सहसा येत नाही. परंतु या ठरावाला पाकिस्तानने अनुकूल मत दिले व भारत मेनन लाईनवर तटस्थ राहिला' भारताने तिबेटबाबत पाळलेली ही तटस्थता काय सन्माननीयतेचे लक्षण होते ? चिनी कम्युनिस्ट राज्यकर्त्यांच्या खुशामतीकरिता झालेले हे अखेरचे कृष्णकारस्थाने !! कारण आता तिबेटबाबत पुन: जेव्हा कधी युनोमध्ये प्रश्न उपस्थित होईल, तेव्हा या कारस्थानी कृष्ण मेननना तिथे खुर्ची असणार नाही, याची व्यवस्था भारतीय जनता करील यात संदेह नाही.

## स्वतंत्र तिबेट

दलाई लामा भारतात काही यात्रेला आलेले नाहीत. श्री. जयप्रकाश नारायण यानी म्हटलेले आहे —

"The Dalai Lama has not come to India for a change or to preach Buddhism. He has come here to fight for his country and his people." — (Times of India 10th July 59.)

[ हवापालट करण्यासाठी किंवा बुद्धधर्मावर प्रवचने करण्याकरिता दलाई लामा भारतात आलेले नाहीत. आपल्या देशाकरिता आणि लोकाकरिता लढण्यासाठीच ते इथे आलेले आहेत. ]

श्री. जयप्रकाश नारायण यानी जे उघडपणे सांगितले तेच भारतीय जनता मानते. जग मानते. राज्यारूढ व्यक्तीनी याचा उच्चार करण्याची वेळ येईल तेव्हा तोही केला जाईल. आजच त्यानी तो करावा असा कुणाचा अट्टाहास असण्याचेही कारण नाही. तिबेटवर अधिसत्ता ठेवण्याची लालसा भारताला कधीच नव्हती आणि आजही नाही.



परंतु तिबेटवर अत्याचार करण्याचा अधिकार चीनलाही पोचत नाही. पुराणात लंकादहन घडले ते लंकेवर राज्य करण्याच्या इच्छेने नाही. रावणवधानंतर बिभीषणावर राज्य सोपवून माघारी येण्याची भारतीय शासनाची परंपरा आहे. भारताच्या या परंपरेवर बुद्धावतार दलाई लामांचा विश्वास नसता तर त्यांनी भारताकडे धाव घेतली नसती. त्यांचा विश्वासघात भारत करणार नाही. आमचे शासन आता सावध झालेले आहे. लष्करी सामर्थ्यावरच राष्ट्रे उभी राहतात हा साक्षात्कार आता राज्यकर्त्यांना झाला आहे. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' हा मंत्र जपत भारताच्या सामर्थ्यावर विसंबलेल्या दलाई लामांना आज भारताची होणारी शस्त्रसाधना पाहून केवढा दिलासा वाटत असेल? भारताच्या पायांतील पारतंत्र्याची बेडी निखळता क्षणीच अनेक साम्राज्यवादी शक्तींनी आशिया खंडातून काढता पाय घेतला. ज्या वेळी भारताचा पराक्रमी बाहू 'आर्तजाणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।' या निश्चयाने वर उचलला जाईल, त्याच क्षणी तिबेटचे स्वातंत्र्यही सिद्ध झाल्याखेरीज राहणार नाही. कारण स्वातंत्र्याचे युद्ध कधी अर्ध्यावर संपत नाही--

Freedom's battle once begun  
Bequeath'd by bleeding sire to son  
Though battled oft, is ever won--

• • •


# माणूस १९६३

## दिवाळी अंकातील साहित्यिक - कथाकार - कवि

ब. मो. पुरंदरे, श्रीपाद काळे, दि. बा. मोकाशी, आनंद यादव, जी. ए. कुलकर्णी, भीमराव कुलकर्णी, डॉ. रंगनाथ देशपांडे, स्नेहलता दसनूरकर, श्री. ज. जोशी, मधुकर परांजपे, मधु मंगेश कर्णिक, सुरेश भट, शिरीष पै, मनमोहन नातू, शं. ना. नवरे, वि. ग. कानिटकर

**नामावली संपली नाही. आणखीही काही मातब्बर मंडळी बाकी आहेत**

*For :* *: Phone* 56110

**Laboratory Chemicals of High Standards & Industrial Chemicals**

such as

Boiler Composition for Feed Water, Derustol (Rust removing agent) etc.

and Scientific apparatus of all types

*Please Contact—*

**M/s. SWASTIK LABORATORY & INDUSTRIAL CHEMICALS (P) Ltd.**

176/1, Sadashiv Peth, Poona-2

## मराठी साहित्यमंदिराचा देदीप्यमान कळस !

पृष्ठे सुमारे ११०० ] **तुकाराम-गाथा** [ किंमत रु. ८=००

तुकोबाची अभंगवाणी म्हणजे मराठीत प्रकट झालेली साक्षात् वेदवाणीच ! सामान्य संसारी जनापासून तो साहित्याची अभिरुचि असलेल्या रसिकांपर्यंत सर्वांनाच तुकोबाच्या रसाळ, प्रासादिक कवित्वाने प्रभावित केले आहे. तुकारामाचा एकएक अभंग म्हणजे संसारातील त्रिविध तापाने पोळलेल्या अंतःकरणात नवचैतन्य प्रस्फुरित करणारी संजीवनी मात्राच. मराठी साहित्याला ललामभूत होणाऱ्या या अभिजात संत कवीच्या समग्र अभंगाची गाथा अगदी नव्या व आकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचं कार्य आम्ही हाती घेतल आहे.

प्रस्तुत गाथा सिंगल डेमी ⅛ आकारात, पांढऱ्या कागदावर छापली जात असून १४ पॉइंट ब्लॅक टाईप वापरला आहे. तुकारामाची व त्याच्या जीवनाशी निगडित असलेल्या निरनिराळ्या प्रसंगाची ६ रंगीत छायाचित्रे आत समाविष्ट केली आहेत. तदुपरान्त अभंगाच्या विषयानुसार वर्गवारी, शेवटी कठीण शब्दाचे अर्थ, अभंगाच्या आद्याक्षरानुसार त्याचा अनुक्रम वगैरे गोष्टीमुळे ही गाथा आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व गाथाहून आगळी नि वैशिष्ट्यपूर्ण ठरेल.

### सवलतीची किंमत

प्रकाशनानंतर या मालेची किंमत रु. ८=०० राहील. तथापि ३० सप्टेंबरपर्यंत मुंबईतील ग्राहकास ५ रुपयास व मुंबईबाहेरील ग्राहकांना पोस्टेजसह ६ रुपयास मिळेल. विक्रेत्यानाही ह्या सवलतीचा फायदा घेता येईल. कार्यालयाच्या पत्त्यावर मनिऑर्डर अगर पोस्टल ऑर्डर पाठवून आपली प्रत आजच राखून ठेवा.

## नवोदित लेखकांस अत्यंत उपयुक्त ग्रंथ

पृ. १८८+१२ ] **ललित लेखनाचे तंत्र** [ किंमत रु. ४=५०

काही निवडक अभिप्राय —

डॉ. श. दा. पेंडसे, नागपूर :

ललित वाङ्मयात समाविष्ट होणाऱ्या अनेक लेखनप्रकाराचे तंत्र श्री. देशपांडे यानी आपल्या कमावलेल्या प्रसन्न व ओघपूर्ण भाषाशैलीने थोडक्यात उत्तम रीतीने या पुस्तकात विशद केले आहे. काही वादग्रस्त प्रश्नाविषयी आपली समतोल मतेही त्यानी निर्भीडपणे प्रकट केली आहेत. श्री. देशपांडे याच्या उद्देशाप्रमाणे लेखनकलेचे प्राथमिक धडे गिरविणाराना हे पुस्तक उपयुक्त होईल असे मला वाटते . . . "

श्री. वा. ना. देशपांडे, खामगाव :

" ...पुस्तक शाळा–कॉलेजचे विद्यार्थी व नवोदित लेखक याच्यासाठी लिहिलेले आहे आणि हे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य झालेले आहे हे नमूद करण्यास मला आनद वाटतो.

प्रा. अनत काणेकर, मुंबई :

" ललित लेखनाचे तत्र ' हा श्री. बालशकर देशपांडे यांचा ग्रथ नुसता वरवर चाळला तरी प्रा. ना. सी. फडके याच्या गाजलेल्या ' प्रतिभासाधन ' ' या वाङ्मयविवेचनात्मक ग्रंथाची तो तीव्रतेने आठवण करून देतो.

... फार खोलात न जाता किंवा कसलीच गुंतागुंत न करता सोप्या आणि सुटसुटीत भाषेत ललित वाङ्मयाचे अतरग स्पष्ट करण्याचा श्री. देशपांडे यांचा हा प्रयत्न वाचकाना आवडेल, अशी खात्री वाटते."

### प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| ● गीतकृष्णायन | म. पां. भावे | १–२५ |
| ● लबाड गावात | राजा मंगळवेढेकर | ०–८० |
| ● जिंकू किंवा मरू | आशा गवाणकर | १–०० |
| ● निळ्या परीच्या राज्यात | दिनकर शिर्के | ०–५० |
| ● झुंज आणि इतर गोष्टी | शशिकांत कदम | ०–५० |
| ● योगिराजांचा आश्रम | होरारत्न आर. जी. सप्रे | २–५० |
| ● ललित लेखनाचे तंत्र | बालशकर देशपांडे | ४–५० |
| ● कथावली (१७ कथाचा सग्रह) | उद्धव शेळके | ४–५० |
| ● पाच एकांकिका | मनोहर देखणे | १–०० |
| ● बालछाया | बजरंग सरोदे | ०–५० |

### ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध होणार

| | | |
|---|---|---|
| ● मंत्र (कथासंग्रह) | मधु मंगेश कर्णिक | ४–०० |
| ● घरंदाज (कादंबरी) | श्रीकांत पुरोहित | ४–०० |
| ● धूम्रपान व स्वभावरेखा (सचित्र) | अ. स. कबरे | १–०० |

### आगामी प्रकाशने

| | |
|---|---|
| ● मराठीचे मानकरी | बालशकर देशपांडे |
| ● वेधवती (कवितासंग्रह) | दत्ता हलसगीकर |
| ● साभार पोच | प्रातिनिधिक (कथासंग्रह) |
| ● समरगीतसंग्रह | प्रातिनिधिक |
| ● हिरवी मुळूक (कथासंग्रह) | उद्धव शेळके |
| ● शिवकालीन शूरांच्या कथा | श्री. पु. पिंपळे |

सांगलीचे प्रमुख विक्रेते
श्री. डी. जी. पटवर्धन
हरभट रोड,
सांगली.

प्रकाशक,
श्री. देवेंद्र दलाल
साहित्य-रसमाला
कार्यालय
नीनिन मेन्यान
७ वी खेतवाडी, मुंबई–४

# साहित्य-रस स्पर्धा पुरस्कृत

# साहित्य-रस माला

## प्रकाशन संस्था

साहित्य-रस मालेच्या प्रकाशनाच्या विक्रीसाठी गावोगावी विक्रेते नेमणे आहेत. गरजूंनी कार्यालयाच्या पत्त्यावर त्वरित पत्रव्यवहार करावा.

गोव्यातील प्रमुख विक्रेते
श्री. मनोहर कर्पे
शोप नं. ३८
म्हापसा-बार्देज-गोवा

मुंबईचे
प्रमुख विक्रेते
श्री. तुकाराम बुक डेपो,
माधवबागेजवळ,
सी. पी. टँक,
मुंबई ४

*सोनार शिंपी कुलकर्णीअप्पा ।*
*यांची संगत नको रे बाप्पा ॥*



*बाप्पाने मोठ्या दयाळू अंत:करणाने*
*ही लोकांची इच्छा पुरी करण्याचे ठरवलेले दिसते.*
*कुलकर्णी कधीच खतम झाला.*
*आता गदा आली आहे सोनारावर.*
*पण इतक्या 'दयाळू अंत:करणाने'*
*ही संगत तोडायला नको होती बाप्पाने,*
*असेच हा एका सोनाराचा परिचय*
*वाचून कोणीही म्हणेल.*

# रामभाऊ नारायण निघोजकर

परिचयलेखक :

**रामचंद्र हिंगणे**

मी निघोजकरांच्या घराकडे निघालो तेव्हा त्यांच घर साधारण कस असेल याची कल्पना साहजिकच मनात आली. एका सोनाराच घर असणार कस? पुढच्या भागात दुकान! माग राहात घर. पुढच्या घरात सोनार आपली नळी फुंकीत बसलेले असायचे!

पण मी गेलो तेव्हा रामभाऊ नळी फुंकीत नव्हते. दागिने करीत नव्हते. काम केल्यास लगेच मजुरी मिळेल ही उमेद चेहऱ्यावर दिसत नव्हती. रामभाऊंनी एक स्टोव्ह समोर घेतला होता आणि सुन्नपणे तो दुरुस्त करण्याचा ते प्रयत्न करीत होते. काडचाच्या पेटीतली एकच एक काडी पेटवावी किंवा पेटवू नये याचा विचार चालला होता!

सरकारच्या एका वटहुकमाने सोनाराचे होत्याचे नव्हते झाले आहे.

रामभाऊ नारायण निघोजकर हे जातीन सोनार आहेत. त्यांच्या सांगण्यावरून सोनारातही पोटभेद आहेत अस समजल. आहेर सुवर्णकार, लाड सुवर्णकार, पांचाळ सुवर्णकार आणि दैवज्ञ सुवर्णकार; निघोजकर हे शेवटच्या जमातीत मोडतात. अजूनही त्यांच्या पोटजमातीत बेटीव्यवहार होत नाही.

निघोजकर हे लश्कर हद्दीत ११८ सोलापूर बजार या ठिकाणी राहत आहेत. बाहेर दीड खणाच्या जागेत त्यांचे दागिने करण्याचे दुकान आहे. आहे म्हणण्यापेक्षा होत अस म्हणण जास्त श्रेयस्कर. माग राहण्याची व्यवस्था आहे.वस्ती संमिश्र समाजाची दिसली. त्यांच वय ६३ वर्षांच आहे. थोरला मुलगा १६ वर्षांचा आहे. धाकटा १३ वर्षांचा आहे नि उषा नावाची मुलगी ८–१० वर्षांची असावी.

## सरकारी मदत

–आयुष्य खडतर गेल. आतातर प्रापंचिक अडचणींला सुमारच राहिला नाही. अशा परिस्थितीतही वयाच्या ६३ व्या वर्षी त्यांची प्रकृती उत्तम आहे. नुकत्याच सेवानिवृत्त झालेल्या माणसासारखी त्यांची प्रकृती आहे. त्यांचे सगळेच दात उत्तम आहेत, त्यामुळ त्यांची प्रकृती उत्तम असावी अस अनुमान काढावयास शास्त्रीय दृष्टचा काहीच हरकत नाही.

"कामधंदा नसल्यामुळ आता तुमच कस काय चालल आहे?" हा प्रश्न मला विचारावास वाटला नाही. संदर्भान बोलता बोलता निघोजकर एवढच म्हणाले, "आजचा दिवस गेला. उद्याचा दिवस कसा जाईल याची काळजी डोक्यात घेऊन रोज झोपतो. निदान झोपण्याचा प्रयत्न करतो. नशिबात काय

लिहिल आहे, कुणाला माहीत ?"

"वर्तमानपत्रातून वाचीत असतो, सरकारन तुम्हाला मदत दिली आहे ? मग आतापर्यंत तुम्हांला किती मदत मिळाली ?"

"अवघी दोन रुपये." हताश होऊन निघोजकर म्हणाले. एवढ्या मोठ्या कुटुंबाला सरकारकडून अनेक महिन्यातून दोन रुपये मदत मिळाली होती. मदतीचा आकडा ऐकून मला लाज वाटली. मदत या शब्दाला कोणता अर्थ असावा हे मला समजल नाही.

"दोन रुपये ! मग ती घेतलीत तरी कशाला ?"

"काय करणार. घेण जरूर आहे—भाग आहे. बाकीच्या काही लोकांना तीस तीस रुपये मिळाले. पण मला मिळाले नाहीत."

"तुम्हाला का मिळाले नाहीत ? तुम्ही अर्ज वगैरे केला आहे का नाही ?"

"अर्ज केला आहे. सगळ काही झाल आहे. पण मदत मिळत नाही एवढ खर." आणि जरा थावून बोलाव किंवा बोलू नये याचा विचार करून निघोजकर म्हणाले, "हे मधले लोक चावट असतात. काही ना काही तरी काढून येणाऱ्या माणसाला सारख टाळता कस येईल हे पाहतात."

निघोजकरांच हे म्हणण मला मनोमन पटल. बऱ्याच वेळा सरकारी योजना चागल्या निघतात. पण ज्याचा कोणी "वाली" नाही, ज्यांचा कुणाकड "वशिला" नाही, पण ज्याना मदतीची अत्यत जरुरी आहे, अशांपर्यंत ती पोहोचू शकत नाही. एखाद्या वेळी पोहोचली तर ती इतक्या उशिरा पोहोचलेली असते, इतक्या यातायातीनतर पोहोचलेली असते, की त्याचा त्या संबधात माणसाला काडिमात्र उपयोग होत नाही. ह्या 'मधील' लोकाच हे कसब मोठ और आहे. आपण मुद्दाम करतो अस कागदोपत्री दाखवीत नाहीत आणि त्याचा 'हेतू' मात्र निराळा असतो.

जीवनात एकूण हारच पदरी पडलेल्या माणसासारखी निघोजकराची प्रवृत्ती दिसली. सकट येणार, संकट सोसण्यासाठी आपला जन्म आहे, अशा त्याचा स्थायिभावच झाला आहे.

—वयपरत्वे ही भावना अशी झाली असेल, अस वाटल. पण ऐन उमेदीचा काळही फारसा आशादायक नव्हता. वयाच्या दहाव्या वर्षी आई वारली आणि शिक्षण सोडून वडिलांच्या धद्याला त्यानी सुरुवात केली. आतापर्यंतच्या आयुष्यात त्यानी कमीतकमी पंधरा हजार तोळे सोन्याचे दागिने केले. पण घरात आता सोन्याचा कण नाही. ५३ वर्षे दागिने करण्याची हातोडीची टकटक मात्र त्यांच्या जीवनाची सोबत करीत आली आहे.

निरनिराळ्या जातीचे दागिने निरनिराळे असतात. आतापर्यंत त्यानी अनेक जातीचे दागिने केले आहेत. त्यात मारवाडी लोकाचे दागिने जास्त आहेत. भोवतालच्या वस्तीमुळ म्हणा अगर आर्थिक सुबत्ता म्हणून म्हणा, त्यांच्या हातून मारवाडी जमातीचे दागिने जास्त घडविले गेले आहेत.

## पूर्वीचा रोजगार

आतापर्यंत सोनारकामाच्या दोन तीन ठिकाणी त्यानी नोकऱ्या केल्या. त्या वेळी त्यांना नोकरीचा म्हणून ३ ते ४ रुपये पगार मिळत होता. कोणत्या ना कोणत्या कारणान नोकरी सोडण भाग पडल.

"नोकरी थोडी झाली. वरील घरात दुकान आहे. समजा सरकरान दागिने न करण्याचा निर्बंध घातला नसता तर तुम्हाला मिळकत किती झाली असती ?"

"मी साधारणपणे या दुकानात पाच ते सात रुपयाच काम रोज करीत होतो. त्या वेळी माझा प्रपंच चागला नसला तरी बरा चालला होता. पण हे सरकारन अस करून ठेवल."

—हातातोडाला आलेल पीक टोळधाडीन नाहीस व्हाव, धरण फुटल्यान आयुष्यात कमावलेल सार धन काही कल्पना नसताना काही तासाच्या अवधीत नाहीस व्हाव. आकाशात भरारी मारणाऱ्या पाखराचे पख आपोआप गळून ते धरणीवर पडावं, अगदी तशी अवस्था निघोजकरांची झाली आहे. सरकारच्या साध्या वटहुकमान घरातला कर्ता माणूस कपाळाला हात लावून, आज पोराना घातल, उद्या काय घालू याचा विचार करीत अक्षरशः तडफडत पडलेला आहे.

"लोकाची दुकान बाजारपेठेत असतात मग तुम्ही तुमच दुकान या बाजूला का काढल ?"

"आमच्या वडिलांच दुकान वानवडी भागात होत आणि आमचा असा अदाज होता की, या भागात दुकान चांगल चालेले आणि ते चाललही. पहिल्याच दिवशी सामान येथे टाकल्याबरोबर मला आठ रुपयांच काम मिळाल. सरकारन हे अस केल नसत तर माझ चांगल चालल असत."

"या नशिबी आलेल्या परिस्थितीपुढ तुमच्या समाजान काही हालचाली केल्या नाहीत का ?"

"आमच्या समाजाच्या दोनतीन सभा झाल्या. पण पुढ विशेष काही हालचाल दिसली नाही. जो तो आपआपल्या काळजीत असल्यामुळ पुढ काहीच घडल नाही आणि इथून पुढ घडेल अस वाटतही नाही."

सरकारतर्फे नोकरीसाठी फॅक्टरीत त्याना बोलावण आल होत. अर्थात् अशा त्रेसष्ट वर्षांच्या वयस्कर माणसाला नोकरी देण सरकारलाही शक्य नाही.

"मग आता तुम्ही काय करणार ?"

"मग मी काय करणार ?" याच उत्तर त्यानी अस दिल—

गुजराथमधील काही बेकार सोनारांना धंद्यासाठी पाच-पाच हजार रुपये वाटले, हे त्यानी सागितल. महाराष्ट्रातील एकाही सोनाराला इतकी मोठी रक्कम मिळाली नसेल आणि मिळणार नाही. धंद्यासाठी सरकारकडे एक हजाराची रक्कम मागवली आहे, पण ती बहुत करून मिळणार नाही, असा त्यांचा होरा दिसला.

इतकी वर्षं घरात राहून घरकाम करणाऱ्या त्यांच्या पत्नीला आता कामासाठी बाहेर पडण्याची पाळी आली आहे. नाहीतर काय करणार ? घरातल्या जमेल त्या माणसान सकटकाळी पुढ आलच पाहिजे !

—आतापर्यंत सरकारी मदत त्यांना अवघी दोन रुपये मिळाली आहे. सरकारन आणि काही मदतीचा समुद्र सोनारकाम करणाऱ्या जमातीसाठी निर्माण केला असेल, पण त्यातला एखादादुसरा थेंबदेखील निघोजकराच्या वाट्याला येईल अस मला वाटत नाही. त्यांना नोकरी आता कुठच मिळणार नाही. एकूण सगळे हाल !

—मधेच ते मला म्हणाले, सोनारकाम करणाऱ्या दुसऱ्या जमातीच्या माणसान पुढाकार घेतला होता. जास्त मदतीची खटपट चालवली होती, पण आमच्याच लोकांनी त्याला अलगद उचलून बाजूला काढल !!

● ● ●



सुरंगा ... एक भावमुद्रा !

**हो अकुलीनेची चित्रपट आवृत्ती--**

**श्री.** पु. भा. भावे यांच्या 'अकुलीना' या नावाने काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या कादंबरीचे हे चित्रपटरूपांतर तपासण्यापूर्वी चित्रपटकथा ध्यानात घेणे आवश्यक आहे म्हणून ती विस्तृतपणे देतो.

मधू बर्वे या नावाच्या एका तरुणाचे एका मुलीवर प्रेम असते. परंतु, त्या मुलीचे दुसऱ्याच एका गृहस्थाबरोबर लग्न ठरते. त्या वेळी ती मधूच्या प्रेमाचा अतिशय उपमर्द करते आणि या प्रेमभंगाने विव्हळणारे हृदय घेऊन मधू परत घरी येतो. त्याच्या जीवनाला आता काही अर्थच उरला नाही असे त्याला वाटू लागते आणि तो आत्महत्येचा निर्णय घेऊन स्वतःला फास लावून घ्यावयास सिद्ध होतो. परंतु, त्याचा बानर्जी नावाचा बंगाली मित्र त्याला, त्याच्या ह्या अविवेकीपणापासून परावृत्त करतो. मधू प्रेमभंगाच्या या झटक्यातून स्वतःला सावरतो. अभ्यास करून पास होतो आणि डॉक्टर होण्यासाठी मुंबईच्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल होतो. तेथे त्याच्यावर त्याचा मित्र बानर्जी याच्या विचारसरणीचा फार परिणाम होतो. स्त्रीजात तेवढी निमकहराम असल्यामुळे तिच्यात न गुंतता आपल्याला हवे ते सुख उपभोगून घ्यावयाचे, हे बानर्जीचे जीवनसूत्र असते.

मेडिकल कॉलेजचा आयुष्यक्रम सुरू झाल्यानंतर एक दिवस मधूच्या खोलीचे दार टकटकते. दारात एक सुंदर मुलगी उभी असते. स्नो, पावडर, साबण इत्यादी वस्तूंची घरोघर जाऊन विक्री करणारी ती विक्रेती असते. तिच्या रूपाने पाघळून न जाता, मधू शांतपणे काहीही खरेदी करायचे नाही म्हणून तिला सांगतो. ती निघून जाते, पण छत्री त्याच्या खोलीतच विसरून. ती छत्री पाहून बानर्जी मधूला असे पटवून देतो की, ती मुलगी छत्री मुद्दामहूनच विसरून गेली आहे पुन्हा मधूकडे येता यावे म्हणून ! आणि ती मुलगी दुसऱ्या दिवशी सकाळीच मधूच्या दारात उभी होते.

या मुलीचे नाव सुरंगा. ती एका गोवेकरणीची मुलगी. पण, तिला आपल्या आईचा व्यवसाय पुढे चालवावयाचा नसून, संसार थाटायचा असतो. आपले एक घर असावे, असे तिचे स्वप्न असते. पण व्यवहाराचे टक्केटोणपे खाल्लेल्या आईला तसे घडणार नाही, हे ठाऊक असते. म्हणून ती सुरंगाला सरळसरळ धंदा सुरू करायचा रोज आग्रह करीत असते. दिवस जात असतात. सुरंगा आणि मधू यांच्या वरचेवर भेटीगाठी होऊ लागतात. सुरंगाचे स्वप्न साकार होणार असे तिला वाटू लागते आणि मधूला बानर्जीच्या सल्ल्यामुळे तिचा उपभोग घेण्याची घाई होऊ लागते. पण लग्नाआधी हा अविवेक करायची सुरंगाची तयारी नसते. पण मधू हे सगळे प्रकरण जेव्हा अगदीच हातघाईला आणू पाहतो त्या वेळी सुरंगा त्याला देवळात घेऊन जाते. देवाच्या साक्षीने आपल्या गळयात मंगळसूत्र बांधून घेते आणि त्याची पत्नी झाल्याचे समाधान मानते.

पण, ज्या वेळी सुरंगाची आई मधूला सरळसरळ लग्नाचे विचारते, त्या वेळी मधू हात झटकून मोकळा होतो. सुरंगाचा त्याला कंटाळाही येऊ लागलेला असतो. सुरंगाची आई जेव्हा त्याच्यावर चिडते तेव्हा त्या संधीचा फायदा घेऊन मधू सुरंगाच्या पाशातून मुक्त होतो. सुरंगा अश्रू ढाळीत बसते. मधू डॉक्टर होतो. पॅरिसला जातो आणि वैद्यकशास्त्रातील उच्च शिक्षण घेऊन परत येतो. मुंबईत स्वतःचे हॉस्पिटल काढतो. लग्न करतो आणि सुखासमाधानाने राहू लागतो. पण भोग सगळे भोगावे लागतात ते सुरंगाला. सुरंगाची आई आजाराने मृत्युमुखी पडते. तिचा रंग्यादादा तिला जबरदस्तीने धंद्याला बसवतो. तिच्यासाठी गिऱ्हाइके आणू लागतो. पुढे सुरंगा सतत आजारी राहू लागते. तरीही रंग्यादादाच्या निगराणीखाली धंदा करावाच लागतो. अखेर तिची प्रकृती जास्तच खराब होऊन तिला हॉस्पिटलमध्ये भरती करावे लागते.

# माझा होशिल का ?

हे हॉस्पिटल मधूचेच असते. सकाळी तो हॉस्पिटलमध्ये जातो. पेशंटस् तपासता तपासता एका नवीनच दाखल झालेल्या रोग्याजवळ येतो आणि केसपेपर्स पाहताच त्याच्या लक्षात येते की, हा आपला नवा पेशंट म्हणजे सुरंगा. सुरंगाला पाहताच मधूच्या मनातील खोल दडून बसलेले सत्य उसळून येते. त्याची सदसद्विवेकबुद्धी जागृत होते. तो विलक्षण अस्वस्थ होऊन घरी परत येतो आणि त्याच्या पाठोपाठ नर्स धावत येते. सुरंगाने खिडकीतून उडी मारून आत्महत्या केलेली असते. मधूला पश्चात्ताप होतो. त्याचे अंतःकरण पोळू लागते. तो हॉस्पिटलमध्ये जाऊन सुरंगाच्या पायांवर डोके ठेवून पश्चात्तापाने तळमळणारे हृदय मोकळे करू लागतो.

**कथा-पटकथा एकच ?**

श्री. भावे यांनीच या चित्रपटाची पटकथा तयार केली आहे आणि ही करताना त्यांनी फारसे नवीन काही केले नाही ही आमची तक्रार आहे. कादंबरीत शब्दांना महत्त्व असते. पण पटकथेचा सगळा भर दृश्यनिर्मितीवर असतो. कॅमेऱ्याने फक्त ही दृश्ये (visuals) टिपावयाची असतात. हे मूलतः लेखकाने दृष्टिआड केल्याने हा चित्रपट म्हणजे एक शब्दजंजाळच झाला आहे. दृश्य घटनेचे पुन्हा संवादातूनही स्पष्टीकरण करून सांगावयाचे, हा दोष या मूलतत्त्वाच्या

'नवकेतन चित्र'

# तेरे घरके सामने

'घरके बुद्दु घरको आये !'

माफक कथानकावर मनोरजक चित्रपट काढणे हा 'नवकेतन' चा मार्ग. 'टॅक्सी ड्रायव्हर' या पहिल्या चित्रपटावरोबरच खरे तर 'नवकेतन' ला आपला मार्ग सापडला होता. त्या चित्रपटाच्या व्यावहारिक यशाने वहकून की काय, त्यानी 'हमसफर' आणि 'आँधियाँ' हे दोन खेचरी चित्रपट काढले, हे विशेषण कदाचित विचित्र वाटेल. पण त्या अनाकलनीय चित्रपटाना दुसरे विशेषण *आम्हाला तरी सुचत नाही. मात्र या दोहोंच्या* अपयशाने साक्षात्कार होऊन त्यांनी पुन्हा 'फंटूश', 'नौ दो ग्यारह', 'काला पानी', 'काला वाजार' हे आपल्या गल्लीतले चित्रपट काढले. मग एक वेगळेच वारे वाहू लागले. वास्तववाद–ध्येयवाद–आशय–हेतु–प्रधानता इत्यादींचे. या वाऱ्याने मी मी म्हणणाऱ्यांना झपाटले तिथे नवकेतनचा 'कंदिल' ही त्यात सापडला तर नवल ते काय ? आणि परिणामी 'हम दोनो' हा आणखी एक 'तसलाच' चित्रपट तयार झाला.

आता पुन्हा एकवार उमज पडून नवकेतन आपला जुना मार्ग धुंडाळू लागलेले दिसतात. 'घरके बुद्दु घरको आये !'

### कथानक नसलेली पटकथा

विनवुडाच्या मनोरंजक चित्रपटात कथेची पायरी गाळून एकदम पटकथाच लिहायला सुरुवात करतात. पुढे जे काय होईल ते होईल ! पुढे जात राहायचे, आणि बारा-तेरा हजार फुटांचा 'कोटा' पुरेसा झाला की सुचेल त्या मार्गाने मारामारी–अपघात घडवून आणायचा नि चित्रपट सपवायचा. अर्थात ह्याला डोके चलाखीने वापरावे लागते.

अशा चलाख डोक्याच्या दिग्दर्शकांमध्ये विजय आनंद यांचा क्रमाक खूप वर लागेल, आपले हे कर्तृत्व त्यांनी 'नौ दो ग्यारह' व 'काळा वाजार' या चित्रपटात सिद्ध केले असल्याने नाही म्हटले तरी आशा वाटत होती. पण कसले काय न् कसले काय......

### चित्रपटाची कथा

......बोव ! काय सांगायच ? दोन बुढ्ढयांचे आपापसात वैर असते. का ? मधे मधे विचारू नका ! ते दोघे शेजारी शेजारी दोन प्लॉट्स् भरमसाट किंमतीने विकत घेतात व तिथे बाधली जाणारी इमारत दुसऱ्याच्या इमारतीपेक्षा सरस असावी अशी दोघाचीही इच्छा असते. या बुढ्ढयापैकी एकाला उपवघू मुलगा नि एकाला उपवर मुलगी असते. मुलीला काही कामच नसते पण मुलगा असतो आर्किटेक्ट ! शिवाय इतर सर्व 'नसते धंदे' करण्यात आघाडीवर. म्हसोवाला नव्हती बायको अन् मुरळी शोधीत होती बाप्याला ! बुढ्ढे आपापली घरे बाधण्यासाठी याच आर्किटेक्टची निवड करतात. इथे *आर्किटेक्ट मुलगा कधी नव्हे ते डोक्याचे* काम करतो नि एकासारखी एक अशी दोन घरे शेजारी शेजारी बाधून ठेवतो. आपली 'दिलकी पुकार' आपल्या पिताजीच्या व (भावी) सासऱ्याच्या कानावर दर्दभरे गीत गाऊन घालण्याचा अहिंसात्मक मार्ग नायक स्वीकारतो. त्या गीताने त्या वृद्ध दगडाना पाझर फुटतात. 'शुममंगल साऽऽवघान' होते.

कथा नसली तरी 'पटकथा' आहे; आणि ती दिल्लीतली सारी ठिकाणे तर पालथी घालतेच पण मध्यंतरी एकदा सिमल्याची ट्रिपही करून येते.

अशा प्रकारचा चित्रपट यशस्वी व्हायला हवा असेल तर त्यासाठी दिग्दर्शकाची हाताळणीवरील पकड. कॅमेऱ्याची करामत नि मधुर *संगीत यांची आवश्यकता असते,* 'नौ दो ग्यारह' मध्ये विजय आनंद यांच्या 'टेकिंग' मध्ये जो ताजेपणा होता तो यात दिसत नाही. अर्थात् प्रयोगशीलता आहे पण ती या ना त्या कारणाने परिणामकारक झालेली नाही.

### क्लोजअप्सचा धडाका

त्यानी अनेक वेळा सर्व चित्रपटभर क्लोज अप्सचा अतिरेकी वापर केलेला आढळतो. क्लोजअप् प्रेक्षकाना पात्राच्या अधिक जवळ नेतो व त्यामुळे भावप्रकटीकरणाच्या परिणामकारकतेला मदत होते हे खरे, पण तो आजूबाजूच्या सर्व गोष्टीना चित्र–चौकटीतून हद्दपार करीत असल्याने त्या गोष्टीचे प्रकटीकरण करायला मिड् शॉट्स् व लॉंग शॉट्स *योग्य प्रमाणात हवेतच: हे शॉट्स जितक्या* विविध कोनातून दाखविले जातील तितकी भोवतालची पार्श्वभूमी सुस्पष्ट होत जाते. हे नसले की अर्थातच समोर जे चालले आहे ते कुठे, अशा परिस्थितीत याविषयी प्रेक्षक वुचकळ्यात पडतो. म्हणजेच तो प्रसंग त्याच्या

[ माझा होशिल का............पुढे चालू ]

अभावातूनच निर्माण होतो. अगदी प्रारंभीच्या दृश्यात मधू आणि त्याची प्रेयसी अंगठ्याची अदलाबदल करीत असताना पुन्हा 'तू माझ्या बोटात अंगठी घातलीस, आता मी तुझ्या बोटात अंगठी घालतो.' असे स्पष्ट करून सांगण्याची गरज नव्हती. अशीच पुनरुक्ती शेवटच्याही दृश्यात घडून गेली आहे. मधू पश्चात्तापाने अश्रू ढाळीत मृत सुरगाचे पाय धरतो. पण एवढे करूनच तो थांबत नाही तर पुन्हा स्पष्टही करून टाकतो की, 'सुरंगा, माग एकदा तू मला नमस्कार केला होतास; आता मी तुला नमस्कार करतो.' दृश्यांचीच समापणातून पुनरुक्ती करण्याच्या या दोषांवरोवरच पटकथेतील आणखी एक दोष म्हणजे प्रसंगाची रचना. प्रसंगांच्या रचनेत जी तर्कशुद्धता पाहिजे ती येथे आढळत नाही. काही प्रसंग फार सविस्तरपणे पडद्यावर दिसतात. तर काही प्रसग महत्त्वाचे असूनही क्षणकालच दिसून जातात. उदाहरणार्थ, मधूच्या प्रेमप्रकरणाचा प्रारंभीचाच प्रसंग हा पटकथेच्या दृष्टीने मुळीच आवश्यक नव्हता. पण, तरीही त्याची लांबण खूपच लावत राहते. प्रेमभगामुळे मधूचा स्त्रीच्या प्रेमावरील विश्वास उडाला हे माडण्यासाठी हा प्रसग एवढा सविस्तर चित्रित केला गेला असावा. पण, असे मानले तर साध्य सिद्धच होत नसल्याचे प्रत्ययास येते. मधूचा स्त्रियांच्या प्रेमावरील विश्वास उडाला, त्याला स्त्रीजात तेवढी निमकहराम वाटू लागली, असे चित्रपटभर प्रेक्षकाना वाटत नाही. याचाच अर्थ असा, की कथेच्या विकासातील महत्त्वाचा दुवाच असा

डोळ्यासमोर सम्यक् स्वरूपात उभा राहात नाही. त्या चित्रपटात हे असे बऱ्याच वेळा होते. कलादिग्दर्शकाने माडलेल्या सेटचे असे सम्यक् दर्शन न घडल्याने त्याची माडणी ध्यानात येत नाही व एकदर चित्रणातली सलगता जाऊन सर्व तुकडे तुकडे वाटू लागतात.

याचे ठसठशीतपणे उठून दिसणारे आणि समजायला सोपे उदाहरण म्हणजे या चित्रपटातले सुरुवातीचे क्लबमधले नृत्य. या क्लबचा व स्टेजचा जो सेट माडलाय् तो सलगपणाने चित्रित न केल्याने किंवा क्लोज अप्सच्या उपयोगामुळे तशी योग्य सधी न मिळाल्याने क्लबची बाधणी, आकार, व्यवस्था याविषयी काहीही बोध होत नाही आणि त्यामुळेच कधीकधी हा क्लबचा सेट एकच आहे की अनेक सेटवर चित्रण करून ते तुकडे जोडलेत अशी शंकाही येते.

## चित्रणांत सफाई

असे असले तरी विजय आनंद याच्या चित्रणात सफाई आहे यात शका नाही. कुतुबमीनारचे चित्रण त्यांनी आकर्षक तऱ्हेने केले आहे. त्यातली पुनरुक्ती गाळली असती तर अधिक बरे झाले असते. गाण्याचे टेकिंग हे त्याचे खास वैशिष्ट्य. ते त्यानी पुन. दाखवले आहे. 'इक घर बनाऊंगा–' या गाण्याच्या वेळी दारूच्या पेल्यात नायकाला दिसणारी नायिका ही कल्पना बरी आहे. पण त्या पेल्यात तिची पूर्णाकृतीच शेवटपर्यंत दाखवायला हवी होती. तिचे क्लोजअप्स जोडल्याने त्यात चिकटवाचिकटवीचा प्रकार वाटतो शेवटी एकासमोर एक बाधलेली एकसारखी घरे अधिक वारकाव्यासह व्यवस्थित चित्रित करून नीट exploit करायला हवी होती.

## यथातथा अभिनय

राकेश या आर्किटेक्टच्या भूमिकेत देव आनद 'सभ्य' रोडसाईड 'रोमिओ'चा पार्ट 'अदा' करतात. अर्थात् नेहमीच्याच सफाईने रोमिओच्य भूमिकेत ते नेहमीच शोभतात पण भावनात्मक सघर्षाचा प्रश्न आला की त्याची त्रेधा उडते अर्थात् या चित्रपटात भावना वा सघर्ष या दोहोचा पत्ताच नसल्याने त्या आपत्तीतून ते आपोआपच वाचले आहेत.

खरे तर नूतन याच्या अभिनयाचा 'पॅटर्न' देव आनद याच्या बरोबर उलटा! भावप्रकटीकरणावर भर नसावा हे देव आनंद यांना फायदेशीर ठरले तर तेच नूतन यांना गोत्यात टाकणारे आहे. कारण ते नसल्यावर जे उरते त्यात नूतनबाई बसत नाहीत. सुदैवाने या पात्राला (सुलेखा) कामही कमीच असल्याने त्यानी ते आपल्यापरीने साजरे केले आहे.

हरिंद्रनाथ चटोपाध्याय याचे बुढ्ढे शेठजी ठीक आहेत. नवकेतनच्या चित्रपटात रशीदखान हवाच म्हणूनच की काय, राकेशच्या 'असिस्टंट'चे पात्र घातले आहे. या असिस्टटला कोणीतरी 'काऊंटर . असिस्टंट' हवीच. म्हणून सुलेखाची आया आहेच– (प्रवीण चौधरी) दोघांनी काम बरे केले आहे -

सगळ्यात उत्तम काम केले आहे ते ओम प्रकाश यानी दुसऱ्या तर्कटी बुढ्ढ्याचे! या लालाजीच्या भूमिकेत त्यानी मस्त रग भरला आहे. एककल्ली म्हताऱ्याच्या हृदयात असणारा आपल्या मुलाबद्दलचा हळुवार कोपराही त्यांनी अचूक दाखवला आहे.

## संगीत व छायाचित्रण

एस्. डी. बर्मन याच्या सगीताला 'बंदिनी' नतर लागोपाठ पुन्हा अपयश आले आहे. 'तेरे घरके सामने' हे एक गाणे बरे आहे. पण बाकीची थिएटरमध्ये ऐकण्यापुरतीच. क्लबमधले ते 'चा चा चा' युक्त गाणे मला वाटते त्याना स्वत लाही पुन: ऐकतांना आवडणार नाही हसरत जयपुरीनी फावल्या वेळात गाणी लिहून दिल्यासारखी वाटतात.

व्ही. राजा यांचे छायाचित्रण दर्जेदार आहे. पण त्याच्याकडून याहिपेक्षा अधिक अपेक्षा होती बॅरॉट याचे ध्वनिमुद्रण समाधानकारक आहे. कलादिग्दर्शकानी सुसूत्रता, सुव्यवस्थितपणा व काटेकोर माडणी याकडे अधिक लक्ष द्यायला हवे होते. प्रत्येक सेट् फाफटपसारा असलेला व आडवातिडवा पसरलेला असण्याची आवश्यकता नव्हती. शाई कमी लागली!–

या नवकेतनी चित्रपटाला शाई थोडी कमी लागल्याने शिक्का नीट उमटलेला नाही. पण तरीही पुढच्या खेपेला आणखी एकदा भोगळ कथेचा पण 'मनोरंजक' चित्रपट पाहायला मिळायला हरकत नाही.

● ● ●

---

दुबळा राहून गेलेला आहे. दुसरे असे की, एका प्रसंगावरून दुसऱ्या प्रसगाकडे जाण्याची क्रिया ही नकळत घडत नाही. प्रेक्षकाच्या चित्रपटाचा रसास्वाद घेण्याच्या क्रियेत तर यामुळे बाध येतोच पण साध्या कथेच्या गतीलासुद्धा त्यामुळे खंड पडतो.

सवादही सदोष आहेत. भावे हे भाषेच्या फुलोऱ्यासाठी प्रसिद्ध आहेत. पण त्यांचा हा गुणच चित्रपटाच्या बाबतीत दोष ठरला आहे. कारण, चित्रपटाचे संवाद हे नैसर्गिक असले तरच अधिक प्रभावी ठरतात. पण भाव्याचे सवाद कृत्रिम वाटतात. सवादातील भाषेच्या कृत्रिमतेबरोबरच व्याख्यानांचाही मोह भाव्यानी आवरला असता तर बरे झाले असते. माणसे दैनंदिन जीवनात सुभाषिते बोलत नाहीत असे नाही. पण, भाव्याची पात्रे सुभाषितांशिवाय बोलतच नाहीत. सुरंगाशी नवीनवी ओळख असताना मधू 'मी नव्या की जुन्या मताचा' या विषयावर एक व्याख्यानच देतो. वास्तविक "तुम्ही कुठल्या वळणाच्या?" हा जो प्रश्न मधू सुरगाला विचारतो त्या प्रश्नासाठीच हा सगळा प्रसग पटकथेत बांधला गेला आहे. त्याचप्रमाणे मधूचा मित्र बानर्जी कथेत येतो तोही व्याख्याने देऊन मतप्रतिपादन करण्यासाठीच. मधूचे लग्न झाल्यानंतर मधू पहिल्या रात्रभेटीत आपल्या पत्नीला 'लग्नाच्या बायकोच्या श्रेष्ठत्वाबद्दल' जे भाषण देतो तेही माझ्या उपरोक्त म्हणण्याचा पुरावाच ठरते.

भाव्यांच्या पटकथेतील आणखी एक न्यून म्हणजे त्यांच्या व्यक्तिरेखाचा रेखीवपणा नाही. मधू बर्वे, सुरगा, बानर्जी, सुरगाची आई, रंग्यादादा या सगळ्याच व्यक्ती भुसभुशीत वाटतात. त्यांना सौष्ठव

आणि व्यक्तित्व असल्यासारखे वाटतच नाही. याचे कारण पटकथा-लेखकाचे लक्ष मध्यवर्ती व्यक्तिरेखांवर केंद्रित होऊ शकले नाही. अनेक अनावश्यक पात्राची गर्दी जर पटकथेतून कमी झाली असती तर लेखकाला मध्यवर्ती व्यक्तिरेखा सुडौल आणि भरीव करावया-साठी भरपूर जागा मिळाली असती. मधूची पहिली प्रेयसी, वानर्जी, डॉली, मधूचे आईवडील ही सगळी वास्तविक अनावश्यक पात्रे आहेत. मध्यवर्ती कथेच्या दृष्टीने यांना फारसे महत्त्व नाही आणि जे काही थोडेफार महत्त्व आहे ते सवादातून वा इतर कोणत्यातरी उपायाने मांडता आले असते. पण, तसे न करता त्यांचा अनावश्यक विस्तार होऊन मध्यवर्ती व्यक्तिरेखाही रेखीव होऊ शकल्या नाहीत आणि याचा परिणाम म्हणजे कोणतीही व्यक्तिरेखा प्रेक्षकाच्या मनाची पकड घेऊ शकत नाही.

### श्री. मानें यांचेही अपयश !

ही अशी तुटक, ढिसाळ आणि अडखळत चालणारी पटकथा सावरून धरण्याचा दिग्दर्शकानेंही काही प्रयत्न केलेला नाही. श्री. अनत मानें यांना प्रेक्षकाची नाडी अचूक गवसली आहे, असे म्हणतात. पण त्याना 'अकुलीना' ची नाडी मात्र सापडलेली नाही, असेच म्हणावे लागते. सगळी दृश्ये चित्रित करताना त्यातही मेलोड्रामा काढून ती नैसर्गिक करण्याऐवजी मान्यांनीही ती अधिकच मेलो-ड्रामॅटिकच केली आहेत. त्यामुळेच सगळे प्रसग हे नाटकी (Stagy) वाटतात आणि असे झाल्यामुळे होते काय, की मधूच्या प्रेमभंगाचा प्रसग, सुरंगाच्या आईच्या मृत्यूचा प्रसंग किंवा असलेच इतर प्रसंग खऱ्याखुऱ्या अर्थाने भावनाप्रवण न होता त्यांना Emotional vulgarity चे स्वरूप प्राप्त होते. या चित्रपटात वापरलेली प्रतीकेही नवीन किंवा वैशिष्ट्यपूर्ण नाहीत. मेणवत्ती जळन जळून वितळत जाण्याचे प्रतीक या चित्रपटात वारंवार व प्रामुख्याने वापरले गेले आहे, माणसाच्या झिजत जाण्याला दुसरे प्रतीक दिग्दर्शकाला सापड-लेच नाही का? वरे! याही प्रतीकाचा काही कल्पकतेने उपयोग केला आहे असे म्हणावे तर तसेही प्रत्ययास येत नाही. सुरगाने मधूला केलेले शरीरदान आधी नीटसे मांडलेच गेले नसल्यामुळे नग्न स्त्रीच्या कॅलेंडरवर सुरगाने टागलेले शिवाचे कॅलेंडर गळून पडण्याची प्रतिमा अजिवात परिणामकारक किंवा अर्थसघन वाटत नाही. मात्र लांव मिशाच्या पुरमय्याने सुरगावर केलेल्या वळजवरीच्या वेळी दिग्दर्शकानी फोटोची काच तडकल्याची जी प्रतिभा वापरली आहे ती अर्थपूर्ण वाटते.

काही प्रतीकाचा जसा दिग्दर्शकाला चांगला उपयोग करून घेता आला नाही तसाच काही प्रसगाचाही ! मधूच्या लग्नानतरच्या मधुचद्राचे दृश्य दिग्दर्शकाने पडद्यावर इतका वेळ ठेवले आहे की, ते पाहताना किळस वाटावी. कोठलीही गोष्ट सूचक असली तरच ती अधिक गहिरा परिणाम साधू शकते. ती उघडयानागडया स्वरूपात वटवटीतपणे माडण्याने त्यातील गहिरेपणा आणि सौंदर्यही कमी होते. अखेरचा सुरगाच्या मृत्यूनतरचा प्रसगही असाच फार वेळ पडद्यावर राहतो. त्यातील कृत्रिमपणामुळे आणि मेलोड्रॅमॅटिक हाताळणीमुळे तो कंटाळवाणा झाला आहे. त्या प्रसगात दिग्दर्शकाच्या अनवधानाने एक गम्मतच झाली आहे. सुरगाने जन्मभर जपून ठेवलेले मधूचे धोतर तो तिच्या मृतदेहावर घालतो. त्या घडीत सुरंगाने एक पत्र लिहून ठेवले होते, तिच्या उदात्त हृदयाचा आविष्कार करणारे... मधूच्या सुखासाठी शुभचिंतन करणारे ! तिच्या मृतदेहावर धोतर घालताना ते पत्र तिच्या पायाजवळ पडते. त्या पत्रातला मजकूर त्या-आधीच प्रेक्षकाच्या कानावर घालायची दिग्दर्शकाने व्यवस्था केली नसती तर या पत्राकडे मान्याचे या वेळी लक्ष गेले असते.

प्रसगाचे Taking जसे कटाळवाणे वाटते तसेच गाण्याचेही झाले आहे. हे विशेष जाणवते ते 'असे वाटते सजवावे घर' या गाण्याच्या वेळी. त्या वेळी वापरलेले डिझॉल्व्हज कल्पक नाहीत.

### स्मिताचें यश

अभिनयाच्या वाबतीतही या चित्रपटात काही विशेषसे आढळून येत नाही. रमेश देव अखेरपर्यंत नाटकी व कृत्रिमच वाटतो. आपल्या प्रेयसीच्या घरी तो ज्या पद्धतीने भावनाविष्कार करतो ती पद्धत सर्वस्वी अवास्तव वाटते. अखेर पश्चात्ताप दाखविण्याच्या प्रसंगात सयम न राखल्यामुळे त्याच्या अभिनयात अतिशय अतिरेकीपणाच आला आहे. वानर्जीच्या भूमिकेत शरद तळवलकराना काहीच वाव नाही. त्यामुळे त्याच्या सगळ्या अस्तित्वात कुठेही जिवतपणा वाटत नाही. अमोल हा नट दारुड्या रग्यादादाच्या भूमिकेत आला आहे. इंदिरावाई चिटणिसानी केलेले काम त्याच्या आजपर्यंतच्या लौकिकाला साजेसे नाही. ही वस्तुतः त्याची चूक नसून त्या भूमिकेसाठी ज्या दिग्दर्शकाने त्याची निवड केली या दिग्दर्शकाची ती चूक आहे. कामिनी कदम मात्र चांगले काम करून गेल्या आहेत. त्याना भूमिकेचा समज तर आहेच पण त्या भूमिकेच्या भावाविष्कारातही त्यानी समजूतदार-पणा दाखविला आहे. विशेषतः पूर्वार्धात तर त्याचे काम उत्कृष्ट आहे.

### चौकोनी चाके . . . !

सगीत श्री. वसंत पवार यानी दिलेले आहे. सर्व गाण्याच्या चाली प्रसगाला योग्य अशा नाहीत. दुःखद प्रसगी सुरगाच्या तोंडी अस-णाऱ्या गाण्याची चाल अत्यंत अप्रयोजक वाटते. तसेच 'राया मला नथ मोत्याची आणा' या इंदिरावाईंच्या तोंडी घातलेल्या गाण्याला लावणीचे स्वरूप का? 'असे वाटते सजवावे घर' व 'नेसले पीतावर, हरीचा, जरीचा' या गाण्याना मात्र छान चाली दिल्या गेल्या आहेत.

छायाचित्रण अतिशय खडबडीत आहे. विशेषतः 'पॅनिंग शॉटस्' मध्ये तर कॅमेरा वस्तू शोधीत शोधीतच जातो. या चित्रपटाला अप्रेक्ष-णीय करण्याचे काहीसे श्रेय छायाचित्रकारालाही द्यायला हवेच !

सेटिंग्जमध्ये जशी अवास्तवता आहे तसाच तोच तोचपणाही आहे. सुरगाचे घर असो, मधूची खोली असो की मधूच्या प्रेयसीच्या घराचा दिवाणखाना असो सेट वदलल्यासारखा वाटतच नाही. त्याच कट लाइट दिला की चिकटवलेले कागद दिसणाऱ्या चौकोनी खोल्या, हात लागला की हलू लागणाऱ्या भिंती ! थोडे फार लाकडी सामान इकडची तिकडे सरकवली की झाले !

माव्यामधील, कथाकार समर्थ परंतु पटकथाकार आयत्या वेळी सव्यग; अनंत माने याचे निदान बरोबर परंतु नाडीच आयत्या वेळी हाती लागत नाही अशी अवस्था; माडगुळकराची गाणी हुकमेहुकूम परतु वसत पवाराचे आपले सागतो ऐका...असा योग जमून आल्यामुळे चित्रपट फारसा कुलीन वाटत नाही. परंतु मराठीतील एका समर्थ कथाकाराचेच हे अपत्य असल्यामुळे चौकोनी चाकावर चाललेली ही रथयात्रा एकवार सर्वांनी पाहावी असेच आम्ही म्हणू ! ● ● ●

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिति

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दी जौहर-मोहीम

पाच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय


मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.

# धन्य तूचि कांता

गेल्या दिवाळी अंकात सादर केलेल्या
या भावरम्य संसारकथांची स्मृति
पुसट होते न होते तोच

# मी तुळस तुझ्या अंगणी



ही संसारकथांची दुसरी पुष्पमाला
यंदाच्या 'माणूस' दिवाळी अंकात वाचकांसमोर ठेवली जात आहे.

*या मालेतील काही लेखिका*

**सौ. सुहासिनी मुळगावकर**

**अभिनेत्री : नूतन**

**मिसेस् डॉली कॉन्ट्रॅक्टर**

**सौ. कुसुमताई वानखेडे**

**सौ. जयश्री वैद्य**

**सौ. सुधाताई जोशी**

**सौ. सुधाताई अत्रे**

**आणि**

**?**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी. संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक श्री. ग. माजगावकर**